वर्षाचे आगाऊ रु० ५ डाक हाशील ०।३
सहामाही ॥ ३ ॥ ०८
सालअखेर ॥ ७ ॥ १०८
किरकोळ अंकास ........................०४

Annum in advance. 5 Postage 13 ass
Annum in arrears 7 ,,1Rs 8 as
Six monthly............3 ,, 8 as
Single copy............4..................as

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसर खेपेस ........०१

Advertisemen
Below 10 lines...2Rs
per line over10...4 as
Repetition per line3as


# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR


VOL XXVI AKOLA MONDAY 1 AUGUST 1892 NO 30

वर्ष २६ अकोला सोमवार तारीख १ माहे आगष्ट सन १८९२ इ० अंक ३०


## जाहिरात

——0——

अहो स्वदेश बांधवहो, परदेशी औषधी नुसत्या रंगबाज व कमिशन जास्त पाडून कां फसतां? इकडे थोडें लक्ष द्या.

आमचे दवाखान्यांत सर्व रोगांवर औषधी विक्रीस व दरिद्री लोकांस फुकट तयार आहेत; परंतु त्यांत ज्या हटकून गुण खात्रीनें देतात त्यां पैकीं थोड्या प्रसिद्धीस देतों. त्यांतून जो दवा कोणास लागेल त्यांनीं खालीं लिहिलेले सहीचे पत्यावर पत्र पाठवावें. ह्मणजे आम्ही व्हाल्युपेबलनीं पोस्टमार्गें लवकर पाठवूं. व कोणी आजारी आमचे येथें येऊन औषध घेतील त्यांस प्रथम दुरुस्त करून ठरलेली किंमत मागाहून घेऊं.

हमेशा घेणारे ग्राहकांस कमिशन देऊं. व त्यांनीं विक्री करून दाम पाठवावें.

१ गजकर्णावर रामबाण, ६ दिवसांत गुण किंमत दर बाटलीस ०८ आणे.

२ मूळव्याध कितीही दिवसांची दुर्धर असेल त्यावर मोडावा लावण्याचे व पोटात घेण्याचें दोन औषधी मिळून किं. १॥ रु.

३ चातुर्थिक ज्वर ह्मणजे चवथारे हिव ताप त्याच प्रमाणें तिजारे, व दररोज येणारे कितीही दिवसांचे असो, त्याजवर मिश्रित औषध एकच बाटली पुरे. किं. १॥ रु. दुसरें औषध गोळ्या खात्रीच्या २१ गोळ्यांच्या डबीस १०१ या औषधानें कडक ताप्ही जातो.

४ परमा तिडिक व स्वप्नावस्था, व कोठ्यांतील उष्णता व क्षिणता या सर्वांवर मेहूणपुडा किं. १ पुड्यास ०१४ आणे.

५ बाळंत रोग बाळाचे हवे व सटवी बाधा व प्रदर सर्व तऱ्हेचा किं. १ डबीस १॥ रु.

६ वीस प्रकारचे मेहापैकीं १६ मेहावर १४ गोळ्यास किं. २॥=

७ नारुवर १ दिवसांत गुण. लावणें व खाणे याच्या डबीस किं. ।

८ गुल्म पांच प्रकारचे व सर्व पोट शुळांवर व गोळ्यावर व पानथरीवर १ डबीस किं. ॥।

जुलाब उत्तम राजस तकलीफ अगदीं नसून कोठा साफ १ बाटली १० मनुष्यास पुरेल किं. १। रु.

१० मेदोरोग व घुरें व उन्माद यावर अगदीं जल्द गुण १ बाटलीस किं. २ रु.

११ स्त्रियांचे रक्तस्राव व ऋतुस्नात होण्यास व गर्भधारणास बंदोन ह्यांवर हें एकच औषध फार चांगलें आहे. १ डबीस किं. १॥

१२ पिनस व मस्तकशूळ व अर्धशिशी याजवर दर डबीस किं. १०=

१३ हागवण व अतिसार १ डबीस किं. १।=

१४ वृषण एकारस्पास व वृद्धीस १ डबीस किं. १ रु.

१५ कावरले कुत्रें व कोल्हे व तेल्या उंदीर डसल्यास १ डबीस किं. १। रु.

१६ मेहानें अगर उष्णतेनें पाय उलून रक्त जाणें व संधि दुखणें ह्यावर १ डबीस किं. १॥ रु.

१७ महामारीवर अगदीं जल्द गुण एक मनुष्यास १२ गोळ्या ५० गोळ्यांच्या डबीस किं. १०–

१८ गर्मी उर्फ उपदंश संबंधी विकार क्षतें यांजवर १ डबीस किं. १॥ रु.

१९ फसली उर्फ मज्जागतवात व शूळ याजवर लवकर १५ मिनिटांत गुण १ डबीस किं. ॥· हें १५ मनुष्यांस पुरेल.

२० कऊळ, नळगुद, पंडु, सूज व मुखरोग ६५ व सन्निपात १३ यांवर १ डबीस किं. १॥ रु. ही ३ मुलें व २ पुरुषांस पुरेल.

२१ सुवर्णमालिनीवसंत खात्रीचा १ तोळ्यास किं. ७ रु.

२२ योगराज गुगुळ १ तोळ्यास ४॥ रुपये.

२३ नामर्द ह्मणजे नपुंसक कितीहीं दिवसांचा असो तरी तो तीन दिवसांत दुरुस्त खात्रीनें होईल. १ बाटलीस किं. ३ रु. गुण न आल्यास पैसे परत मिळतील.

२४ डोक्यांतील फूळ वडस रातांधळें लाली खपरी चुळ चीपडे गळती याजवर १ डबीस किं. १०६

या शिवाय जास्त माहिती मागविल्यास देऊं. व कोणी योग्य औषधें हमेशा मागवून विक्री करील त्यांनीं विक्री करून पैसे मागाहून पाठवावे.

(पत्ता व सही) शिवचरनगीर रामगीर
वैकुरणखेडकर अकोला गंगाधरचे
माडीवर चौकांत दवाखाना.
वऱ्हाड.

## नमुना नंबर १४३.

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें. ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्याविषयीं जाहिरात.

सन १८८९ चा अक्ट ७ कलम ६ प्रमाणें.

दिं. कि. क्लास १५ मि. नंबर ७ / १८९२

विद्यमान स्पेशल असिस्टंट कमिशनर साहेब नि० अकोला यांचे कोर्टांत.

नांव गणपत वल्लद वनसिंग अ० पा० करणार मातोश्री गोपिकाबाई मर्द वनसिंग राहणार अळंद तालुके व जिल्हा अकोला यांस मयत.

वनसिंग बापाचें नांव विठोबा राहणार अळंद तालुके व जिल्हा अकोला. याचें कर्ज वसूल करीतां येण्यासाठीं सरटी फिकीट मिळावें म्हणून सदरहु अर्जदार यानें अर्ज केला आहे त्याजकरितां सदरहु मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यांस जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्याणीं ता. १३ माहे आगष्ट सन १८९२ इ. रोजीं सदरहु अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपआपले हक्काविषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख २५ माहे जुलाई सन १८९२ इ०

V. N. Dandekar-
शिक्का. सिव्हील ज्यज.

## पत्रव्यवहार

ह्या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मताशी मिळूनच असतील असें समजूं नये.

मुक्काम मालेगांव ता०२४।७।९२.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

कृतानेक सा० नमस्कार विनंती विशेष पावसाळा सुरू झाला तेव्हां पासून आज पर्यंत चांगली वृष्टी होऊन पिकें उत्तम आहेत. शेती लोक मोठ्या आनंदांत आहेत. हा गांव जहागीर असून येथें इनामदार यांची सत्ता चालते. ते करतील ती पूर्व दिशा. येथील हवा चांगली. गांव उंचवट्यावर असल्यामुळें हवा फार सर्द नसते. गांवाच्या माना प्रमाणें येथें सर्व सोयी आहेत. येथें एक मराठी शाळा आहे. ती अगदीं मोडण्याच्या बेतांत होती. परंतु येथें मि. त्रिंबक महादेव भिडे यांची नेमणूक झाली होती त्यामुळें त्यांच्या अतिशय खटपटीनें तीन वर्षें सुमार त्यांनीं ती शाळा चांगल्या स्थितींत ठेविली. परीक्षेचा निकाल ही चांगला होत असे. त्यांना पगार वीस रुपये मिळत असे व शिवाय पोस्टा पासून ७।८ रुपयांचें उत्पन्न असे. मि. भिडे हे मराठींत फार हुशार असत. त्यांनीं एक शुद्धलेखनाचें पुस्तक केलेलें आहे. ते नेहमीं उद्योगीं असत. ते येथें लोकांत इतके प्रिय झाले होते कीं, त्यांनीं येथून जाऊं नये असें सर्व गांवकरी लोकांच्या मनांत होतें. परंतु आह्मी पडलों दुर्दैवी त्याचें सुसमागमाचे सुख आमचे नशिबी कोठचें. त्या सारखी त्यांना बुद्धी होऊन पोष्टा पासून होणाऱ्या उत्पनाचें नुकसान करून घेऊन वीस रुपयावर वाशीम येथें देवपेठेंत हेड मास्तरचें जागीं गेल्या जून महिन्यांत बदली करून घेतली. व त्यांचे जागीं बारा रुपयाचे मनुष्याची बदली विसावर येथें झाली. शिवाय पोष्टाचें उत्पन्न. ह्या नवीन मास्तरांना येथें येऊन सुमारें दोन महिने होत आले परंतु अझून त्यांचे चित्त स्वस्थपणें शाळेकडे लागल्या सारखें दिसत नाहीं. व हे लोकांत फारसे मिसळत नसल्या मुळें लोकांची ही भक्ती त्यांचेवर अजून बसावी तशी बसल्याचें दिसत नाहीं. व कदाचित थोडक्या दिवसांत त्यांचें लक्ष येथें स्थिर झालें असतें परंतु अशी मोठी दुःखाची गोष्ट घडून आली कीं आमचे परम स्नेही मि. भिडे हे वाशमास जाऊन दीड महिना झाला नाहीं तोंच त्यांचेवर मृत्यूनें धाड घातली. व त्यांना ता १८–७–९२ इ० रोजीं मृत्यू लोकांतून ओढून नेलें. ते अजारी पडल्याची बातमी येथें येऊन पोंचल्या बरोबर गांवकरी लोकांत दुःख उत्पन्न होऊन जो तो ह्मणूं लागला कीं, ईश्वरा आमचे त्रिंबकरावांना जगीव. कित्येक लोक त्यांचे भेटी करितां वाशमास मुद्दाम गेले. आमचे गांवचे राजे साहेब ही गेले होते. औषधोपचार राजे साहेबांनीं वाशमास राहून पुष्कळ केला परंतु ईश्वरी सत्तेपुढें इलाज चालला नाहीं. मृत्यूची वार्ता येथें येऊन पोहोंचल्यावर सर्व गांवकरी लोकांस दुःख झालें. व त्रिंबकरावाचे गुण आठवून ते शोकाकूल झाले. त्रिंबकरावजींची पत्नी येथें आपल्या दिरा बरोबर चार अनाथ झालेली बालकें घेऊन तारीख २१।७।९२ रोजीं प्रातःकाळीं आली होती. तिला पाहून तर लोकांनीं हंबरडा फोडला परंतु बिचारे करतात काय! ही अकस्मीक गोष्ट घडल्यानें वाशीमची जागा खाली झाली आहे. त्या जागे करितां आमचे येथें नवीन आलेले मास्तर खटपट करित आहेत असें दिसतें. गांवात व मुलांत अशी वार्ता परसली आहे कीं ते मुद्दाम रजा घेऊन आकोल्यास मे. डायरेक्टर साहेब बाहादुर यांचे भेटी करितां ह्याच कामासाठीं जाणार आहेत. ह्या वार्तेंत खरें किती परमेश्वर जाणे. परंतु ही गोष्ट खरी घरून चाललें तरी पण डीरेक्टर साहेब ही गोष्ट कबूल करणार नाहींत. कारण येथें ते नुकतेच आले असून येथील काम दाखविल्या शिवाय त्यांचे ह्मणण्या प्रमाणें बदली होईल असें वाटत नाहीं. परंतु न जाणो काळाचा महिमा. बारा वरून पंधरामध्यें टाकून नसे त्यांना वीस मिळाले त्याच प्रमाणें कदाचित त्यांचे नशिबानें वरिष्टांना बुद्धी झाली तर हे पोस्टा पासून होणारें उत्पन्न टाकून जात आहेत तेव्हां कदाचित यांना येथें हेडमास्तरचें काम करण्याची भिति वाटते किंवा कसें हें समजत नाहीं. शहरांत काम करणें निराळें व खेड्यांत करणें निराळें. शहरांतील वावरलेला मास्तर खेड्यांत यशस्वी होईल तर तो खरा करामती असें समजतें. कदाचित् अशी कोणी शंका काढील कीं त्रिंबकराव नुकसान करून कां गेले? तर याचें उत्तर असें येईल कीं, त्यांनीं येथें तीन वर्षें राहून गांवाच्या मानानें शाळा जितक्या चांगल्या स्थितींत ठेवली तितकी ठेविली होती. तेव्हां त्यांच्या कामाबद्दल न्यायी मनुष्य कांहीं ह्मणेल असें वाटत नाहीं. आतां मे० डायरेक्टर साहेबांना त्याच प्रमाणें आमचे जिल्ह्याचे मे. डे. ए. इन्स्पेक्टर सा० यांना ही विनंती आहे कीं, वारंवार मास्तर लोकांच्या बदल्या करू नये. त्यांना कांहीं काळपर्यंत कामें दाखविल्यावर बदली करणें, बढती देणें, ह्या गोष्टी नीतीला ठीक दिसतात. कळावें. अपरिचिताचा लोभ

करावा.

आपला
"क्ष"

वऱ्हाडसमाचार

मिती श्रावण शुद्ध ८ शके १८१४

आफगाणिस्थानचे अमीर व हिंदुस्थान सरकार यांच्या दरम्यान बाजोर संस्थाना संबंधानें लढा पडला आहे आणि जावजवाबी एकमेकाची थैलीवर थैलीवर रवाना होत आहे. अमीर अबदूल रहिमान यांचें ह्मणणें कीं बाजोरच्या संस्थानिकानें आमची आगळीक करूं नये आणि त्यानें आमच्या राज्यकारभारांत विघ्न केलें तर आह्मी त्याची खरपूस खबर घेण्यास चुकणार नाहीं. इंग्रज सरकार ह्मणतात कीं बाजोरचा गादीवाला आमच्या सत्ते खाली आहे तेव्हां त्याच्यावर आमच्या हुकूमा वाचून अमीरानें शस्त्र उचलूं नये. बाजोरवाल्यांनीं अमिराची आगळीक व अपराध केला ह्मणून अमीराच्या सेनापती मार्फत बाजोरच्या मुलुखांत अल्पस्वल्प चकमकी घडल्या. ही संधि पाहून हिंदुस्थान सरकार अमीरावर आपला जोरा कितपत चालतो हें ताडण्याच्या भरीस पडल्याचें कळतें. इंग्लंड व रशिया या उभय राष्ट्रा मध्यें आफगाणिस्थान शह्यास गुंतलें आहे. आफिगाणिस्थान देश ह्मणजे खुषकीच्या वाटेनें हिंदुस्थानचा सरकिल्ला होय आणि तो देश शत्रूंच्या हातीं लागूं नये ह्मणून लिटनसाईच्या वेळीं त्या देशांशी युद्धसंग्राम झाला व अमीर कधीं बळी आहे, कधीं दुर्बळी आहे असें करीत करीत हिंदुस्थान सरकारनें त्याला इंडियाच्या खजिन्यांतून सालिना कांहीं लक्ष रुपयांचें पेनशन ही करून दिलें. अमीर दुहेरी कचाट्यांत सांपडला असून त्याला एकीकडे विहीर एकीकडे तळें असें झालें आहे. रशियन सरकारास तो मिळाला नाहीं इतकेंच नव्हे तर तो इंग्लिशांचा पक्का दोस्त आहे. आपण इंग्रजांशी सख्यत्वानें वागावें, त्यांचा बलाढ्य आश्रय सोडूं नये आणि प्रसंग बेतला तर रशियांशी त्यांच्या साह्यानें लढाई ही द्यावी असें त्याला पक्कें वाटतें आहे. इतकें आहे तरी आफगाणिस्थान देश नष्टस्वातंत्र्य, पराजित व इंग्लिशांच्या हस्तगत व्हावा अशी त्याची बिलकूल इच्छा नसून तो इंग्लंड अगर रशिया या दोन्ही देशाचें पाऊल आपल्या राष्ट्रांत विनाकारण येऊं देत नाहीं. इंग्लिशांनीं आपल्या देशांतला राज्यकारभार चालवावा हें त्यांस तिळप्राय आवडत नाहीं आणि आमच्या सरकारचा निजध्यास बकवृत्तीचा, तडाख्यांत सांपडेल तें गिळंकृत करण्याचा आणि हिंदुस्थानच्या शिबंदी वरचा हा देश पूर्णपणें काबीज करण्याचा असा दिसतो आणि या धोरणानें आमचें सरकार सदोदित चापचाचापची, बलाबलाची परीक्षा आणि सामदामाची कारस्थानें करून अमीरास अधिकाधीक जेरीस आणण्या साठीं हर प्रयत्नानें त्यांस जर्जर करीत आहे. आंग्लो इंडियन पत्रकारांनीं अमीर इंग्लिशांचा दोस्त नाहीं अशा मतलबाची ओरड चालविली आहे त्याला कारण कीं अमीर हिंदुस्थान सरकारला आपल्यावर साम्राज्य स्थापूं देत नाहीं. इंग्लंड व आफगाणिस्थान या उभय राष्ट्रांचा संबंध किती ही एकोप्याचा अगर सलगीचा असला तरी अमीर कांहीं मांडलिक राजा नाहीं. तो स्वतंत्र आहे तेव्हां तो आपला अंमल अगदीं व्यवस्थशीरपणें चालवितो त्यांत सिवप्रेशीन रेल्वेला व्यत्यय करितो, चानाम मुक्कामीं अखरचें स्टेशन बांधू देत नाहीं, पाद्री लोकांचें देऊळ अगर मिशिनेरी मंडळी यांचा शिरकाव आफगाणिस्थानांत होऊं देत नाहीं, व्यापारांत विलायती मालावर कडक जकाती ठेवितो, कंदहारच्या मध्या पर्यंत रेल्वेचा प्रसार करण्यास नाखुष आहे इत्यादि अनेक गोष्टी अमीराला आपल्या स्वतंत्रपणा साठीं कराव्या लागतात. या कृतींत त्याचें पाऊल वांकडें आहे असें कोणा ही शोधक व न्यायी मनुष्यास वाटणार नाहीं इंग्रजांनीं त्याच्या देशावर आपलें स्वामित्व व प्रभुत्व स्थापण्याच्या कलहोत्पादक उद्योगास लागूं नये आणि आपला दोस्त म्हणविलेल्या देशावर दुसऱ्याचा पगडा बसू न देतां योग्य प्रकारें अमिराचें संरक्षण करावें हें आह्मी सरकारचें पहिलें कर्तव्य समजातों. आणि या कर्तव्यास सरकार ज्या मानानें विसरणार नाहीं त्या मानानें इंडियाचें कल्याण, इंग्रजांची बहादुरी, दोस्ती, व पादशाही हीं चिरस्थायी होऊन वृद्धिंगत पावतील.

अमेरिकेंतील चिकागो शहरीं पुढील सालीं जगाचें प्रदर्शन होणार आहे त्या प्रदर्शनाच्या कामीं प्रत्यक्षपणें हिंदुस्थान सरकारनें आपल्या कडे कांहीं भाग घेतला नाहीं तरी त्या समयाला हिंदुस्थानांतील पदार्थ प्रदर्शनांत मांडले जावेत या हेतूनें 'इंडियन टी असोशीएसन' नांवाची हिंदुस्थानच्या चहाची लागवड व व्यापार करणारी मंडळी आहे. तिला चाळीस हजार रुपये व हिंदुस्थानांतील कलाकौशल्याचे पदार्थ चिकागो कडे धाडले जावेत म्हणून मि. टेलरी नांवाच्या साहेबांस दहा हजार रुपये या प्रमाणें दोन देणग्या देण्याचें सरकारनें कबूल केलें आहे आणि प्रांतो प्रांतीं त्यास आवश्यक लागणारी मदत सरकारी अधिकाऱ्यांनीं त्यांस द्यावी असा एक बटकूम काढिला आहे. आम्हांस नवल तें इतकेंच वाटतें कीं आमचे लोक सरकारा पाशीं फार अपरीचित असावे, त्यांनां प्रदर्शांना सारख्या गोष्टींची देखील हौस नसावी अगर त्यांनीं सरकाराजवळ त्या बाबतींत मदत मागूं नये. आमच्या नेटिवाला विचारतो कोण अथवा त्याला चिकागोच्या प्रदर्शनाची आवड असली व तो मोठा कुशल, चतुर, व शोधक गृहस्थ असला तरी त्याला सरकारांतून मदत कोठची मिळणार!

जपान देशांतील स्त्रीशिक्षणसंवर्धक मंडळीच्या विज्ञप्ती वरून सर एडविन आरनोल्ड साहेबांनीं त्या देशांतील स्त्रीशिक्षणावर सुश्राव्य व्याख्यान दिलें. त्यांनीं अनेक विचार लोकांच्या पुढें मांडले त्यांत एक विचार आमच्या हिंदुस्थानच्या लोकांनीं अवश्यें करून ग्रहण केला पाहिजे. ते म्हणाले कीं पाश्चिमात्य सामाजिक सुधारणेचा लवलेश ही जपानच्या स्त्रियांस लागू देऊं नका कांकीं त्या सुधारणेशी संसर्ग घडला तर जपानाचे वाईट दिवस पुढें आले आहेत असें सर्वांनीं समजावें. खऱ्या अंतःकरणाच्या, प्रांजळ बुद्धीच्या व मोकळ्या स्वभावाच्या या इंग्लिश गृहस्थाच्या म्हणण्याचा आमच्या मवाळ सुधारक म्हणून नाणवलेल्या लोकांनीं नीट विचार करावा आणि इंग्रजी सुधारणे पासून अलिप्त व निराळें राहून स्त्रीशिक्षण देतां येईल अशी व्यवस्था काढावी.

'अनंत राष्ट्रीय धर्मार्थ संस्था' या नांवाची एक मोठी संस्था सर्व देशासाठीं स्थापन करण्याचें श्रेय बिवारचे राजे रामसिंग आणि म्यानेजर कुडालप्रभु अनंतरावजी नारायणराव यांच्या कडे आहे. या संस्थेचा एक फंड उभारला आहे आणि त्या फंडाची जमा आज तागाईत चाळीस हजार रुपये झाली आहे. गरीब, अनाथ, पंगु, खुळे, इत्यादि मनुष्यांचें संरक्षण करणें, आणि त्याच प्रमाणें शरिरानें धट्टकट्टे व उद्योगक्षम परंतु शारीरिक व्याधींनीं परवश, निर्धन, दुबळे व सामर्थ्यहीन बनलेल्या लोकांस पोट भरूं लागण्याची ताकद येई पावेतों त्यांचें संगोपन करणें, आणि बेवारशी व चारापाणी न मिळाल्यानें मृतप्राय अशीं जनावरें पांजर पोळांत गोळा करून त्यांची नीटपणें निगा राखणें अशा तीन प्रकारच्या गोष्टी धर्मादाय ह्मणून करण्याचा या संस्थेचा उद्देश आहे. हा उद्योग स्तुत्य असून सर्व जनाच्या आदरास पात्र आहे. अन्नछत्रें, सदावर्तें व घरोघर व दारोदार होणारा दान धर्म हीं सर्व वरील उद्योगास धरूनच आपल्या देशांत चालली आहेत आणि त्याच प्रमाणें अलिकडे गुराढोरांच्या संरक्षणार्थ गोरक्षणी सभा निघाल्या आहेत त्या ही वरील धर्मादायाच्याच प्रकारच्या आहेत. तेव्हां वरील धर्मार्थ संस्थेला निराळें स्वतंत्र अस्तित्व देण्याचें प्रयोजन वाटणार नाहीं परंतु आपल्या देशांतील प्ररूढ, जुन्या व वंशपरंपरेच्या धर्मार्थ संस्था व चालीरिती सांप्रतच्या मनूला व राहटीला जुळत नाहींत आणि त्या पासून व्हावा तसा उपयोग होत नाहीं ह्मणून वरील सारख्या राष्ट्रीय संस्थेची मोठी अवश्यकता आहे. पण आह्मास अशा बहुव्यापक व लोकोत्तर धर्मार्थ संस्थेच्या भक्कम पायाची व तिच्या चिरायूपणाची मोठी शंका वाटते. जात, धर्म, पंथ वगैरे सर्व भेद बाजूस ठेऊन हिंदु युरोपियन, मुसलमान वगैरे अठरा पगड जातीनीं एक दिलानें व परमार्थ बुद्धीनें मदत करावी अशी या संस्थेची सर्व आबालवृद्धांस विनंती आहे. ईश्वर करो आणि अशा धर्मार्थ संस्थेचा रोपा काळें करून बहुछाय, पुष्पफळांनीं ओथंबलेला, व अति विस्तृत असा वृक्ष बनो!

## The Berar Samachar

### MONDAY, AUGUST 1 1892

From the last report of the Police Administration in Berar for 1891 Mr. F. S. Bullock C. S. has drawn two general and fast-prevailing facts viz the increase in the statistics of crime against life and property and the manifest incapacity of the Police force to check efficiently the increasing volume of crime. This progress in crime seems to be in the same tenor with the progress of crime in other provinces as well as nations. Rev. Mr. Morrison has written a nice essay upon the increase of crime in England and Wales. He is very cautious and careful not to lay down haphazard and erratic propositions. He has built his conclusions upon the records of the last thirty years. It is needless to go into details but it is both instructive and interesting to read the results he has arrived at—

"Our injury into the movement of crime in England and Wales as tested by the statistics of cases tried both summarily and on indictment is hostile to the idea that this country has recently entered upon a career of sudden and unexampled moral renovation. General considerations based upon an ordinary knowledge of mankind are in harmony with statistics in giving no sort of sanction to such an idea. The old and woll-worn saw, 'Natura non facit saltum,' contains the gist of all sound reasoning on human affairs, and is especially applicable in the sphere of moral progress, which is indubitably one of the slowest of social growths. But the immense advance made by the present century in dominating the forces of inanimate nature, besides obscuring this fundamental truth, has also imperceptibly developed the belief that a corresponding power has been acquired over the darker passions of mankind. It has therefore come to be taken for granted that an intimate connection must somehow exist between the expansion of material and of moral wellbeing The truth of this consoling assumption may possibly be demonstrated in the far-off future when the discordant elements at present raging in society are brought into harmonious concert, but as the dayspring of that glorious time is not yet perceptible on the horizon, Rousseau's contention that a high civilization makes men worse instead of better may be just as near the mark. In any case the evidence of criminal statistics is decisively on Rousseau's side. The great centres of modern civilisation are large cities, but it is a melancholy fact that splendid capitals like Londen, Paris, and Berlin contain in proportion to their population by far the largest number of criminals and the criminally disposed. The figures alone are enough to show that the assumed affinity between material and moral advance is destitute of foundation; on the contrary, they lend enormous support to the theory that where there is most civilisation there is also most crime." The perusal of the above note will confirm us in what the Judicial Commissioner has said.

If modern times make an advance in civilization and the standard of human comforts it is painful to observe a bad cause at work to undermine the rapid and effective work of reform and progress. Whatever accelerates the growth of knowledge & comforts & improves upon the old stock ought to win the palm of all influences and circumstances that tend to model social life suitably with the enlightened principles and refined manners of the present times. The stride of civilization, however wide and solid, does not cover a mere bed of roses but carries with it a stretch of thorny bushes and shrubs. Great ideas, no doubt domineer the world but the ideal falls too short of the Utopean progress because there is no scope for the expanse of material prosperity of man's estate. When a certain degree of improvement has been reached and when a distant leap has been effected in the vista of all material advancement it is not possible to amend the general lot of mankind. Different and varying interests rival with each other and give rise to a conflicting and jarring clash of individual concerns. With this rivalry of opposing and antigonastic interests begins a gradual rise of crimes against life and property. There is ever present a war of

पुरवणी.

# प्रसिद्धिपत्र.

इंग्रजी भाषेंतील अनेक ग्रंथांचें सहाय्य घेऊन मराठींत लिहिलेला

उपयुक्त व अत्यंत रमणीय ग्रंथ.

## ज्योतिर्विलास

अथवा



हा ग्रंथ अगदीं सोप्या भाषेंत व मनोरंजक पद्धतीनें लिहिला आहे व विषयही रमणीय आहे, ह्यां मुळें विद्वानापासून अडाण्यापर्यंत सर्वांना समजेल व सर्वांना आवडेल. नकाशांच्या सहाय्यानें मुख्य मुख्य ३०० नक्षत्रें वाटेल त्याला उत्तम ओळखतां येतील. नकाशांचें काम फार पहाण्यालायक आहे.

**ह्या ग्रंथांत खालीं लिहिलेले भाग आहेत.**

१ हा काय चमत्कार आहे ?
२ स्वप्न खरेंच !
३ दिव्य भ्रमण.
४ देवांचीं स्वर्गस्थ मंदिरें.
५ आकाशस्थ ज्योतींविषयीं लोक काय ह्मणत आले?
६ रजनीवल्लभ ( चंद्र ).
७ सूर्य.
८ पृथ्वीवरील सर्व घड्याळांचें घड्याळ.
९ पंचांग.
१० ग्रहणें.
११ बुध.
१२ ग्रहांचे उदयास्त.
१३ शुक्र.
१४ मंगळ.
१५ गुरु.
१६ शनि.
१७ युरेनस व नेपच्युन.
१८ धूमकेतु.
१९ उल्का.
२० तारासमूह, आकाशगंगा इत्यादि.
२१ विश्वरचना.

(वरील प्रत्येक भागाची रचना तुटक असल्यामुळें मध्येंच वाटेल तो वाचतां येईल. व तो प्रत्येक घटकाभर वाचण्यास पुरेल असा असून मनोरंजक होईल.)

**मधून मधून वुड्‌कट्‌स् (चित्रें) यावयाचे ते.**

१ ग्रहांचे सापेक्ष आकार.
२ ग्रहांचीं सापेक्ष अंतरें व निरनिराळ्या ग्रहांवरून दिसणारा सूर्यबिंबाचा आकार.
३ दुर्बिणींतून पाहिलेला वय ७ चा चंद्र.
४ पृथ्वी व चंद्र यांचे सापेक्ष आकार
५ चंद्रावरील ज्वलत्पर्वताचें मुख.
६ सूर्यावरील डाग.
७ खग्रास ग्रहणांत सूर्याभोंवतीं दिसणारें प्रभाकिरीटमंडल आणि तेजःशृंगें.
८ सूर्यबिंब, सूर्यकवच आणि कवचावरील तेजःशृंगें.
९ शुक्रकलावृद्धिक्षय.
१० मंगळावरील समुद्र आणि देश.
११ दुर्बिणींतून पाहिलेला गुरु.
१२ शनि आणि त्याचीं कडीं.
१३ धूमकेतु.
१४ उल्कापथ.
१५ दुर्बिणींतून फार विलक्षण आणि अति मनोहर दिसणारा सूक्ष्मतारकापुंज.
१६ अग्निमेघ.
१७ विश्वरचना.
१८ विश्वरचनेचें स्वरूप.

( शिवाय नक्षत्रांचे ३ नकाशे. )

रात्रीं चांदण्यांत बसलें असतां, क्षणभर आकाशाकडे दृष्टि गेली, आणि रमणीय चंद्र, अनंत तारका, व दुसरे कित्येक विलक्षण चमत्कार लक्ष्य वेधून पाहिले ह्मणजे मनुष्याला एक प्रकारचें मोठें समाधान वाटतें, व ज्या सर्वशक्तिमान् परमेश्वरानें आकाशांत ते दिव्य गोल व चमत्कार उत्पन्न केले त्याचें अगाध कर्तृत्व मनांत येऊन तो मोठा थक्क होऊन जातो. आणि त्या बरोबरच अकाशांतील विविध गोष्टींचें ज्ञान करून घेण्याची त्याला अत्यंत उत्कंठा उत्पन्न होते. अशा वेळीं जर कोणी माहिती देणारा भेटला, तर किती मौज होईल बरें ? परंतु खरोखरच पुष्कळांची ह्या बाबतींत निराशा होते ! कारण, प्रत्येक मनुष्य सर्वज्ञ नाहीं, आणि पाश्चिमात्य विद्वानांनीं दुर्बिणीच्या साहाय्यानें शोधाची पराकाष्ठा करून तदनुसार इंग्रजी भाषेंत जसे अनेक ग्रंथ लिहिले आहेत तशा प्रकारचे ग्रंथही मराठींत नाहींत. करितां आह्मीं हा विचार मनांत आणून लोकांना ज्ञानप्राप्ति होऊन दोन घटका मौज करितां येईल अशा तऱ्हेचा वरील आकाशविषयक ग्रंथ मुद्दाम तयार करवून तो छापीत आहों. ह्या ग्रंथाचे कर्ते रा०रा० शंकर बाळकृष्ण दीक्षित हे आहेत. हे गृहस्थ धुळें-ट्रेनिंग स्कुलांत शिक्षक असून ते खगोलविद्येंत अत्यंत प्रवीण असल्याचें सर्वत्र ऐकून माहितच आहे. हा ग्रंथ बराच मोठा होईल. व त्याची भाषा अतिशय सोपी, साधी व मनोरंजक लिहिली असल्यामुळें ह्या विषयाचा लाभ सर्व प्रकारच्या मराठी वाचकांस सारखा व चांगला मिळेल. शिवाय ह्या ग्रंथांत मधून मधून आकाशांतील निरनिराळ्या देखाव्यांचे १८ वुड्‌कट्‌स् ( लांकडावर कोरलेलीं चित्रें ) आम्ही घालणार आहों, त्यामुळें हा ग्रंथ फारच रमणीय होईल. आणि शेवटीं नक्षत्रांचे ३ नकाशे जोडणार आहों. त्यांच्या सहाय्यानें आमच्या प्राचीन ग्रंथांत वर्णिलेल्या सुमारें ३०० तारकांची ओळख कोणाच्याही मदतीवांचून करून घेतां येईल. ह्यांतील नकाशे व चित्रें बहुतेक आजपर्यंत मराठी पुस्तकांत कोणीं पाहिलींच नाहींत अशीं असून तीं कै. रा. रा. जावजी दादाजी–निर्णयसागर छापखान्याचे मालक–ह्यांचे मित्र रा. रा. श्रीरंगजी ह्या कुशल चित्रलेखकांकडून फारच सुबक व नाजूक रीतीनें तयार होत आहेत.

हा ग्रंथ तारीख १९ सप्टेंबर १८९२ रोजीं तयार होऊन त्या सुमारास ग्राहकांस मिळेल. ज्यांची इच्छा असेल त्यांनीं तारीख २० आगस्टच्या आंत वर्गणीदार व्हावें. मागाहून विक्रीकरितां पुस्तकें मुळींच नाहींत. वर्गणीदारांस किंमत १॥ रुपया व ०।२।६ टपालखर्च पडेल. ५ प्रती घेणारांस टपालचा खर्च माफ होईल. किंमत रोख पाठवावी किंवा "ग्रंथ तयार झाल्यावर व्हाल्युपेएबलनें पाठविण्याविषयीं" ता. २० आगस्टच्या आंत पत्रद्वारें कळवावें.

बळवंत गणेश दाभोळकर—प्रसिद्धकर्ता.

**आमचा पत्ताः—बळवंत गणेश दाभोळकर, शनिवार पेठ, खबुतरखाना, घरनंबर ३४, पुणें.**

"जगद्धितेच्छु" प्रेस पुणें.

clashing views about the nature of estate and property. Many candidates fight to win the same possessions and the game must decide favourably with the mightiest of the parties. Such a state is possible as the rule that might is right gets in the long run the better in the field of human activity. We have thus attempted to show that the tendency of the modern times inspite of the scientific inventions and appliances is to assert the truth that the fittest will outlive all his fellow-companions. Legislature has artifically restricted the action of this ruling principle by giving liberty, equality, and freedom to the weak as well as to the powerful from the lowest hut to the highest palace. But man has undone human efforts in the direction of legislature. All talk of righteousness, moral stamina and godly benevolence disappear in the brunt of man's fight against his fellow-man. In the spirit of a similar observation the immortal poet Wordsworthe has noticed how nature's plan is marred, and proclaimed to the world—'See what man has made of man?

We have then made clear that we feel ourselves to approach nearer to the Roussea's prediction that high civilization makes men worse instead of better.

We are not of a pessimistic turn of mind and we do not dislodge man's genius from the high pedestal of ameliorating human estate. We have firm faith in the inventions of mankind to make good our lot in the world. The cup of life that is given to us is not full of miseries. We have not come nearer even the acme of material wealth and with us the earth is full of grand possibilities in the way of bettering our status. Even with limited and fixed means at our disposal our mind and heart are expansive enough to derive pleasure and to make life pleasant by broadening our sympathies and distributing even the little we have amongst those whom our conduct can affect and bring within our influence. But this sort of education is not spread. The general masses of people are taken with too much of world's pleasures and have little leisure to instruct their own hearts. We no doubt firmly believe in the grand agency of education and it is education that can suppress the bulk of crime-registers.

---

The Municipal Committee of Akola has rightly condemned the action of the Local Govt. in framing Draft rules for curtailing the powers of the Committees in sanctioning expenditure on original works as well as on repairs. We see what the signs of the time indicate and still we conscientiously raise our voice to maintain in tact the little measure of local-self-Govt. that is allowed to us within our municipal limits. There is not the slightest reason to be dissatisfied with the work turned out by the Berar Municipalities and no man of honest sympathies and liberal principles will stigmatize the Municipal Government with something of a failure. It is indeed a short-sighted and illiberal view that has led the Resident to propose new rules of restricting the powers of the Municipal bodies in connection with expenditure. We conclude our prayer to the Resident in the words of the resolution which the Akola Municipality has come to:—

The Committee regret that the Resident should have been pleased to propose rules restricting the powers of the Municipal Committee in respect of sanctioning Expenditure on Public Works, which, they submit has never been abused by them, and earnestly pray the Resident will reconsider his decision: The Committee are of opinion that the present Rule 43 published in notification No. 256 Dated 10th December 1888, which the Draft Rules propose to substitute should be retained as it is, except with a modification that a clause be added to it purporting to the effect that the Municipal Committee should submit with their annual Budget plans and estimates of the original works that the Committee intend to execute during the year of the Budget, with a memo showing in detail the necessity of the works."

---

The report of the Sanitary Commissioner for 1891 is, as usual, fully exhaustive, learned, and instructive. It bears an eloquent testimony to the excellent work which Doctor Little has been able to point out as the results of a year's energetic, zealous and unsparing labours. In the spirit of advocating his urgent sanitary reforms Dr. Little has travelled a little astray and Colonel Mackenzie has promptly warned him to mind his own business & not to allow his deviations to trench upon the grounds of other fellow-officers. Dr. Little is not pleased with the inefficient and unsatisfactory working of the District Sanitary Boards. He wants all things to be effected immediately and without delay— but he forgets that his expectations soar high above the limited possibilities of action and reform. We hope to review at some other time the full report but before we conclude we heartily invite our readers to peruse the following para from the Resident's proceedings which is at once precise, pointed and instructive:—

"The District Sanitary Boards held the prescribed number of meetings and disposed of the business before them, but the Sanitary Commissioner is not satisfied with the practical results achieved. He complains that little progress has been made in village sanitation, that funds are scanty, that Tahsildars shirk this branch of their work, and that a law on village sanitation is needed. The Resident is not surprised that Dr. Little should be appalled by the magnitude of the task before him, or that he should be discouraged by the comparative smallness of the year's outturn of actual work. Rural sanitation is perhaps the most difficult— and certainly it is not the least important—problem of modern administration in India. and the Resident is therefore glad to be able to agree with Colonel Mackenzie that, although local boards move slowly—and it is to be remembered that they have only very recently come into operation in Berar—still "greater care and attention is being given to sanitary matters all along the line." Mr. Plowden thinks that it will be no small gain if the limits within which persons should resort for purposes of nature and deposit their household sweepings are demarcated village by village, and if the people are taught to protect the water used for drinking from contamination by human bathing and washing of clothes. If the boards have really enforced these elementary principles of sanitation even in a few villages, they have done good work. Nevertheless Dr. Little's complaint that the village sanitary reports are wholly untrustworthy and that Tahsildars neglect sanitation, deserves attention. Possibly the reports are submitted too frequently and come to be regarded as mere routine. The remedy for carelessness and efficiency on the part of the Tahsildars is to name those who are specially deserving of blame so that such notice as may be necessary may be taken of their short-comings. As to the necessity for legislation, there is a very good circular in use in Berar—Resident's Book Circular No. XVI of 1890, but if its provisions are not sufficient, or if they cannot be enforced, the Resident will be prepared to consider proposals for applying a sanitation law to the province."

---

## वऱ्हाड

नाळापूरचे शेट पोपट लाल यांस अव्वल कोर्टानें दोन वर्षांची सजा दिली त्या बरहुकूम त्यांच्या तुरुंगवासास प्रारंभ झाला पण सेशन कोडता कडे आपील दाखल झाल्या नंतर त्या कोडतानें सदर्हू प्रकरणांतील मुख्य मुख्य मुद्दे पाहून दहा दहा हजारांच्या दोघा जामीनांवर शेटजीची सुटका करण्या विषयीं हुकूम दिला आणि त्या वरून ते सध्यां गेल्या बुधवार पासून जामीनांवर स्वगृहीं खुले आहेत. मोठा बिकट, निर्वाणीचा व अब्रुदारीचा प्रसंग येऊन बेतला आहे खरा!

श्रीमंत माहाराज सयाजीराव गायकवाड याची स्वारी विलायतेस पर्यटण करीत आहे त्यांच्या बरोबर जे इंग्रजी अमलदार कर्नल रेनाल्डस म्हणून आहेत त्यांनीं रजा घेतल्या कारणानें महाराजा बरोबर वऱ्हाडांतील पेनशनदार डेपुटी कमिशनर कर्नल जे. आर. फिटझरल्ड साहेब यांस दिलें असल्या विषयीं आनंदकारक बातमी लागते.

गेल्या अंकीं आम्ही जाहिर केल्या प्रमाणें तारीख २८ गुरुवार रोजीं सकाळीं येथील टौन हालांत शहरवासी लोकांची सभा भरली होती. सभा असावी तेवढी मोठी जमली नाहीं. मुनसिपालिटीचे अधिकाऱ्यांनीं सर्व लोकांस सभेचा उद्देश, सभेंतल्या विषया संबंधानें माहिती, व सभेस येण्याची आवश्यकता या गोष्टी स्पष्टपणें कळविल्या होत्या तेव्हां टाकेजंग सभा भरून कापशी तलावा संबंधानें नवी वरपट्टी बसवावयाची आहे तिजबद्दल संपूर्ण, मुद्देसूत व खुलासेवार विचार होईल अशी आम्हास मोठी आशा होती परंतु नानाविध कारणा मुळें नागरिक लोक एकत्र पुष्कळसे गोळा झाले नाहींत आणि विषयाचा उहापोह सविस्तर झाला नाहीं. तत्रापि पूर्व संकेता प्रमाणें पद्धतवार सभा झाली व त्यांत निर्णयात्मक असें वादान्तीं ठरलें कीं वरपट्टी मुनसिपालिटीनें लोकांवर बसवूं नये. या पुढें मुनसिपाल कमिटी उद्यां काय विचार ठरविते आणि तलावाच्या खर्चाची तोंडमिळवणी कोणत्या नव्या उत्पन्नाच्या बाबीनें भरून काढण्याचें सूचवितें तें पाहण्या कडे लोकांचें लक्ष्य वेधलें आहे.

यवतमाळचे पोलीस सुपरिंटेंडेट मि. इ. माफेट हे रजेवर जात असल्या कारणानें त्यांच्या जागेवर मि. सुवेल असि० पोलि० सुपरि० आकोला यांस नेमलें.

काल सायंकाळीं रा. रा. रघुनाथ वामन देवभानकर बी. ए. असि. मास्तर, हायस्कूल यांचें व्याख्यान झालें. वर्षोत्सव व्याख्यानमालेंतलें हें चवथें व्याख्यान होय. विषय कर्तव्यकर्म ' हा होता.

वाशिमकर 'ज'– स्वायावरील फटका उदाहरणाखद्द दाखल झाला परंतु आपण त्याबद्दल किती प्रकारें व कसे जबाबदार राहाल हें कळलें पाहिजे.

'फिरस्ता' मुक्काम अडगांव– आपलें पत्र फार उशीरा पोंचल्यामुळें या अंकीं त्याची प्रसिद्धी आमच्या आटोक्या बाहेर गेली.

अंजनी बुजरूक तालुके मेहकर येथील एक बातमीदार लिहितो कीं त्या गांवीं एका धनगराचीं मेंढी जवळी तिला पिलूं झालें आहे तें फार चमत्कारिक आहे. त्याला पाय पांच असून पांच ही पायावर तें चालतें आणि अजून सुरक्षित आहे.

मि. आरब्याव नांवच्या गृहस्थास वऱ्हाडांत नवे एक्स्ट्रा असि० कमि० वर्ग २ नेमलें.

### नोटीशीचें उत्तर

सकु मर्द गोविंदा नाइकवाडी रहाणार माना तालुके मोर्तिजापूर इजला–खालीं सही करणार यांजकडून. कळविण्यांत येतें कीं, तूं तारीख १८-७-९१ इ०ची नोटीस दिली ती सर्व खोटी आहे. सुमारें दीड वर्ष झालें तुझे भावानें तुजला नेलें त्या अवकाशांत मी दोन वेळां व माझा बाप एकवेळां तुजला आणण्यास आले असतां तुझे आईनें व भावानें तुजला येऊं दिलें नाहीं. शिवीगाळ करून आह्मा दोघांसही वाटे लाविलें. शिवाय तुझे अंगावर १५० रुपयाचे दागिने व दोन गाई व चार गोऱ्हे मिळून रु. १२५ एकूण रु. (२७५)दोनशें पंचाहातर हे पचविण्याच्या हेतूनें तूं दुसरा घरठाव करणार. वस्तुतः पाहूं गेलें असतां तूं जी नोटीस दिली त्यांत लिहिलें कीं, मी पुरुषत्वांत नाहीं. हें तुझें लिहिणें अगदीं खोटें आहे. ही गोष्ट पंच मिळून कधींच शाबित झाली नाहीं. मी पुरुषत्वांत आहे किंवा नाहीं याजबद्दल खात्री तुला ठाऊक किंवा मला ठाऊक. अशा रीतीनें तुजला कधीं फारकती मिळणार नाहीं. नोटीस पावल्या दिवसांपासून आठ दिवसांचे आंत वरील जिनसा घेऊन माझें घरीं नांदण्यास यावें. न आल्यास तुला, कबज्यांत घेण्या करितां व वरील सामान करितां आह्मास दिवाणी दावा या नोटीशीच्या खर्चा सुद्धां करावा लागेल. ह्मणून दिलें नोटीशीचें उत्तर कळावें ता. ३०-७-९२ इ.

(सही.)

गोविंदा वल्लद भगवान नाईकवाडी रहाणार अकोलें
दस्तुर खुद्द.

---

## नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें. ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्याविषयीं जाहिरात.

सन १८८९ चा अक्ट ७ कलम ६ प्रमाणें.

दिं. कि. क्लास १५ मि. नंबर ११ / १८९२

विद्यमान स्पेशल असिस्टंट कमिशनर साहेब जि० अकोला यांचे कोर्टांत.

सखाराम वल्लद गणपती पाटील. अ. पा. करणार मातोश्री रुखमाबाई जवजे गणपती पा. मुखत्यार गोविंद नारायण राहणार मांजरी तालुके व जिल्हा अकोला यांस मयत.

वनसिंग वल्लद चंद्रभान व गणपती बापाचें नांव वनसिंग राहणार मांजरी तालुके व जिल्हा अकोला. यांचें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटी फिकीट मिळावें म्हणून सदर्हू अर्जदार याणें अर्ज केला आहे त्याजकरितां सदर्हू मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यांस जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्याणीं ता. १३ माहे आगष्ट सन १८९२ इ. रोजीं सदर्हू अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपआपले हक्काविषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख २९ माहे जुलाई सन १८९२ इ०

V. N. Dandekar.

शिक्का. सिव्हील ज्यज.

---

## वर्तमानसार

गणितांचे गूढः—एक गृहस्थाला चाळीस मैल जावयाचें आहे. त्यापैकीं २० मैल तो साधारणतः दर तासास चार मैल प्रमाणें चालला. बाकी उरलेले मैल दर तासास अडीच मैल प्रमाणें, शेवटी शेवटी तर शंभर पावलें जायला त्याला एक तास लागला आणखी त्यांतच पांच ठिकाणीं बसला. शेवटीं एकदांचा घरीं येऊन खुर्चीवर अंग टाकतों, तों एटकन् एक सुई बोचली. तेव्हां त्याचा खुर्चीवरून उठण्याचा वेग दर तासास काय होता?

शिळीं फुलें ताजीं करण्याची युक्तिः—तीं फुलें, त्यांचा अर्धा देठ बुडेल इतक्या उन पाण्यांत तें पाणी थंड होईपर्यंत ठेवून द्यावीं.

सायन्टिफिक अमेरिकन् नांवाच्या मासिक पुस्तकाच्या मे महिन्याच्या अंकांत मि० ओल्ड नांवाच्या एका गृहस्थानें आपल्या कल्पनेनें तयार केलेल्या गाडीचें सुंदर चित्र व हकीकत आली आहे तिची थोडीशी हकीकत खालीं दिली आहे:—

इची रचना घोड्याच्या गाडी सारखी असून दिसायला सुंदर आहे. या गाडींत दोन बसणार व एक चालविणारा, अशा तीन इसमांची बसण्याची सोय केलेली आहे. मात्र आगगाडीच्या डब्यांप्रमाणें इला दुसऱ्या गाड्या जोडल्यास बऱ्याच उतारूंची सोय होईल हें सांगणें नकोच. ही गाडी एका तासांत साधारणपणें पंधरा मैल जाते. चढणी उतरणीवरून चालण्यास या गाडीस कांहीं हरकत नाहीं. या गाडीपासून तिच्या कल्पकानें जे फायदे काढले आहेत ते असेः—घोड्याची चावण्याची, लाथ मारण्याची भिती नाहीं; पुष्कळ चाल पडली असतां घोडा थकून जाण्याची भीति नाहीं; घोड्याची सुश्रुषा करायला नको; घोड्याला चंदी वैरण घालावी लागते तसें कांहीं करायला नको;—म्हणजे गवत, हरभरे वगैरेची जरूर नाहीं—तर याची चंदी म्हणजे थोडेसें पाणी पाजून व थोडेसे कोळसे घालून बत्ती दिली म्हणजे झालें घोड्याच्या वैरण चंदीचे मानाने या गाडीला खर्च फारच कमी म्हणजे दर मैलीं सुमारें ४ पै येतो! अमेरिका म्हणजे मयासुराचें राष्ट्रच म्हणायला काय हरकत आहे बरें?

सन १८७१ पासून १८९१ पर्यंत एकवीस वर्षांत हुंडणावळींत आमच्या देशाचे ६६,००,००,००० रुपये खर्च झाले.

बंगाल ब्यांकेला गेल्या सहा महीत निव्वळ फायदा १४,७५,००० रुपये झाला! अशी एखादी नेटिव्हांनीं काढलेली ब्यांक आहे काय?

अहमदनगरचे जजूसाहेबांस माकड चावलें. तर ती चावलेली जागा कापून काढावी लागली.

यंदां सुरतेस चंडोलाचा मक्ता देण्याचें सरकारानें नाकारलें इतकें औदार्य कोठून आलें!

एका गांवीं एका गृहस्थानें मागील दारीं खणलें तो गंगाजळाचा चंबू सांपडला. तो दोनशे वर्षांपूर्वीचा असून त्यांतलें पाणी मुळींच नासलें नव्हतें. चमत्कारच म्हणावयाचा!

टेक्सास येथें एक मोठा तलाव बांधणार आहेत. त्यांची लांबी १६ मैल होईल, व त्यांत १,०३,०५,८०,४०,८०० घनफूट राहील असें म्हणतात. लहानसा समुद्रच!

रशियांत गुदस्तासारखा यंदांही दुष्काळ पडण्याचा रंग आहे.

न्यूयॉर्क येथें एक मुलगा आहे, त्याला ३ जिभ, ४ हनुवट्या, ३ गाल, ३ कान आणि ४ पडजिभा आहेत. काय विचित्र सृष्टि ही!

टकिन येथें फ्रेंचांच्या एका टोळीवर चिनी लोकांनीं हल्ला करून दोन अंमलदार व हा शिपाई ठार केले व सतराजणांस जखमी केलें.

नासिक येथें कालऱ्याचा उपद्रव फार आहे असें समजतें.

लार्ड डफरीन साहेब फ्रान्स, व रशिया यांचें सख्य होऊं नये असा प्रयत्न करीत आहेत. करम०

बार्शी रोड ( कुर्डूवाडी ) स्टेशन पासून बार्शी गांवापर्यंत वाफेची ट्रामवे करण्या बद्दल सरकारी आर्डरचा मसुदा गेल्या सरकारी ग्याझिटांत प्रसिद्ध झाला आहे त्याबद्दल कोणाला कांहीं हरकती किंवा सूचना करावयाच्या असल्यास त्या तारीख १३ सप्टेंबर १८९२ चे आंत सरकाराकडे लेखी पाठविल्या असतां सरकार त्यांचा विचार करील असें ही प्रसिद्ध करण्यांत आलें आहे.

हैद्राबादपासून उमरकोटपर्यंत ७७॥ मैल लांबीचे नवीन स्टेट रेलवे करण्यास १८,७१,२९४ रुपयांची मंजुरी स्टेट सेक्रेटरी कडून मिळाली. कल्प.

वकिलांचा संप— न्हावी, धोबी, गाडीवाले, गिरण्यांतील मजूर इत्यादिकांचे संप होत असल्याचीं पुष्कळ उदाहरणें पाहण्यांत येतात; परंतु वकील लोकही आतां संप करण्यांस शिकूं लागले आहेत. अमृत बझार पत्रिकेवरून समजतें कीं, बेनोर (बंगाला) येथील डेपुटी कलेक्टरांपुढें एक रेव्हिन्यु काम चाललें होतें. त्यांतील मुसलमान मुखत्यार वकिलावर कोर्टाची बेआदबी केल्याचा च्यार्ज कोर्टानें ठेऊन त्याला रात्री पाहऱ्यांत ठेविला व दुसरे दिवशीं १२ रु० दंड केला. डे० कलेक्टरचें हें कृत्य तेथील वकील यांस अगदीं खपलें नाहीं सर्व वकिलांची माजिस्ट्रेटांनीं बदनामी केली असें त्यांस वाटून सर्व वकील व सर्व मुखत्यार यांणीं संप करून कोर्टाची पायरी चढण्याचें बंद केलें आहे, व वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे अपील केलें आहे.

आस्ट्रेलिया खंडांत पंचाऐशीं मुलांचा एक बाप आहे.

साऱ्या युरोपखंडांत हल्ली ४० राजे आहेत.

एक लक्ष २७ हजार ७४६ एतद्देशी लोक लष्करी शिपाई आहेत पैकीं २४ हजार ३२ मुंबई इलाख्यांत असतात.

बंगाल्यांत एक तांब्याची मोठी खाण सांपडली आहे म्हणतात. बरें झालें. पण फायदा कोण घेणार? 'उंटाचिये पाठी साखरेच्या गोण्या' हेंच खरें.

लंडन शहराची वस्ती सध्यां ५,९०,००,००० आहे.

ब्रिटिश म्यूझियममध्यें जीं पुस्तकें आहेत त्यांच्या यादीचीच दोन हजार पुस्तकें आहेत.

नोकरी मिळणार नाहीं —नादारपणामुळें नोकरी वरून निघालेल्या मनुष्यास पुनः सरकारी नोकरी देऊं नये असा हिंदुस्थान सरकारचा ठराव झाला आहे.

देशत्याग—सन १८९१ सालीं मद्रासच्या ९,४६,५९४ लोकांनीं देशत्याग करून इतर देशाची वाट धरली.

खेड्याची संख्या—मुंबई इलाख्यांत एकंदर ५९,१०३ खेडीं आहेत. गु० सू०

लार्ड सालिसबरी हे पुन्हा राणीसाहेबांशीं खलबत करण्यासाठीं त्यांच्या बंगल्यावर गेले होते आणि त्या उभयतांच्या मतें असें ठरलें कीं हल्लींच्या प्रधानमंडळानें राजीनामे न देतां नवी पार्लमेन्टसभा भरवावी आणि ती सभा भरल्यावर जुन्या प्रधानमंडळानें राजीनामे द्यावे अशी मि. ग्लाडस्टन यांची सूचना पुढें आल्यावर मग त्याचा विचार करावा. राणीसाहेबांचें मत अशा रीतीनें बाहेर येणें चांगलें नाहीं असें पुष्कळांचें म्हणणें आहे व तें योग्यही आहे, कारण या बातमीवरून त्यांचें मत सालिसबरी पक्षाकडचें आहे असें जे दिसतें तें त्यांच्या योग्यतेस कमीपणा आणणारें आहे असें होतें. त्यांणी अगदीं तिऱ्हाईतपणानें असावें हेंच चांगलें आहे असें, आतां यांवरून यो नव्या निवडींत ग्लाडस्टन पक्षाचे लोक जरी जास्त झाले तरी, तुह्मी राजीनामे देऊन एकीकडे व्हा व राज्यकारभार आह्मास आपल्या हातांत घेण्यास सवड द्या, असें त्या पक्षाच्या लोकांकडून हक्कानें सांगण्यांत येईपर्यंत सालीसबरीपक्ष राजीनामे देऊन एकीकडे होत नाहीं असें होतें. येत्या ४ थ्या तारखेस यांचा काय तो निकाल होईलच.

खडकी येथें एक मिलिटरी सर्वे क्लास सुरू करण्याचा विचार चालूं असून त्यांत लष्करांतल्या नन कमिशन्ड आफीसरांस तें शिक्षण देण्यांत येणार आहे.

कलकत्ता व मद्रास यांच्या दरम्यान नागपूर मनमाड या वाटेनें एक सरळ तारायंत्र करण्याचा उद्योग चालू आहे.

हायकोर्टाचें फुल बेंच म्हणजे निमेपेक्षां जास्त जज्ज असें मद्रास हायकोर्टाचें म्हणणें आहे.

उत्तर पामीरच्या शेजारीं रशियाचे फक्त ३०० लोक आहेत, पण क. यानफ बरोबर किती येतात हें पाहणें आहे.

कलकत्यास गलबतावरचे मुसलमानखलाशी व गोरे खलाशी यांच्यांत मारामार होऊन त्यांत एका गोऱ्यानें एका मुसलमानास गोळी घातली. मुसलमान कां उगीच बसले कोण जाणे. बिचाऱ्यांजवळ हत्यार नसेल.

खोरासान येथें पटकीचा वाखा सुरू आहे.

चैना मेल पत्रावरून समजतें कीं, फाइने येथील लोक व तेथील कस्टम कामदार यांच्यांत बेबनाव होऊन मारामारापर्यंत आलें. सरकारी कामदारांपासून लोकांस त्रास होऊं लागला म्हणजे असेच प्रकार व्हावयाचे.

कुंजबिहारीलाल यांच्या खुनाबद्दल उलवार फौजेंतला एक आफीसर मेजर रामचंद्र व त्याचा घोडेवाला, आणि दोन ठाकूर यांस कैद केलें असून ठाकूर व घोडेवाला यांणीं कबूल जबाब दिला असें सांगतात.

दिवाळें काढलेल्या ओरिएंटल ब्यांकेच्या सावकारांस रुपयाचे चार आणे मिळणार असें त्या ब्यांकेच्या लोकांची पर्वा लिलायतेस जी सभा झाली त्यांत झालेल्या हकीकतीवरून दिसतें.

सेलेबलास नावाच्या बेटांपैकीं संगीर नांवाच्या बेटांत ज्वालामुखानें भडका होऊन त्या बेटांत असलेल्या एकंदर सोळा हजार मनुष्यांचा संहार झाला.

मोरोको येथें एक लढाई होऊन त्यांत ३०० लोक मेले.

---

नोटीस

रा. रा. गणाप्पा वल्लद यशाप्पा, मारुती वल्लद यशाप्पा राहणार खेडी तालुके(खामगांव अगर बाळापूर )रा.रा. देवाप्पा वल्लद म्हलापा राहणार निमकरदे तालुके बाळापूर—यांस

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मी त्रिवर्ग मिळून माझी बायको नामें सरू इजला माझ्या मातोश्री समक्ष माझ्याशीं मारहाण करून तिला माहेरीं नेली. त्या गोष्टीस आज बारा महिने होत आले. तेव्हां पासून तुमचा उद्योग असा कीं, हर प्रयत्नानें माझ्या बायकोला संसारांतून उठवून माझ्या हातून फारकत लिहून घ्यावी ऐकीव गोष्टि वरून असा वहीम धांवतो कीं कर्ज रोख्यासंठी आणलेल्या स्टांपावर तुह्मी विश्वासघात करून फारकत लिहून घेऊन मला कर्जाऊ म्हणून १०० रुपये दिले आहेत अशी बतावणी केली असावी आणि माझी खातरी खोट्या बहाण्यानें करावी म्हणून तुह्मी शंभर रुपया पैकीं वीस रुपये देवाण्याचे जुने कर्ज वसूल धरून माझ्या हवालीं ८० रुपये केले. स्टांप कागदावर कांहीं ही असो. तो निव्वळ कर्जरोख्याचा आहे असें आपण सरकारी कोर्टा समोर त्यावर घातलेल्या साक्षीदारांच्या जबानीशी सुद्धां खरा करून जोंकाल पर्यंत दाखविणार नाहीं तो पर्यंत शनिवार सायंकाळीं तारीख २३ जुलै सन १८९२ रोजीं माझ्या नांवानें लिहून घेतलेला स्टांप कागद या लेखान्वयें मी रद्द केला आहे. माझ्या बायकोच्या फारकतीचा लेख त्या स्टांप कागदावर तुह्मी फसवणुकीनें लिहून घेतला आहे अशा गुणगुण तुह्मा त्रिवर्गांच्या व तुमच्या इष्टमित्राच्या बोलण्यानें आमच्या कानीं पडली आहे. तेव्हां मी मुद्दाम या नोटीशीन कळवितों कीं, मी माझ्या बायकोवरील नवरेपणाचा हक्क काडीमात्र सोडला नाहीं, मी तिला पंचमार्फत किंवा तसें न जुळेल तर कोर्ट मार्फत फिर्याद करून तिला तिचा बाप व भाऊ यांच्या ताब्यांतून परत स्वतःच्या ताब्यांत कोर्ट हुकुमानें घेणार आहे. तुह्मी स्टांप कागद कोर्ट मार्फत आठ दिवसांच्या आंत खरा व विश्वासाचा आहे असें न दाखवाल तर विश्वसघातानें खोटा स्टांप कागद लिहून घेतल्याची जबाबदारी खर्चाच्या बाजूनें व पुराव्याच्या बाजूनें तुम्हावर राहील हें पक्कें समजावें. कळावें ता. २५ माहे जुलई सन १८९२ इ०

( सही. )

भोनाप्पा वल्लद शिवाप्पा राहणार निमकरदे निशाणी खुद्द.

---

☞ हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांणीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाची आगाऊ रु० ५ डांक हाशील ०।१३
सहामाही " ३ " ०।८
सालअखेर " ७ " १।०।८
किरकोळ अंकास ........................०।४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।१।०।६
दुसरे खेपेस .........०।१

Rs.
Annum in advance 5 Postage 13 ass
Annum in arrears 7 ,,1Rs· 8 as
Six monthly............3 " 8 as
Single copy............4 ..........................as

# वऱ्हाडसमाचार.

Advertisemen
Below 10 lines...2Rs
per line over10...4 as
Repetition per line3s a

THE BERAR SAMACHAR

VOL XXVI AKOLA MONDAY 8 AUGUST 1892 NO 31

वर्ष २६ अकोला सोमवार तारीख ८ माहे आगष्ट सन १८९२ इ० अंक ३१

## बरार रूरल लॉ.

(२७ अंका वरून पुढें चालूं)

विचार पूस:—

३६. जिल्हा बोर्ड किंवा तालुका बोर्ड कडून सरकारी अधिकाऱ्याकडे जो विचारपूस होण्याची ती प्रायः दि० कमिशनरचे मार्फत व्हावी.

४—रकम (जे) अन्वयें नियम — जिल्ह्याचे साधारण कामाकरितां व जिल्ह्याच्या विशेष भागाच्या कामाकरितां यांच्यांत जिल्ह्याच्या फंडाच्या वाटणी संबंधानें आणि विशेष ठिकाणीं उत्पन्न केलेला पैसा त्या ठिकाणच्या कामा करितां लावण्या संबंधानें.

ज्या हद्दींत पैसा उत्पन्न केलेला असेल त्या हद्दींत तो खर्च करणें:—

३७. तालुका बोर्डच्या हद्दींत उत्पन्न केलेला पैसा होऊं शकेल तेथ पर्यंत त्या हद्दींतील कामाकडे लावावा परंतु कमिशनर याणी मंजूर केलेल्या बजेटांतील योजने प्रमाणें किंवा त्यांच्या विशेष मंजुरीनें त्याचा भाग जिल्ह्याचे साधारण कामाकडे खर्च करितां येतो.

५—रकम (ल) अन्वयें नियम—हा कायदा अमलांत आणण्या संबंधीं सर्व बाबतींत सरकारी कामगार व जिल्हा बोर्डस व तालुक बोर्डस यांच्या सधारण वहिवाटी संबंधीं व त्यांचा एकमेकांशीं संबंध ठरविण्या संबंधीं.

वसूल व खर्चावर देखरेख :—

३८. जिल्हा बोर्डानें आपले कामगार व नोकर योग्य प्रकारें वसूल जमा करितात व पैसा अदा करितात हें पहाण्या करितां होऊं शकतील तितक्या सर्व तजविजी केल्या पाहिजेत. व ह्या बाबतींत आपण जी तजवीज केलेली असेल त्या संबंधानें जी माहिती लागेल ती सर्व डे० कमिशनर यांस दिली पाहिजे. कमजास्त होणारे वसुलाचे बाबतींत प्रत्येक बाबतींतील हकीकती प्रमाणें वसूल ताडून पहाण्यास विशेष तजवीज केली पाहिजे.

मंजूर झालेली कामें करणें:—

३९. मंजूर झालेलीं व खर्च आकारलेलीं कामें योग्य प्रकारें तयार झाली असे विषयीं खात्री करून घेण्याबद्दल यथायोग्य तजवीज जिल्हा बोर्डानें करावी.

नेमणुका:—

४०. ज्या जागेचा दरमहा पगार रु. २० किंवा त्याहून अधिक आहे असे एखादे जागेवर बोर्डानें नेमणूक केल्यास, नेमलेले मनुष्याचें वय, कूळ, जात रहाण्याचें ठिकाण व लायकी या संबंधानें व त्यास जो पगार ठरविला असेल त्या संबंधानें बोर्डानें डिपुटी कमिशनर यांस पूर्ण तपशील लिहून कळवावा.

बरतर्फी:—

४१. बोर्डाचा कोणताही नौकर ज्याचा दरमहा पगार २० रु. किंवा त्याहून अधीक आहे त्यास डिपुटी कमिशनरची पूर्वीं मंजुरात घेतल्या वांचून बरतर्फ केले जाणार नाहीं अगर कमी पगारावर घातले जाणार नाहीं.

हल्लीं असलेले कारखाने:—

४२. हल्लीं असलेली एखादी शाळा, दवाखाना, किंवा इतर कारखाना त्या खात्याचे मुख्य अधिकाऱ्याचे परवानगी वांचून जिल्ह्याचे बोरडानें कमी करूं नये. जर त्या खात्याचा अधिकारी हरकत करील तर बोर्डानीं तें प्रकर्ण कमिशनरकडे निकाला करितां पाठवावें.

साधारण मूळ तत्वें :—

४३. जीं साधारण मुळ तत्वें सरकारनें आपल्या अमला खालील निरनिराळे खात्यांत पसंत केली असतील त्याच प्रमाणें जिल्हा बोर्डानें आपली व तैणूक ठेवली पाहिजे.

---

## भाग २

१.—रकम (फ) अन्वयें नियम.—जिल्हा बोर्डांच्या वतीनें करार करण्याच्या व ते पुरे करण्याच्या व मिळकतीचा वर्ग करण्याच्या रीती संबंधीं आणि ज्या आधारा वरून जिल्ह्याचे फंडांतून पैसा देण्याच त्या संबंधीं.

करार:—

१. जिल्हा बोर्डानें अगर तलुक बोर्डानें केलेले करार प्रायः लेखी असले पाहिजेत व ते स्टांपाचा आक्ट व नोंदणीचा आक्ट यांस अनुसरून असले पाहिजेत लेखी करारावर जिल्हा बोर्ड अगर तालुक बोर्ड याचे वतीनें सेक्रेटरी व दोन मेंबर्स यांनीं सह्या केल्या पाहिजेत.

मिळकतीचा वर्ग:—

स्थावर मिळकत दुसऱ्यास नेहमीं करितां वर्ग करून देणें अगर एक वर्षाहून अधीक मुदतीच्या कौलानें देणें ती. डे० कमिशनरची लेखी मंजुरी पूर्वीं घेतल्या शिवाय देतां येत नहीं. ज्या मिळकतीचा वर्ग करण्याचा आहे अगर जी कौलानें देण्याचे, आहे तिची किंमत ५००० रुपयाहून अधिक असेल तर त्या मिळकतीचा वर्ग करण्यास अगर कौलानें देण्यास डेपुटी कमिशनर यांनीं कमिशनरची प्रथम मंजुरी आणल्या वांचून रुकार देऊं नये.

जिल्हा बोर्डानें पैसा कसा देण्याचा.:—

२. जिल्ह्याचे फंडांतून पैसा देण्याचा तो सर्व जिल्हा बोर्डच्या वतीनें काढलेल्या चेकावरून दिला जावा.

तालुका बोर्डांनीं पैसा कसा देण्याचा:....

३. जिल्हा बोर्डानें एखाद्या तालुक बोर्डास गांवांच्या सरकलांच्या जमावाकरितां रकम दिलेली असेल व त्या गांवाच्या हेड क्वाटरचे ठिकाणीं सब–ट्रेझरी असेल तेव्हां सब–ट्रेझरी आफिसरास जिल्हा बोर्डानें ठरविलेल्या रकमेपर्यंत तलुक बोर्डानें काढलेले चेकावरून पैसा देण्याविषयीं हुकूम द्यावा. परंतु जेव्हां अशा प्रकारें रकम दिलेली नसेल तेव्हां सब–ट्रेझरींतुन पैसा देण्याचा तो जिल्हा बोर्डानें जिल्ह्याचे ट्रेझरी आफिसरावर काढलेले चेकावरून द्यावा. ट्रेझरी आफिसर हे चेका ऐवजीं तहशिलीवर नागदीचा हुकूम देतील. पु० चा०

---

वऱ्हाडसमाचार

मिती श्रावण शुद्ध १५ शके १८१४

## खोटा समज

(जुडिशियल कमिशनरांचा नेटीव माजिस्ट्रेटांवर अभिप्राय)

मि. बुलक जुडिशिअल कमिशनर हे या प्रांताला अगदीं नवे आहेत तेव्हां ते इकडील माहिती होई पर्यंत तटस्थपणें अभिप्रायाच्या बाबतींत स्तब्ध राहतील असें आह्मास वाटत होतें. पोलीस रिपोर्टावर जुडिशिअल कमिशनर या नात्यानें आपला अभिप्राय त्यांनीं दिला आहे त्यांत आपल्या जुन्या अनुभावाचा उपयोग केला आहे परंतु आपण ज्या गोष्टी सांगतो त्या गोष्टी अगर सूचना आपल्या बरोबरीच्या अनुभवी अधिकाऱ्यांस माहित आहेत किंवा नाहींत याचा अगादर विचार प्रत्येकानें केला पाहिजे. अशी सूक्ष्मदृष्टि मि. बुलक यांनीं पोंचविली नाहीं तरी आह्मीं असें ह्मणतों कीं त्यांच्या त्या अभिप्राया वरून पोलीस खात्याच्या सुधारणेचा खल पुन्हा सुरू होईल आणि किंबहुना त्यांच्या तिन्हाईतपणाच्या सांगण्या वरून पोलीस खात्यावरील अधिकाऱ्यांची त्यांच्या खात्यांतील कमजास्त उणीवी संबंधानें पक्की खातरी होईल. या विचाराच्या बाजूनें मि. बुलक यांचे आह्मी त्यांच्या मोकळेपणाच्या सूचना बद्दल आभार मानले पाहिजेत आणि अशा मत स्वानें अलिशान रेसिडेंट साहेबांनीं त्यांची योग्य प्रकारें पाठ थोपटली आहे.

परंतु मि. बुलक साहेब आपले ज्ञानभाण्डाराचा स्फोट करण्याच्या भरांत नेटीव माजिस्ट्रेटावर घसरले आणि ते ही फारच गैर व वाकड्या मार्गानें घसरले ह्मणून आह्मास विशेष खेद वाटतो. साहेब मजकूर लिहितात त्याचा मराठींत तर्जूमा असा कीं:- "वऱ्हाडांत वकिलांचा भरणा मोठा आहे—अपराध्याचा बचाव बहुत करून चांगला होतो आणि तो बचाव वकिलांचा भरणा पुष्कळ असल्या कारणानें थोडक्या खर्चांत होतो आणि दुसऱ्या पक्षीं प्रासीक्युशन ह्मणजे पूर्वपक्ष चालविण्यास बहुतक करून कोणी वकील मुकर नसतो. या खेरीज माजिस्ट्रेट कोडता पैकीं पुष्कळ कोडताचे न्यायाधीश नेटिव असतात या नेटीव लोकांवर खुबीदार वकिलींनें सहजी छाप बसेत आणि लाघवी व एकपक्षीय युक्तिवादांनीं त्यांच्या मनाची शहानिशा होते. मला वाटेत कीं पोलिसांचा पूर्वपक्ष (प्रासिक्युशन) फसतो त्यास कांहीं अंशीं हीच गोष्ट कारणीभूत असवी. आरोप्यांची दोषमुक्तता झाल्या पासून निःसंशय गुन्ह्यांची वृद्धि होते आणि इतर एखाद्या कारणा मुळें पोलिसांनीं उभारलेले खटले जितपत बुडतात तितपत अस्थिर मनाचे व चंचलवृत्तीचे माजिस्ट्रेट असल्यामुळें खटले बुडत असतात" -- साहेब बहादूर सिव्हील सरव्हंट आहेत आणि ते बिजनोर कडे कामधाम केलेले सरवलले आहेत तेव्हां त्यांचा अभिप्राय चुकीचा असेल व त्यांत तथ्यांश कांहीं नसेल असें आमच्यानें म्हणवत नाहीं. एका पक्षाला वकील असला आणि दुसऱ्या पक्षाला वकील नसला म्हणजे जे अनर्थ घडतात ते ते वरील अभिप्रायांत गोंवलेले आहेत हें आम्ही ही कबूल करितों. पण त्या अभिप्रायांतील 'नेटीव' हा शद्ब गाळून टाकला तर तो अभिप्राय चांगला यथार्थ, अनुभवाचा, व वास्तविक ठरेल परंतु न्यायदृष्टीनें अमच्या जुडिकमिशनर साहेबांस दगा दिला. त्यांनीं स्पष्ट स्पष्ट दिसावें म्हणून जो चष्मा लाविला तो मात्र त्यांच्या सारख्या अधिकाराच्या व अत्युच्चन्यायासना वरील पुरुषाच्या डोळ्याला नीट बसत नाहीं असें आम्हास म्हणावें लागतें. आम्हास जी माहिती आहे त्या वरून आम्ही सांगतों कीं नेटीव माजिस्ट्रेटा पेक्षां युरोपियन माजिस्ट्रेटां कडून शतावधी पटीनें ढोबळ ढोबळ चुक्या झाल्या आहेत. कित्येक युरोपियन माजिस्ट्रेटांची कायद्यांत लटपटपंची चालत नाहीं त्यांस अवान्तर माहिती नसते आणि वकिलांच्या वादकौशल्याच्या जाळ्यांत ते अनेक वेळा अचानक जाऊन पडतात. आम्हांस हा द्वितभाव व दूहीचें बीज पेरणें नाहीं तेव्हां आम्ही विशेष खुलासेवार लिहूं इच्छित नाहीं. शिवाय कालवशीं करून आम्ही नेटीव लोक युरोपियनांशीं मित्रभाव वाढवून महाराणी सरकारच्या साम्राज्या खालील एकीकरणाचा अनुभव दुणावेल तो रस्ता पतकरत आहों तेव्हां हा विषय आम्हास वाढविणें नाहीं.

परंतु मि. बुलक सारख्या अनोळखी व परक्या गृहस्थांचा नेटीव माजिस्ट्रेटा संबंधानें असा ग्रह असावा हें आम्हांस व त्यांस ही मोठें बाधक आहे. त्यांचा लेख वऱ्हाडांतीलच नेटीव माजिस्ट्रेटा संबंधानें आहे हें स्पष्टपणें व्यक्त नाहीं. संदर्भा वरून वऱ्हाडाला-

च त्यांचा लेख लागूं धरला तर त्यांच्या कुतर्का विषयीं आश्चर्य व खेद मानून आम्ही स्वस्थ बसतों. शिवाय आम्हास नीमूट राहण्यास दुसरें कारण असें कीं त्यांच्या त्या मताचा कमिशनर अगर रेसिडेंट यांनीं कांहीं उल्लेख ही केला नाहीं. परंतु त्यांच्या लिहिण्याचा तडाखा सर्व ठिकाणच्या नेटीव माजिस्ट्रेटा संबंधानें असेल तर इतर युरोपियन आफीसरा प्रमाणें यांचा ही खोटा समज आहे असें आह्मी मानतों. नेटीवा विषयीं दुराग्रहाचा खोटा समज टोपीवाल्या मनुष्यानें न धरला ह्मणजे सामान्य गोरकाय जनसमूहहून त्या मनुष्यास आह्मी निराळ्या कोटींत गणतों. अर्थात हा वर्ग संस्कृत विचारांच्या उदार मनांच्या व न्यायी बुद्धीच्या लोकांचा आहे. बेकननें सांगितल्या प्रमाणें मनुष्यस्वभावांत कांहीं समज खोटे असतात. त्यांत कांहीं काल्पनिक असतात. कांहीं ऐकीव गोष्टी वरून बनतात. कांहीं भाषेच्या द्वारें उत्पन्न होतात. असे खोट्या समजांचे चार पांच प्रकार आहेत. त्यांत आमच्या मतें मि. बुलक साहेबांचा नेटीव माजिस्ट्रेटा संबधानें समज कल्पना व ऐकीव गोष्टी या वरून बनला असावा. मनुष्यस्वभावांतलीच एक चूक आहे तेव्हां त्या बद्दल मि. बुलक यांजविषयीं एवढा उल्लेख करणें नको होतें पण त्यांच्या खोट्या समजामुळे अनिष्ट परिणाम होतील व त्यांच्या वरील लोकप्रेम व पूज्यबुद्धि कमी होईल या गोष्टी लक्षपांत आणून आम्ही हा लेख लिहिला आहे तेव्हां आमचे जुडिशिअल कमिशनर साहेब प्रांजलपणानें आमच्या ह्मणण्याचें मनन करून आपला समज त्यांस योग्य वाटेल त्या प्रमाणें समूळ घालवितील अशी आह्मी उमेद बाळगतों.

---

ब्रिटिश पार्लमेंटच्या निवडानिवडीच्या गोष्टी ऐकल्या ह्मणजे हें नवल वाटतें कीं आंग्लो–इंडियन लोक आमच्या स्थानिक म्युनसिपालिट्यांना विनाकारण दोष लावतात. मतभेद, दुही, व फाटाफूट हीं सर्वत्र आहेतच आणि त्या शिवाय मतें गोळा करण्यासाठीं पार्लमेंटचे सभासद काय काय ह्मणून करीत नाहींत? पैसा उधळतात; मेजवान्या देतात; मतदार लोकांच्या तैनातीस गाड्या घोडे पोंचवितात; जोरा, जुलूम व अधिकार यांचा उपयोग करितात; भीड वजन, व प्रतिष्ठा खर्ची घालतात; विचार स्वातंत्र्याला पाणी सोडतात आणि सर्व कांहीं लघुत्वद्योतक प्रकार करून दाखवितात. दुरून डोंगर साजरे! हिंदुस्थानच्या लोकांस पार्लमेंटची काय खबर?

---

दादाभाई नवरोजी यांस धन्यवाददर्शक व सेंट्रल फिन्सबरीच्या लोकांस आभारदर्शक मानपत्रें हिंदुस्थानांतून अजून जात आहेत. आह्मांस कळविण्यास संतोष वाटतो कीं ब्राडला साहेबांच्या कन्या बानरबाई व खुद्द गायकवाड सरकार यांनीं निवडानिवडीच्या वेळीं दादाभाईस अनेक प्रकारें मदत दिली. कांहीं युरोपियन लोक नेटिवांचा उपहास करण्यासाठीं अशा बातम्या पिकवितात कीं ग्लाडस्टन साहेब मुख्य प्रधान, लार्ड रिपन व लार्डरी हे स्टेट सेक्रेटरी व दादाभाई नवरोजी हे व्हाईसराय होणार आहेत. ईश्वर कृपेनें जें पिकतें तेंच कदाचित् विकेल.!

---

पार्लमेंटची सभा आज भरणार आहे. राणी सरकारच्या संभाषणाचा खलिता वाचल्या नंतर ग्लाडस्टन साहेब अशी सूचना करणार आहेत कीं कानसरव्हेटिव पक्षावर लोकांचा विश्वास नाहीं तेव्हां त्यांनीं प्रधानकी सोडून द्यावी ही सूचना पसार होऊन बहुमतानें ग्लाडस्टनशाईस प्रारंभ होईल.

---

The Berar Samachar

MONDAY, AUGUST 8 1892

The Indian Currency Association has proposed a gold standard to be introduced in India provided no good comes out of the deliberations of the International Conference which is to be held in America. If silver falls gradually and leaves the market in a state of vacillating, unstable and momentary ebb and flow in the rate of exchange the Indian Currency Association finds no way how to find a solution of the problem unless a gold-standard or a gold currency be proposed instead of the present free-coinage of silver. But the 'Hindu' of Madras has shown an omission in the argument of the Association and closes its remarks with the following observation:—

"A gold standard without a gold currency strikes us as being the emptiest of dreams; and a gold currency for India is, at present, a thing not to be thought of. Without at all being indifferent to the inconveniences caused to our Anglo-Indian fellow-subjects by the continued depreciation of the rupee, we wish that some other solution of the difficulty were resorted to, than that put forward by the so called Indian Currency Association. We earnestly trust that at the coming International Conference it may be found possible to come to an agreement about a ratio between silver and gold. That previous attempts at fixing such an international standard have failed, is no reason why this should fail also. Meanwhile, we look forward with anxious interest to the reply which the Government of India is about to give to the memorial of the Indian Currency Association."

The difficulties of India are thus of a peculiar nature. The steady drop in exchange has done an immense ruin to all silver-using countries. India's loss is however beyond measure and in a hopeless state of reimbursement. Financially the Anglo-Indian government of this nation is a curse in connection with the debased coinage. India has to pay in gold crores of rupees for the administrative and military expenses in England. The expenditure is besides on a rising scale and has involed the national exchequer in a ruinous debt. We hope however that the solution of the problem as regards India will be postponed till a final decision of the International Conference is arrived at. The Secretary of State has yet to reply to the letter of the I. C. A.

Money is the universal measure to make present and future payments and unless this standard is fixed and certain or unless gold is found as profusely as silver no remedial measures are free from difficulties which are sure to return and multiply in more or less distant future. The main cry in India about exbhange is from the circle of those Anglo-Indian officers who receive their emoluments and pensions in silver and have to get gold-pounds in exchange at the present heavy rate. No doubt, the native ryots have to pay heavy taxes for the large deficits in he national treasury but their voice is neither so significantly listened to nor are their grievances redressed promptly with a sympathetic and careful interest. The miseries of the subjects do not rise from exchange alone but there are other mismanagements and spoliation of the national finances under which we groan. The Anglo-Indians are in general cold-blooded, indifferent and hostile to the advancement of the Natives and the latter do not on that account, find chances and occasions to make common cause with the former. Evidently on the present question of exchange the natives are more or less aloof from the deliberations of similar currency associations. But their complaint, silent and unheard, is neither less general nor grievous. We are not however sanguine and hopeful about the results of the proposal of a gold standard. We are moreover confirmed in our diffident and unpromising anticipations of the gold currency when we read the note of Sir David Barbour on the aspects of the introduction of gold in India. This best financier has advised to stop the free coinage of silver and to reserve the right of coining silver to Government alone. Private agencies should be allowed to get as much gold as possible to be coined into ten Rupee-pieces. The quantity & quality of gold in them should fix the rate of exchange at 1 s. 5 d. per Rupee, viz, a ten Rupee gold-coin should contain 170 parts out of 240 of the English £. Sir David has not however omitted to notice the sink in exchange consequent on the non-production of gold for coinage. He remarked that 'this would be a sign that the currency is redundant and such a state of things might be brought about by silver Rupees coming out of hoards or coming back from foreign countries. This might occur when the silver coin became a token coin' Inspite of heavy expenditure he advises government to reduce silver currency till exchange rises to 1s.5d per Rupee. Besides the government shall have practically to meet with the demands for silver rupees in exchange for gold-coins. If gold coins accumulate to a big number they should take the place of the Paper Currency-reserve or else shipped to England When gold-coins will not be required for the purpose of currency Sir David proposes to remove the charge of seigniorage on them. But the last, though hot the least important, caution he has conveyed is not to adopt gold standard unless it be to bear the pressure of the utmost necessity.

---

## वऱ्हाड

हवामान:—या आठवड्यांत पर्जन्यवृष्टि अतोनात झाली. नद्या, नाले, व ओढे यांनीं जंगी पूर आले व कित्येक ठिकाणचीं घरेंदारें व मालमत्ता हीं वाहून गेलीं. ईश कृपेनें प्राणहानी वरची मजल टळली. मधून मधून चांगली उघाडी होते ती तशीच कांहीं दिवस राहील तर आज तागाईतचा पीकपाण्याचा जोम चढाल राहील. एकंदर पाऊस २६ इंचावर झाला असावा. किरकोळ दुखण्यांनीं उचल घेतली होती परंतु त्यांची लवकरच पिच्छेहाट होईल.

रा. रा. वासुदेव सदाशिव पिसोळकर एक्स्ट्रा असि० कमिशनर वर्ग ४ यांस हैदराबादचे नबाब खुरशेदजहा यांचे जहागिरीच्या अंमलदारीवर नेमलें आहे. राजश्री वासुदेवराव हे व्यवहारचतुर, कर्तव्यदक्ष व सत्यप्रतिज्ञ आहेत तेव्हां त्यांची बढती जहागिरीच्या जागीं झाल्यानें त्यांच्या निस्पृहपणानें, न्यायकौशल्यानें व पैरवीनें न्यायमुनसबीचें काम सुरळीत व सुयंत्र चालेल हें पाहून आम्हास संतोष वाटतो.

सदर्हु गृहस्थांची बदली वऱ्हाड कमिशन मधून गेल्या मे महिन्याच्या ३१ वे तारखे पासून अमलांत आली असें फर्मावल्या वरून खालील बढत्या त्या मिती पासून झाल्या असें समजलें जाईल:—

मि. ई. मार्शल व रा. रा. गणेश बापूजी यांस अनुक्रमें वर्ग ४ आणि ५चे कायमचे एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर करून रा. रा. सखाराम आत्माराम अधिकारी क्लार्क आफ कोर्ट फर्स्ट असि० रेसिडेंट यांस पुढील हुकूम मिळे पावेतों एक्स्ट्रा असि. कमिशनर वर्ग ५वर आक्टिंग नेमलें आहे.

रा रा. वासुदेव सदाशिव पिसोळकर हे गेल्या गुरुवारीं प्रातःकाळीं येथें किरकोळ रजेवर हैदराबादेहून स्वगृहास आले होते ते परवां परत हैदराबादेस रवाना झाले. त्यांची नवी बढती व उत्कर्ष पाहून इष्टमित्र मंडळीस त्यांच्या या भेटीनें मोठा संतोष वाटला.

लेफटनंट आर. पी हार्सब्रो असि० कमिशनर यांची बदली उमरावती जिल्ह्यांतून इलिचपूर जिल्ह्यांत करण्यांत आली आहे.

लेफ० आर. जी. आऊसले पोलिस सुपरिनटेंडंट इंगोली व माजिस्ट्रेट वर्ग २ जिल्हा वाशिम यांस क्रिमनल पिनलकोडचे ३७ वे कलमा अन्वयें फटके मारण्याची शिक्षा देण्याचा अधिकार मिळाला.

मि० ए० इलियट डेपुटी कमिशनर, वणी यांस आगष्टचे ६ वे तारखेपासून एक महिना व सात दिवस अशी हक्काची रजा देण्यांत आली.

त्यांच्या रजेच्या मुदतींत कुमार श्रीहरबानजी रावजी असि० कमिशनर वर्ग २ यांची बुलढाण्याहून वणीस डेपुटी कमिशनरचे कामावर बढती केली आहे हें कळविण्यास मोठा संतोष वाटतो.

बाळापूरच्या तहशीलदारीवर रा० रा० त्रिम्बक गणेश परांजपे यांची कायमची नेमणूक तारीख २९ मे पासून समजून त्यांस वर्ग ४ चे तहशीलदार केलें आहे; तरी ते दुसरा हुकूम मिळे पावेतों आपलें जुडिशअल कमिशनरचे क्लार्क आफ कोर्टचें काम पहातील. आणि हे गृहस्थ क्लार्क आफ कोर्टचें काम पहातील तो कालपर्यंत मि० फिलिप थॉरीस क्लार्क आफ कोर्ट–डेपुटी कमिशनर अकोला हे तहशिल्दारीचा चार्ज घेतल्या तारखेपासून तहशिलीचेंच काम चालवितील.

रा० रा० नारायणसिंग बलभूतसिंग नायब तहशीलदार यांस मोर्शीस वर्ग ४ चे आक्टींग तहशीलदार नेमून रा० रा० नारायण. गोविंद यांस त्यांच्या चांदूरच्या नायब तहशीलदारीवर परत धाडलें.

गेल्या मे महिन्यांत ८०३१ मनुष्यें जन्मलीं व ५५३३ मरण पावलीं. एक हजार लोक संख्ये मागें ३६ माणसें जन्मतात व २५.२ मरतात असें वार्षिक प्रमाण आहे त्याला सरासरीनें जनन मरणाचें या महिन्याचें प्रमाण जवळ पडतें. शंभर मनुष्यें जन्मलीं

## पत्रव्यवहार

ह्या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

मु० वाशीम ता० ३०-७-९२ इ.

रा. रा. वऱ्हाड समाचार कर्ते यांसः—

कृ० सा० न० वि० वि० बऱ्याच दिवसांत आपल्या भेटीचा लाभ नाहीं. यामुळें वाईट वाटतें. पाऊस चांगला पडत आहे. पिकें उत्तम आहेत. रोगराई विशेष ह्मणण्या सारखी नाहीं. धारण जशाची तशीच आहे. येथील ट्रेडिंग कंपनीचे दुकानाची व्यवस्था चांगली नाहीं. दुकानांत असलेले नोकर लोक कित्येक व्यवस्थापकांना आवडतात. कित्येकांना आवडत नाहींत. ही कुरकुर बऱ्याच दिवसांपासून चालूं आहे. तथापी पांडोबा आण्णा ह्मणून एक कंपनीचे मोठ्या विश्वासाचे नोकर होते. त्यांचेकडे मुनिमाचें काम होतें. पुष्कळ वर्षें दुकानदारीच्या कामांत ह्यांनीं घालविलीं होतीं. खरेदी विक्री करण्यांत यांना चांगली माहिती होती. इतकेंही करून ते मनमिळाऊ, वाणी गोड यामुळें गिऱ्हाईक पुष्कळ येत असे. व त्यांच्या सुस्वभावामुळें इतर कुरबुरी व तंटे यांचा जोर वाढला नाहीं. परंतु मोठ्या दुःखाची गोष्ट कीं ते थोडक्या दिवसांपूर्वी मरण पावले तेव्हां कंपनीच्या दुकानास कुलूप पडलें. कित्येक दिवस दुकान बंद राहिलें. पुढें व्यवस्थापकांची सभा होऊन दुकानांतील माल मोजिला त्यांत पांच सहाशे रुपयाचा माल कमी आला असें ह्मणतात. शिवाय उधार बाकी फार आहे व ती ही शेअरवाल्याकडे! कायदा करितांना एक प्रकारचा व त्यांची अंमलबजावणी दुसऱ्या प्रकारची! शेरवाल्यांनीं अमुक रकमे पर्यंत उधार माल न्यावा अशी एक अट पण आतां पहातां भलत्या भलत्या त्यांचे कडे रकमा! तेव्हां कंपनीच्या वहिवाटी करितां केलेले नियम जर पाळावयाचे नाहींत तर मुळींच नियम नसते तर किती बरें उत्तम होतें! ह्या शेरवाल्या शिवाय इतर लोकांकडे ही बरीच उधारी रकम आहे. ही तर गोष्ट असंद्या. कित्येक लोकांकडे आणा, आर्धा आणा, चार आणे अशा किरकोळ रकमा ज्यांचीं खातीं घातलीं नाहींत अशा उधारी! देणारानें ह्या रकमा उधार ठेविल्या कशा व देखरेख करणारांनीं ह्या गोष्टीकडे काना डोळा केला कसा हें मोठें नवल आहे. ह्या किरकोळ रकमांची बेरीज सात आठशें रुपयांची होईल असें ह्मणतात. शिवाय खातेदार मिळून तीन चार हजार रु० उधारींत आहेत असें ह्मणतात. बाकी दुकानांत माल नवीन खरेदी करण्यास पैसा नाहीं! नवीन नेहमीं खरेदी विक्री शिवाय दुकान चालावें कसें! गिऱ्हाइकांनीं यावें कसें, खप व्हावा कसा नफा व्हावा कसा, व कंपनीच्या दुकानाची कीर्ती व्हावी कशी! कित्येक शेरवाल्यांचा अपसांत झगडा. कित्येकांचें ह्मणणें तो जर असला तर मी रहात नाहीं. आपसांत कोठें असें चालतें काय! वैमनस्य जर कोणाचें असेल तर तें ज्याचें त्यानें घरांत ठेवा. अशा सार्वजनिक महत्वाच्या कामा आणू नका. जुटीनें जें काम होतें तें फाटाफूट होऊन होत नाहीं. आमच्या लोकांनीं आपसांतील तंट्यांनीं स्वतांचें राज्य बुडवून पारतंत्र्याच्या पारड्यांत पाडून घेतलें? आमच्यांत कर्तबगारी नाहीं, आह्मी आरंभशूर, आमच्यांत दक्षता, दूरदर्शीपणा नाहीं अशी लोक हमेशा * * ठोकितात त्यप्रमाणें एखादां सुखी असेल तरी समाजाची वाट काय? एवढेसें दुकान तुमच्यानें चालवत नाहीं तर मोठीं महत्वाचीं विकट कामें तुह्मांस करण्याचा प्रसंग तुमच्यावर आला तर तीं करून कीर्ति ध्वज कसा उभारणार! तुम्हांस इतकेंच सांगणें आहे कीं ह्या जसें मातीस मिळालें तसें दुकान मातीस मिळऊ नका सर्व उधारी गंभीर पणानें वसूल करा. शेरवाल्या पासून उधारी रकमा वसूल करा. कित्येक दिवसा पासून दुकानांत जुना माल राहिला आहे तो कमी किमतीनें काढून टाका. रकम जी तोटा येईल ती एक वर्षाच्या नफ्याच्या रकमेंतून वजा करून बाकी राहिल ती वांटून द्या असें केल्याने दुकानांत माल नवीन राहिल असें प्रत्येक तीन अगर चार वर्षांनीं करित जा. इमांनी नोकरांची निवड करा. चांगल्या लोकांशिवाय उधारी देणें बंद करा. अनेक उपाय करा परंतु दुकान जाऊ देऊं नका दुकानचे हितचिंतक शेरवाले, व्यवस्थापक सर्व हुशार असून इतर अक्षरशत्रु दुकानदारांनीं ठिऱ्या पिटवाव्या ही किती शोचनीय गोष्ट आहे बरें! ज्या वेळीं हें दुकान प्रथमतः स्थापन झालें त्या वेळीं तें स्थापन करण्यास किती श्रम लागल याची तुम्हांस आठवण असेलच कोणती ही गोष्ट मोडण्यास फारसा उशीर लागत नाहीं. हें लहानशा भुसाऱ्याच्या दुकाना पासून तों मोठ्या राज्या पर्यंत सर्वत्र सारखें लागूं पडेल. प्रथमतः दर शेंकडा नफा किती होत असे हें तुह्मी जाणता. आतां नऊ दहा आणे हो पडत नाहीं हेंहीं तुह्मी जाणतां. हें कशानें? व्यवस्था नीट नाहीं ह्मणून. तर या गोष्टीचा विचार करून दुकानाची व्यवस्था नीट लावा. मी मोठा, अमुक तो लहान, त्यांचें काय ऐकावयाचें आहे. असा भेद मनांत ठेविल्यानें ऐक्याचा मोड होतो, आपल्या विषयीं दुसऱ्यांच्या मनांत शत्रुत्व उत्पन्न होतें व त्या पासून परस्परांना अनिष्ट परिणाम भोगावे लागतात. कंपनीचीं दुकानें वऱ्हाड प्रांतांत तर काय इतर ठिकाणीं ही पुष्कळ आहेत. व ज्या ठिकाणीं ऐक्याचा ऱ्हास झाला त्या ठिकाणीं ही दुकानाची दुर्दशा. कोणती ही गोष्ट रंगारूपास आणणें ह्यांत जितका मोठेपणा आहे तितकाच मोठेपणा ती टिकऊन धरून ती पासून फलप्राप्ती करून घेण्यांत आहे. इंग्रज लोक जे आज या भरतभूवर गाजत आहेत त्यांनीं प्रथमतः व्यापारा करितां कंपनी काढून पूर्वेकडे व्यापार करूं लागले. त्यांनीं जर ह्या कामीं दुर्लक्ष केलें असतें अगर अपसांत वैमनस्य वाढविलें असतें तर त्यांना आज हे सोन्यासारखे दिवस प्राप्त झाले असते काय? यांच्या अलौकिक चातुर्याचें व धैर्याचें उदाहरण डोळ्या पुढें असतां तिकडे आपण काना डोळा कां करितों? अशीं शेंकडों उदाहरणें दाखवितां येतील. एकदम कोणाला कांहीं मिळत नाहीं. प्रत्येक गोष्टीला लहानशा प्रारंभा पासूनच मोठेपण येतें. पत्रकर्तेराव हें वेडेंवाकडें लिहून पाठविलें आहे. तर विस्ताराची माफी करून येत्या अंकीं छापा कराच. कळावें हे विनंती.

आपला

नवीन कंपनीचे दुकानाचा
हितचिंतक

---

रा० रा० वऱ्हाडसमाचारपत्रकर्ते महाराज यांचे सेवेसी—विनंती हीच कीं आपली आमची फार दिवसा नंतर भेट आहे. इतके दिवस भेटलो नाहीं याची माफी देऊन खालील चार ओळीस आपल्या सुंदर पत्रीं जागा द्यावी.

मी वऱ्हाडांतील रहिवाशी आहे मी कांहीं कारणावरून अकोट तलुक्यांपैकीं अडगांव ह्या गांवीं आलो. हा गांव इतिहासप्रसिद्ध ह्मणजे इ० सन १८०३ सालीं ह्या गांवीं फार मोठी लढाई झाली. हा गांव परगण्याचें ठिकाण असून मोंगलाईंत येथें हमेशा तहसिली ठाणें असे. इंग्रजी अंमल आल्यावर सुद्धां ह्या गांवांस तहसील कचेरी असून अडगांव तालुका होता. तहसिली ठाणें गेल्यावर येथें दिवाणी कोर्ट होतें. त्या कोर्टाचे आकोट व जळगांव असे दोन भाग होऊन हल्लीं तेंच कोर्ट तेल्हाऱ्यास आहे. तेल्हारा हा गांव अडगांव परगण्यापैकीं आहे. ह्या गांवचा देखावा फारच चांगला असून मनोवेधक आहे. ह्या गांवचे पूर्व भागास मारुतीचे देवालय नवीन बांधलेले फारच रमणीय असून मनास आनंद देण्यासारखें आहे. हें देवालय तेथील संभावित व जगप्रसिद्ध देशपांडे मा० रा० अमृतराव गोपाळ उर्फ दादासाहेब यांचे साह्यानें व मीठारामजी यांचे खटपटीनें बांधलें गेलें असून कार्तिक वा॥ ३ येथें मोठा उत्छव होत असतो व त्या निमित्त सरासरी तीन दिवसांत दहा हजार पात्रांचें अन्नदान होत असतें वर सांगितल्या प्रमाणें दोन उत्छव होऊन गेले. वरील पुढारी लोकांचा सदरहु देवा प्रीत्यर्थ चवघड्या करितां मोठी इमारत बांधण्याचा हेतु आहे. व त्याचे सामानाची तयारी असून बरसात गेलेवर कामास आरंभ होईल असा अजमास आहे. सदर्हू अमृतराव दादासाहेब देशपांडे ह्यांणीं देवास दोन शेतें अर्चना प्रीत्यर्थ समर्पण केलीं असून लक्ष्मण सोनार यांनीं तर कांहीं खाजगत असलेला फिरण्याचा व्यापार श्रीमारुती यांचे नांवें करून देऊन फिरणें सुरू आहे. व लक्ष्मण सोनार आणि मीठारामजी हे मारुतीचे निःसीम भक्त असून जिवापाड मेहेनत करित आहेत. व त्यांस गांवचे प्रमुख देशपांडे दादासाहेब यांची मदत आहे. सदर्हू देशपांडे मा० रा० रा० अमृतराव गोपाळराव हे लोकल कमेट्या कायम असते वेळीं कमेटीचे कारभारी असून त्यांचे हाताखालीं तीन मेंबर व एक खजीनदार असे. दादासाहेब देशपांडे यांचे खटपटीनें गांवची सफाई जशी असावी तशी असून पोलीस ठाणें असल्यामुळें गांव सफाईचे कामीं त्यांना बरीच मदत आहे. परंतु ह्या गांवास माजिस्ट्रेट नसल्यानें फार अडचण आहे. दादासाहेब देशपांडे हे फार हुषार व प्रसिद्ध जमी-

दार असून लोकप्रियता हा गुण यांचे आंगीं विशेष वास्तव्य करितो. त्यांचें सार्वजनिक कामीं फार लक्ष आहे. यांचें उत्पन्न फार मोठें असून सुखी आहेत. गुन्हे पत्यांत येण्याचे कामीं व लोकांत स्वस्थता राखण्याचें कामीं हे फार मना पासून खपतात. अशा थोर गृहस्थाचे योग्यतेकडे पाहतां. यांना अधिकार मानिस्त्रटीचा देणें हें आमचे न्यायी व दुरदर्शी सरकारास फारच भुषणा सारखें होईल. आकोट--खामगांव–आकोला–सुरजी. दर्यापूर वगैरे ठिकाणीं सरकारनें योग्यता पहून सभ्य लोकांना माजिस्ट्रेटीचे अधिकार दिले आहेत. त्याच योग्यतेचे हे गृहस्थ असून त्यांना अधिकार असणें योग्य आणि न्याय होणार नाहीं कां? सदर्हू गृहस्थ वयोवृद्ध असून ज्ञानवृद्ध आहेत. व यांनीं जगताचे रितीरिवाजाची माहिती पूर्ण आहे. ह्या माझ्या लिहिण्याकडे न्यायी व दूरदर्शी, धूर्त अधिकारी लक्ष देतील तर त्यांना फार भूषणावह होईल. मा. रा. रा. अमृतराव गोपाळराव ऊर्फ दादा साहेब यांचे चुलते श्री. रा. रा. जयकृष्ण केशवराव देशपांडे यांचे भेटी करितां ते हैद्राबादेस गेले आहेत. ते लवकरच परत येणार अशी गांवांत पूर्ण वार्ता पसरतांच ज्या त्या लोकांचे तोंडंतून ऐकण्यांत येई कीं ते लवकर यावेत असे बद्दल आनंदपूर्वक उद्गार बाहेर येत. असे लोकप्रिय लोक जगतांत फार थोडे आढळतात. अशा प्रकारें गांवची शोभा व दादा साहेब देशपांडे यांचे बद्दल लोकांचे अकृत्रिम प्रेम पहून मनास फार आनंद वाटला. जगन्नियंत्या परमेश्वरास हीच प्रार्थना आहे कीं अशा लोकप्रिय लोकांना चिरायू व यशस्वी करो. दादा साहेब हे कमेटीचे वाभा बदल रजा घेऊन गेल्यावर त्यांचे बंधु रा. रा. रामराव देशपांडे यांची योजना त्यांचे जागेवर केली होती. पत्रकर्ते महाराज पत्रव्यवहार फार लांब लचक झालला पहून येथेंच संपवून आपली परवानगी घेतो. ता. २८—७—९२ इ०

आपला

"एक फिरस्ता"

---

## जाहिरात

अहो स्वदेश बांधवहो, परदेशी औषधी सुरत्या रंगवान व कमिशन जास्त पहून कां फसतां? इकडे थोडे लक्ष द्या.

आमचे दवाखान्यांत सर्व रोगांवर औषधी विक्रीस व दरिद्री लोकांस फुकट तयार आहेत; परंतु त्यांत ज्या हटकून गुण खात्रीनें देतात त्यां पैकीं थोड्या प्रसिद्धीस देतों. त्यांतून जी दवा कोणास लागेल त्यांनीं खालीं लिहिलेले सहीचे पत्यावर पत्र पाठवावें. ह्मणजे आम्ही व्ह्याल्युपेबलनीं पोस्टमार्गें लवकर पाठवूं. व कोणी आजारी आमचे येथें येऊन औषध घेतील त्यांस प्रथम दुरुस्त करून ठरलेली किंमत मागाहून घेऊं.

हमेशा घेणारे ग्राहकांस कमिशन देऊं. व त्यांनीं विक्री करून दाम पाठवावें.

१ गजकर्णावर रामबाण, ६ दिवसांत गुण किंमत दर बाटलीस ८ आणे.

२ मूळव्याध कितीही दिवसांची दुर्धर असेल त्यावर मोडावर लावण्याचे व पोटांत घेण्याचें दोन औषधी मिळून किं. १॥ रु.

३ चातुर्थिक ज्वर ह्मणजे चवथारें हिव ताप त्याच प्रमाणें तिजारे, व दररोज येणारे कितीही दिवसांचे असो, त्यावर मिश्रित औषध एकच बाटली पुरे. किं. १॥ रु. दुसरें औषध गोळ्या खात्रीच्या २१ गोळ्या च्या डबीस १८९ या औषधानें कडक तापही जातो.

४ परमा तिडिक व स्वप्नावस्था, व कोठ्यांतील उष्णता व क्षिणता या सर्वांवर मेहूणपुडा किं. १ पुड्यास ८१४ आणे.

५ बाळंत रोग बाळाचे डबे व सटवी बाधा व प्रदर सर्व तऱ्हेचा किं. १ डबीस १॥ रु.

६ वीस प्रकारचे मेहापैकीं १६ मेहावर १४ गोळ्यास किं. २॥=

७ नारुवर ९ दिवसांत गुण. लावणें व खाणे याचत्या डबीस किं. ।

८ गुल्म पांच प्रकारचे व सर्व पोट शूळांवर व गोळ्यावर व पानथरीवर १ डबीस किं. ॥।

जुलाब उत्तम राजस तकलीफ अगदीं नसून कोठा साफ १ बाटली १० मनुष्यास पुरेल किं. ।। रु.

१० मेदोरोग व घुरें व उन्माद यावर अगदीं जलद गुण १ बाटलीस किं. २ रु.

११ स्त्रियांचे रक्तस्त्राव व ऋतुस्नात होण्यास व गर्भधारणास बंदेज ह्यांवर हें एकच औषध फार चांगलें आहे. १ डबीस किं. १॥

१२ शिरस व मस्तकशूळ व अर्धशिशी याजवर दर डबीस किं. १८=

१३ हागवण व अतिसार १ डबीस किं. १।=

१४ वृषण एकारश्यास व वृद्धीस १ डबीस किं. १ रु.

१५ कावरले कुत्रें व कोल्हे व तेल्या उंदीर डसल्यास १ डबीस किं. १। रु.

१६ मेहानें अगर उष्णतेनें पाय उलून रक्त जाणें व संधि दुखणें ह्यावर १ डबीस किं. १॥ रु.

१७ महामारिवर अगदीं जलद गुण एक मनुष्यास १२ गोळ्या ५० गोळ्याच्या डबीस किं. १८–

१८ गर्मी उर्फ उपदंश संबंधी विकार क्षतें यांजवर १ डबीस किं. १॥ रु.

१९ फसली उर्फ मज्जागतवात व शूळ याजवर लवकर १५ मिनिटांत गुण १ डबीस किं. ॥ हें १५ मनुष्यांस पुरेल.

२० कऊळ, नळगुद, पंडु, मूज व मुखरोग ६५ व सन्निपात १३ यांवर १ डबीस किं. १॥ रु. ही ३ मुलें व २ पुरुषांस पुरेल.

२१ सुवर्णमालिनीवसंत खात्रीचा १ तोळ्यास किं. ७ रु.

२२ योगराज गुगुळ १ तोळ्यास ४॥ रुपये.

२३ नामर्द ह्मणजे नपुंसक कितीही दिवसांचा असो तरी तो तीन दिवसांत दुरुस्त खात्रीनें होईल. १ बाटलीस किं. ३ रु. गुण न आल्यास पैसे परत मिळतील.

२४ डोळ्यांतील फूल वडस रातांधळी खुपरी चुळ चीपडे गळती याजवर १ डबीस किं. १८६

या शिवाय जास्त माहिती मागविल्यास देऊं. व कोणी योग्य औषधें हमेशा मागवून विक्री करील त्यांनी विक्री करून पैसे मागाहून पाठवावे.

(पत्ता व सही) शिवचरनगीर रामगीर

वैकुरणखेडकर अकोला गंगाधरचे

माडीवर चौकांत दवाखाना.

वऱ्हाड.

---

डा० वामन गोपाळ यांचा

हा सार्सापरिला अनेक रोगावर गुणावह असून खालीं लिहिलेल्या रोगावर विशेष गुणकारी आहे उपदंशजन्य विकार (गरमी) व तिजपासून होणारा पक्षघातादी भयंकर रोग संधिवात, गंडमाळा, रक्त दुषित झाल्यापासून हातपायांच्या तळव्यांवर व सर्व शरीरावर काळे डाग पडणें संधी दुखणें, काळा लागणे, सूज येणें सर्व संधिगत वायूवर तसेंच कोणत्याही प्रकारचें त्वचेचे रोग जसें सर्व शरीरास कंड सुटणें, खरूज गळवें व फोड येणें, इत्यादि; डोळ्यांची, मस्तकाची व हातपायांची आग, होणें, तसेंच रसायनें व कच्चा पारा सेवन करून होणारे वाईट परिणाम वगैरे सारांश उपदंशजन्या पासून अगर दुसरें कोणत्याही कारणानें रक्त दुषित झालें असल्यास तें शुद्ध होऊन त्याची वृद्धि होण्यास ह्या सारखें दुसरें औषधच नाहीं दर बाटलीस किंमत १। रुपया. पोस्टेज ४ आणे, उत्तम गुणास चार बाटल्या पाहिजेत. एकदम बारा बाटल्या घेतल्यास १२ रुपये. पोस्टेज शिवाय. परंतु चार बाटल्या एकदम घेतल्यास पोस्टेज ६ च आणे पडतील.

पौष्टिक व अत्यंत कामोत्तेजक, धातु व रक्तवर्धक मिश्र फास्फरसाच्या,

गोळ्या

या पासून अतिशय विषयोपभोग नित्य धातुश्राव यानें झालेली क्षीणता जाऊन कडकी, अशक्तता, अग्निमांद्य, जीर्णज्वर, नपुंसकत्व इत्यादि विकार तात्काळतीव नाहींसे होतात. ह्यानें सर्व शरीरांतील चैतन्याच व बुद्धि व स्मरणशक्तीचा राजा जो मज्जा (मेंदु) व मज्जतंतु याच्या मंद झालेल्या सर्व क्रियाचें पुनरुज्जीवन होतें. शिवाय ह्या गोळ्या कामोद्दीपक व स्नायूंची शक्ति वाढविणाऱ्या असल्यामुळें कोणत्याही कारणास जननेंद्रियाची शक्ति क्षीण झाली असल्यानें पूर्ववत होते. उत्तम गुणास ४ बाटल्या पाहिजेत किंमत २४ गोळ्याचे एका बाटलीस १४ आणे बंगी व पोष्ट मिळून एका पासून किती ही बाटल्या घेतल्या तरी ६ पडतील.

पांढरे केस काळे भोर होण्याचा

कल्प.

हा कल्प प्रत्येक पंधरा दिवसांनीं एक एक वेळ लाविला ह्मणजे पुरें आहे. यानें, सफेद करड्या व पिंगट रंगाचे केस काळे भोर होऊन त्यास तेज येतें. किंमत १ रु० पोष्टेज ४ आणे.

वरील सर्व औषधांच्या विशेष माहितीचा कागद प्रत्येक औषधा सोबत मिळेल पुण्याच्या लोकां करितां डा. एन. व्ही. छत्रे यांचे दवाखान्यांत वरील सर्व औषधें मिळतील.

आमचा पत्ता—नव्याठाकूर द्वारासेनार.

ह्मणजे त्यांत ३.५ मेलेलीं जन्मतात असें प्रमाण आढळतें.

गेल्या मंगळवारीं येथील मुनसिपाल कमिटीची सभा भरली होती त्यावेळीं पुढील सालाकरितां निरनिराळ्या कामाचो व अधिकाराची वाटणी करण्यांत आली. अकोल्या सारख्या कमिटीस डेपुटी कमिशनरा शिवाय कोणा तरी अन्य गृहस्थांस अध्यक्ष नेमण्याची स्थिती आजकाल आली असून ही तो योग यंद्दा घडून आला नाहीं ही दिलगिरीची गोष्ट होय. व्हाईस चेअरमन रावसाहेब देवराव विनायक व शंकर गोविंद हे असून राजश्री गोपाळ हरी सावरकर व बाळकृष्ण मोरेश्वर साठे हे सेक्रेटरी आहेत.

रा. रा. हरी दामोधर जोशी सेकंड क्लार्क पोस्टल सुपरिन्टेंडंट आफिस—वऱ्हाड यांस त्यांच्या विनंती वरून नेरळ येथें पेंशरावर बदलून त्यांच्या विसाच्या जागीं रा. रा. गोविंद बळवंत यांस पांच रुपये बढती देऊन नेमलें.

या बगविगीत जेजुरीचे पोस्ट मास्तर रा. रा. बाळाजी काशिनाथ यांस सुरजी अंजनगांवास नेमून तेथील आक्टींग गृहस्थ यांस अकोलें पारटांत नेमलें. या नेमणुकांत वरिष्टांनीं नोकर लोकांच्या सोयी कडे लक्ष्य दिलें हें मोठें स्तुत्य होय.

गेल्या गुरुवारीं येथील पलटणचा शेख अब्दूल मशजिद नांवाचा शिपाई मोर्णा नदींत पोहतां पोहतां बुडून मरण पावला.

काल सायंकाळीं येथील 'बाबुजी देशमुख नेटीव जनरल लायब्ररींत' पातूरचे सुखवस्तु च सार्वजनिककार्यांतले हौसी गृहस्थ रा. रा. शिवरतनसिंहवर्मा यांचें 'आर्यसमाजा'वर व्याख्यान झालें. वर्षोत्सव व्याख्यान मालेंतलें हें पांचवें भाषण होय.

आह्मास लिहिण्यास दुःख वाटतें कीं अलिशान रेसिडेंट फ्रेडन साहेब यांच्या पत्नीस गेल्या तिसावे तारखेस देवाज्ञा झाली. या बाई सुंदर, सुशील व मनमिळाऊ असल्यामुळें त्यांच्या मरणानें त्यांच्या आप्तमित्र मंडळीस फार दुःख होईल.

पोंच—विविध ज्ञानविस्तार—अंक ९ व १० ( १८९१ ); शेतकरी—अंक ५ ( मे ); ज्ञानसंग्रह—अंक १ व २ ( जानेवारी व फेब्रुवारी ); भिषग्विलास—अंक ५ (आगष्ट); डेक्कन कालेज त्रैमासिक ( स्त्रियांकडून ) अंक १; आर्यभिषक्—अंक २ ( आगष्ट ); नीरजोल्हास—अंक २ ( आगष्ट )

---

मुक्काम वाशीम ३।८।९२.

या आठवड्यांत पर्जन्यानें बाहार उडविली आज पर्यंत सुमोर चोवीस इंच पाऊस झाला असें कळतें. पिकें उत्तम आहेत. शेतकरी आनंदांत आहेत. धरण बरोब आहे. अजून स्वस्त होऊं लागलें नाहीं. गांवात तापाचा आजार थोडा थोडा सुरू आहे.

रा० रा० त्र्यंबक माधव भिडे मालेगांवांहून येथें देवपेठेंत हेडमास्तर आले होते. त्यांनीं दिड महिना सुमारें काम केलें नाहीं तोंच तापाच्या आजारानें त्यांस देवाज्ञा झाली गृहस्थ मोठा भोळा होता. मराठी चांगला शिकलेला होता. आजाराच्या वेळीं त्यांचे कोणी जवळ नव्हते. आजारास तीनचार दिवस झाल्या नंतर त्यांचें कुटुंब चार अर्भक बाळकें बरोबर घेऊन येथें आलें. आजारा मुळें बिचारीचे पती बरोबर भाषण ही झालें नाहीं. तेव्हां तिच्या मनाची स्थिती कशी काय झाली असेल! मित्र मंडळींनीं औषधोपचार करण्याची पाराकाष्ठा केली. अखेर दुर्धट प्रसंग आला तेव्हां त्यांचे बंधु इंदुरास आहेत. त्यांना तार करून इकडे बोलाविलें. परंतु बंधु येण्या पूर्वींच सर्व आटपलें. ह्या नोकरीच्या पायीं लोक पोटाच्या मागें लागून घरदार इष्टमित्र सोइरी धायरीं सोडून देशांतरीं जातात व असा एकादा प्रसंग आला कीं मग काय? देवा वांचून तारक कोणी नाहीं. ते आठ दिवस आजारी होते. ह्या आठ दिवसांत शेंकडों लोक त्याच्या भेटी करितां येत असत. रात्रं दिवस मंडळीनें मोठी झटून मेहनत केली परंतु यश आलें नाहीं. ही देवाची गोष्ट! असो त्यांच्या अशा मरणानें त्यांच्या अल्पवयस्क पत्नीवर हा दुर्धर प्रसंग गुदरला. बिचारीचें छत्र गेलें. व आल्या नंतर पाचसाहा दिवसानीं वैधव्य पदरीं बांधून निरंतर पती वियोग जन्य दुःख सहन करीत घरीं जावें लागलें. स्त्रियांची स्थिती मोठी कींव येण्या सारखी! हिंदु धर्माचें बीज काणी कसें पेरीलें त्या वेळी ह्या अबलाची त्याला कशी करुणा आली नाहीं. कोण जाणें हिंदुमर्धे ब्राह्मण धर्म तर स्त्रियां बद्दल फारच कडक आहे. असो हरीची इच्छा!

देवपेठ येथील जागा रिकामी झाली ती, अजून भरली नाहीं. आतां कोणत्या जागेवर येतात तें पाहावें. कोणी म्हणतात पूर्वींचे मास्तर जे मालेगांवास गेले आहेत तेच परत येणार. ठिक आहे. ते पूर्वीं येथें असल्या मुळें त्यांना येथील माहिती आहे तेव्हां त्यांना ती जागा मिळाल्यास वावगें नाहीं. देणार घेणारे निराळे. ते या गोष्टीचा विचार करतील.

मे. डे. ए इनस्पेकटर मिस्तर ऋषी तीन महिन्यां पासून रजेवर आहेत त्यांची रजा ता० ५।८।९२ रोजीं संपेल. रजेच्या मुदतींत मिस्तर केळकर येथील इंग्रेजी मराठी शाळेचे हेडमास्तर यांनीं काम केलें. मागे हे गृहस्थ इलिचपुरास दीड वर्षें डे. ए. इनस्पेटरचें काम करित होते. आता त्यांना कायमची जागा कधी मिळते पाहावें. मनुष्याला बढती मिळत गेली कीं काम करण्यास त्याला अधिक उत्तेजन येतें. ह्या गोष्टी खात्याच्या अधिकाऱ्यांना समजत नाहींत असें नाहीं परंतु बढतीची संधि वारंवार येत नसेल तेव्हां त्यांचा तरी ईलाज काय? आतां संधी येते त्या प्रमाणें ते हक्क पाहातच. कसें ही असो. सुमारें १५ वर्षें एकाच पगारावर झाली तेव्हां त्यांना बढती मिळणें रास्त आहे.

मिस्तर केशवराव साहेब एकस्ट्रा अ. कमिशनर बऱ्याच दिवसां पासून रजेवर आहेत. त्यांनीं आणखी रजा वाढविली असें म्हणतात. ईश्वर करो व त्यांची प्रकृती लवकर चांगली होऊन ते आपल्या कामीं रुजू होवोत.

गेल्या आठ दहा दिवसां खालीं खनिन्यांत खुर्दा घ्यावयाचा नाहीं असा मे. डे. कमिशनर साहेब बहादूर यांनीं हुकूम दिला होता. त्या मुळें लोकांत मोठी गडबड उडाली होती. व जिकडून तिकडून त्या बद्दल पुकारा झाला यामुळें साहेब बहाद्दुरांनीं दिलेल्या हुकूमाच्या योग्य पणा बद्दल विचार करून पुनः तो हुकूम रद्द केल्याचें कळतें. खुर्दा खजिन्यांत फार झाला- इंग्रजी खुर्दा ह्या प्रांतांत फार झाला यामुळें खजिन्यांतील खुर्दा ह्यास खप नसल्यामुळें असें झालें- खुर्द्यानें सर्व बारदानें भरून गेलीं. यामुळें असा हुकूम देण्यांत आला होता असें ह्मणतात.कसेंही असो योग्य वेळीं याचा विचार झाल्यामुळें लोकांना फारसा त्रास झाला नाहीं. नाहींतर मुनसिपालिटी,शाळा खातें पोस्टखातें वगैरे लोकांना ज्याना खुर्दा भरावा लागतो त्यांना त्रास झाला असता.

पाऊस फार यामुळें साल्लमजकुरीं ताबुतांची मोठी धांदल उडाली आहे. आधींच मुसलमान लोक गरीब होत चालले आहेत तरी सण करण्याची मोठी हौस. जवळ कांहीं नसलें तरी पण दिवस साजरा करण्याची मोठी उत्सुकता. असें असतां पाऊसानें जर पाठ पुरविली तर बिचाऱ्यांचें होणार कसें! आज कत्तलची रात्र आहे. पहावें कसें होतें.

येथें श्री करुणेश्वराचे देवळांत श्रावण मासीं पंधरवाड्यांत भजन नाम सप्ता उभा राहात असतो. धार्मिक मंडळी हें काम करित असत हें कान करणारी अर्थात गरीब मंडळी असते. सात दिवस हें काम झाल्या वर अखेरच्या दिवशीं गांवात मिरवण्या करितां दिंडी काढीत असतात परंतु मोठी दुःखची गोष्ट कीं साल्लमजकुरीं मोहोरम व दिंडी काढण्याचा समय एकच आला यामुळें हिंदूंना परवानगी मिळाली नाहीं. दशा त्या हिंदुधर्माची! पोलिसा कडून ही मनाई झाली, असें म्हणतात ह्या मनाई नंतर मंडळी मे. डे. कमिशनर साहेबांकडे गेली होती परंतु तेथें ही ननाची बाराखडी. बिचारे लोक निराश होऊन परत आले आतां. ही गोष्ट-कमिशनरसाहेब पर्यंत जाणार असें म्हाणतात.

पूर्वीं मुसलमानी राजे असत तेव्हां अकबारा सारखे साधु बादशाहा सर्व रयतेला सारखे वागवीत असत. ज्यानें त्यानें आपापल्या धर्माप्रमाणें वागावें. अमुक लाडका अमुक नावडता असें नसे. आता राजे लोक परकी धर्माचे. त्यांना हिंदु व मुसलमान हे सर्व सारखे असावयाचे असें असतां मुसलमान लोकांचा यांना पाष कां? व हिंदु धर्माच्या बाबतींत परवानगी मागतात तर त्यांना मिळत नाहीं! हिंदुधर्माच्या बाबतींत इतकी हेळसांड व्हावी हे हिंदुधर्मानुयायी लोकांचें दुर्दैव. दुसरें काय?

---

नोटीस.

बालकिसन पैकमसिंग रहाणार मौजे खारी तळेगांव तालुके उमरावती यासी

खाली सही करणार इजकडून या नोटीसीनें असें कळविण्यांत येतें कीं तुह्मी माझे लग्नाचे भ्रतार असून मजला तुह्मी अंदाजा ५—६ वर्षें झालीं असतील, तुमची बहीण नामें नंदी बालविधवा इचे बरोबर गाडी बैलानें माझे बापाचे घरीं पोंचवून दिलें. तिनें बापास असें कळविलें होतें कीं, मी तीन चार महिन्यांनीं येऊन इजला घेऊन जाईन. माझे अंगावरील सर्व डागिने ( स्त्रीधन ) तुमचे कडील लग्नाचे वेळचे व आई कडील तुह्मी काढून घेतले. त्या नंतर माझा बापच एक वर्षांनीं मजला घेऊन तुमचे येथें पोंचविण्यास आला असतां पटाईती करून हाणमार वगैरे दांडगाईची धांदल करून मजला न घेतां काढून दिलें; तेव्हां पासून, कर्ज काढून माझे बापानें मजला पालिलें. हल्लीं माझा बाप पाळण्यास असमर्थ आहे सबब तुह्मांस असें कळविलें जातें कीं, ही नोटीस पावल्या दिवसांपासून एक महिन्याचे आंत मजील पांच वर्षांचे अन्नवस्त्राचे हक्काबद्दल रुपये ५०० देऊन माझी रसीद घ्यावी व पुढें मजला घेऊन जावें अगर दरसाल खाण्याचे खर्चा करितां १०० रुपये देण्याबद्दल करार करून द्यावा व माझें घेतलेलें स्त्रीधन वापस द्यावें. या प्रमाणें मुदतींत तुह्मी न केल्यास अन्नवस्त्राचे हक्काबद्दल वगैरेचा तुमचेवर योग्य कोर्टांत दावा केला जाऊन एकंदर सर्व खर्चा सुद्धां तुह्मांस देणें भाग पडेल. कळावें तारीख २९—७—९२

सही आपली रजांकित दासी—
बनी ऊर्फ धनिका मर्द बालकिसन हल्लीं
वस्ती सातिफळ ता० दारव्हा इचे
हातची निशानी खुद बांगडी

---

नोटीस

तीर्थरूप गंगा भागिरथी लहानी मर्द बापू मानभव राहणार हातरूण तालुके बाळापूर. यांचे शेवसी.

खाली सही करणार यांजकडून विज्ञप्तीनें कळविण्यांत येते कीं वडील मरण पाऊन चार महिने झाले नाहीं तोंच तुम्ही सापत्न मातोश्रीपणाचे सर्व खेळ करूं लागला. माझ्या कानावर गोष्टी ऐकू येतात कें तुम्ही हल्लीं तुमच्या ताब्यांत असलेल्या जिन्नगी ची वाताहत करण्याच्या बेतात आहां तर तुम्ही तसें करूं नये व कायद्यानें तसें करण्यास तुम्हास अधिकार नाहीं हें या लेखानें कळवितो. तुमच्या ताब्यांत बाराखांबी घर, दागदागिना अदमासें २०० रुपये किंमतीचा, एक म्हैस व किरकोळ चीजवस्त ही मालमत्ता आहे ती मी मागणी करी पावेतो जतन करून ठेवावी आणि तसें न केल्यास त्याची सर्व प्रकारची कायदेशीर जबाबदारी कोर्ट खर्च या नोटिशीच्या खर्चा वगैरे सुद्धा तुम्हावर व तुमच्या साथीदार लोकावर आहे. कळावें. तारीख ४ माहे आगष्ट सन १८९२ इसवी.

( सही )

किसन वल्लद बापु मानभाव राहणार हातरूण ता० बाळापूर दस्तुर खुद.

---

## जाहिरात

सर्व लोकांस या लेखान्वयें कळविण्यांत येते कीं आमच्या सापत्न मातोश्री लहानो बाई यांज पाशीं असलेली मालमत्ता व मिळकत ही सर्व आमच्या मालकीची असोन ती विकण्यास अगर तिची गैरकायदा व्यवस्था करण्यास कायद्यानें मनाई आहे तर जो कोणी त्यांच्या जवळील जिनगी विकत अगर गहाण घेईल तो स्वतांच्या जबाबदारी वर घेईल. त्याच्या बद्दल मी अगर माझ्या मालकीची जिनगी देणेदार होणार नाहीं कळावें. तारीख ४ माहे आगष्ट सन १८९२ इसवी.

( सही )

किसन वल्लद बापु मानभाव राहणार हातरूण ता० बाळापूर दस्तुर खुद.

---

## वर्तमानसार.

जडिशियल खात्यांतल्या सबार्डिनेट नोकरांबद्दल नवे नियम करून ते गेल्या मुंबई-सरकारच्या सरकारी ग्याझेटांत प्रसिद्ध झाले आहेत.

हैदराबादेचे चीफ जस्टिस नवाब इमाम जंग यांची पत्नी नुकतीच मरण पावली.

छावणी माजिस्त्रेट व त्यांच्या बदल्या या संबंधानें सरकारांतून कांहीं नवे नियम होत आहेत व त्यांत तें खातें अगदीं वेगळें करण्यांत येणार आहे.

नार्थ वेस्ट रेलवेने फौज न नेतां कराची रस्त्यानें नेल्यानें एका वर्षांत ६०,००० रुपये सेविंग होईल असा अजमास आहे.

चिनाब कालवा पुढें वाढविण्यास स्टेट सेक्रेटरी मंजुरी मिळाली व त्यास १,५०,००,००० खर्च करण्याचें ठरलें आहे.

अर्काटच्या नबाबाचे भाऊ इन्सालवेंट झाले!

वायव्यप्रांत व औध यांत लोकवस्ती फार दाट झाल्यामुळें त्यांतील लोकांस परमुलखांत नेणें जरूर आहे असें कित्येकांचें ह्मणणें आहे.

आठ रशियन गृहस्थ व्यापाऱ्यांचा वेष घेऊन अफगाणिस्थानच्या कांहीं भागांत प्रवास करून परत तुर्कस्थानांत गेले व त्यांचा लोकांनीं सन्मान केला असें सांगतात.

फ्रान्साच्या सल्यानें मला स्वतंत्र करा असें मोरोकोच्या सुलतानाचें रशियास ह्मणणें आहे?

हजारा लोकांनीं काबूल व हीरांत यांच्या दरम्यानचा रस्ता हल्लीं बंद पाडला आहे.

या हजारा प्रांताचा इंग्रजी डेपुटी कमिशनर मि. कनिंगहाम हा हल्लीं सिमला येथें आला आहे. ब्लाक मौंटन प्रकरणचा विचार करण्याकरतां आला असावा असें अनुमान आहे.

हुकूम झालेले बंगाल सापर मानरचे लोक गिल्जित येथें जाण्यास निघाले व फार घाईनें जात आहेत.

मुंबईच्या २८ व्या पळटणीस मणीपूर येथें जाण्याचा हुकूम झाला आहे.

भामोच्या हद्दीवर कांहीं हत्यारबंद चिनी व गुरखा पळटणींतले कांहीं लोक यांच्यांत मारामार झाली व त्यांत चिनी पळाले व त्यांचें पुष्कळ नुकसानही झालें.

ठा० अ०

अमेरिकेंत न्यूयार्क संस्थानांत एका तुरुंगांतील कैदी लोक "समरी"– "सारांश" नांवाचें एक वर्तमानपत्र काढीत असतात. हें वर्तमानपत्र फार चांगलें निवतें असें ह्मणतात. यांत लिहिणारे कैदी, पत्रसंपादक (एडिटर) कैदी, खिळे जुळणार कैदी जुळणार कैदी, छापणार कैदी, विकणार कैदी, आणि विकलें जातें हीं बहुशः कैद्यांनाच. याचें बाह्यांग, अंतरंग दोन्हीही सुंदर असतात. आंतील विषय त्याच्या वाचकांना ज्यात विशेष मजा वाटेल असा असतो. निरनिराळ्या टैपांत छापिलेलीं आठ पानें असतात. पहिल्या पानावर तुरुंगांतली हालहवाल; नंतर मुख्य लेख व स्फुट लेख. त्या पुढें बातम्या वगैरे असतात. शिवाय त्यांत एक कादंबरी येत असते. वर्गणी सालीना दोन शिलिंग. तुरुंगांतील लोकांची हालहवाल या सदराखालीं सूचना असते ती मोठी मजेदार आहे:–

आता मात्र महाराज गाईकवाड यांनीं आपल्या जन्माची कमाल केली!! यांचा हा फकिरी बाणा कित्येकांस भोवणार समजत नाहीं. यांनीं आपले चिरंजीव तरुण श्री. फत्तेसिंग महाराज यांस विलायतेमध्यें ठेऊन तेथील शिक्षण देण्याचा निश्चय करून बहुतेक व्यवस्था अस्ते अस्ते बनावटींत आणून सोडली मि० गोविंद सखाराम सरदेसाई बी. ए. यांस चिरंजीवापाशी ठेवण्यासाठीं एकदम तार करून घेऊन गेलें; महाराज फत्तेसिंग विद्वान होतील, उपदेशक बनून बापादेखत ब्राह्मणाचे खूळ मोडतील देव देवस्थानावर पाणी घालून ती उत्पन्नें अनेक मिशनाकडे सोंपतील, पण एक हात तोफेच्या कान्यावर व दुसरा हात घोड्याच्या अनिनीस देऊन पराक्रमाचा मोर्चा लावण्यांत जो त्या घराण्याचा लौकीक त्यांत हे तरुण महाराज तिकडील शिक्षणानें कितपत लगोरी घोडा फेकून फत्ते मिळवितील हें कांहीं सांगवत नाहीं. कसेंही असो. सयाजीराव महाराजास तिकडील हवा बहुतेक मानवल्यासारखी होऊन प्रकृती बरी आहे ते आता इकडे येऊन चित्त श्रम व वैताग वृतीमुळें तक्तावर बसून राज्य कारभार पहातील ही आशा पुरी होण्यास अनेक अडचणी पुढें येत आहेत तथापि त्यांनीं तिकडचे राहणें राजकीय सत्तेनें किती परावलंबी आहे इकडे लक्ष देऊन परत यावें नाहींतर पुढें मार्गे गोंडल संस्थानदाराप्रमाणें मोठा दगा बसण्याचा संभव आहे.

मा. मि.

ग्वालेर कौंसिलचे प्रेसिडेंट श्री. बापू साहेब जाधव यांनीं माळव्यांतील जमिनीचा शेतसारा कमी करण्या हुकूम केला आहे.

हिंदुस्थानांत एकंदर ५७३ वर्तमानपत्रें निवत असतात. तीं एकंदर १६ भाषांतून निघतात.

पोष्टखातें व मीठ — सांबर सरोवरांत व त्याजजीक दुसऱ्या ठिकाणीं जें मीठ पिकते. तें मीठ व्यापाऱ्यांनीं पोष्टांत आगाऊ पैसे भरावे व त्यांस घरी बसून रेलवेनून येऊन पोंचावें अशी एक पद्धत दोन वर्षांपूर्वीं अनुभवासाठीं ह्मणून सुरू करण्यांत आली होती. त्यानें व्यापाराचा सोय होऊन पोष्टालाही बरीच किफायत असें दिसून आल्यावरून ती पद्धत जेथें रेलवेची सोय आहे तेथें जारी करण्याबद्दल हिंदुस्थान सरकारचा हल्लीं एक ठराव झाला आहे व्यापाऱ्यांनीं मिठासाठीं जे आगाऊ रुपये पोष्टांत भरावयाचे, त्यावर शेकडा आठ आणे पोष्टाचे कमिशन ठरविलें आहे आमच्या मुंबई सरकारानें खाराघोडा येथील मिठागरांचे संबंधानेंही ही पद्धत सुरू करण्याबद्दल हिंदुस्थान सरकारास शिफारस केली होती, ती सरकारानें पसंत करून वरील पद्धत तेथें सुरू करण्याबद्दल पोष्टखात्याचे वरिष्टांस फर्माविलें आहे असें समजतें.

शाळाखात्यांतील इंग्रजी शिक्षक वगैरे वकिलीची किंवा मुनसफीची परीक्षा देण्याकरितां मोठमोठ्या रजा घेतात; आणि अनुभविक मनुष्य गेल्यामुळें शाळेतील अभ्यासाचें नुकसान होतें; याकरितां ह्या परीक्षांकरितां ह्मणून त्याला मोठाल्या रजा देऊं नयेत अशी अर्थाचा एक ठराव अलीकडे सरकारानें केल्याचे एज्यु. रेकार्डवरून समजतें.

इंग्रजी झालीं त्या वेळीं ब्राह्मण लोकांची स्थिति व मतें कशी होती, २५ वर्षांपूर्वीं कशीं होतीं व हल्लीं कशीं आहेत त्याचा रिपोर्ट मुंबई सरकाराकडून विलायत सरकाराकडून विशारतं सरकारास गेला आहे असें समजतें! हा ब्रह्मपार्टीचा प्रताप असावा!!

क० त०

नोटीस.

रा० रा० भोनाप्पा वल्लद सिवाप्पा राहणार निमकरदे तालुके बाळापूर यांस नोटीस देणार देवाप्पा वल्लद मल्लाप्पा राहणार लिबकरदे. नोटिसिनें असें कळवितो कीं तुम्ही ता० २५ जुलई सन १८९२ रोजीं वऱ्हाड समाचार छापखान्यातून नोटीस दिली ती पावली. त्यात तुम्हीं रुपये २० वीस कर्जांत दिले म्हणून लिहिले तर तुम्ही रुपये २० न देतां माझे तुम्हांकडे जें येणें आहे त्यांत रुपये १३ दिले. ते तुमचे खातीं जमा आहेत. आता तुम्हांकडे माझे जे रुपये वाजवी वाजवी येणें आहेत ते रुपये ही नोटिस पावल्या पासून आठ दिवसांत आणून देऊन निकाल करावा. असे केले नाहींतर ह्या नोटीसिच्या खर्चा सुद्धां तुम्हांवर फिर्याद करून अखेर निकाल होईं पर्यंत जें नुकसान व खर्च वगैरे होईल तो सर्व भरून घेतला जाईल म्हणून दिली नोटीस. ता. १-८-९२ इ०

(सही)

देवाप्पा मल्लाप्पा वाणी राहणार निबकादे दस्तुर खुद्द.

नोटीस

नोटीस लख्या वल्लद बनसी जात माहार तायळे राहणार मौजे सावंगी नजीक खेरी ता० व जि० एलिचपूर यांस नोटीस देणार रायजी मर्द लख्या जात माहारीण राहणार कसबे धुगांव ता० जी० उमरावती, इजकडून नोटीस देण्यात येतें कीं तू माझा लग्नाचा नवरा असून मी तुझी लग्नांची बायको व तुझें माझ्याशी लग्न लागून, आज सुमारें १५–१६ वर्षें झालीं मी अज्ञान असतां रीती प्रमाणें तुझे घरीं येत जात असें. पुढें मीं शाहाणी होऊन आज पांच साहा वर्षें झालीं शाहाणी झाल्यावर तुझे घरीं मी दोन २ वर्षें राहिले होतें. परंतु सुखसोहाळ्यास नाहीं, म्हणजे पुरुषत्व तुझे आंगीं नाहीं, या संबंधानें कसबे धुगांव, व मौजे खेरी व मौजे सावंगी, व मौजे दोनाड ह्या चार गांवचे पंच जमा होऊन तुझे अंगीं पुरुषत्व नाहीं, असें तू स्वतः पंचा समक्ष मुक्कास्यानें कबूल केलें. मात्र पंचानी तुला आणखी ६ महिन्याची मुदत दिली होती. पुन्हां एक १ वर्षांनंतर कसबे धुगाव येथील. धुर्पतो नामे कळवांतीन तुझे घरीं पंचानीं आणून तुझे अंगीं पुरुषत्व नाहीं असे पक्कें सर्वांच्या लक्षांत आलें त्या बद्दलचा खर्च माझ्या चुलत्यांनीं दिला. मनकडून पंचानी जो ठराव केला त्यांत तू त्यांचे समक्ष फारकती देतो म्हणून कबूल केलें. त्या वरून माझ्या चुलत्यानीं कागदा करितां तुला दोन २ रुपये दिले ते तू घेऊन पळून गेलास. संध्याकाळ पर्यंत तुझी वाट पाहून थकले नंतर आपापले गांवीं चालते झाले असें तू त्याना दोन तीन वेळां ठकविलें. हल्लीं तुझी स्थिति पुरुषत्वांत नाहीं असें मला व च्यार गांवचे पचास पक्कें समजलें आहे. तर मी कळवितें की आज पर्यंत तुझी वाट मी पाहिली. कीं. आजबरा होशील उद्यां बरा होशील ही जी आशा होती. ती अगदीं नाहीशी झाली. मी आपल्या चुलत्याचे घरीं तुझ्या आशेवर लोकांचे कर्ज काढून आज सरासरी चार ४ वर्षें पर्यंत राहिले त्यास माझे चुलत्याला फार कर्ज झाले आहे. व तोही मला अन्न वस्त्र देत नाहींत तर तु मला दरमहा रुपये ४ चार प्रमाणें चार वर्षांचा अन्न वस्त्राचा झालेला खर्च १९२ एकशें ब्यानउ रुपये शिवाय या नोटीशीचा खर्च आणि २–३ वेळां पंचांस जो खर्च लागला तो माझे चुलत्यानीं खर्च केला तो, हातानीं रुपये घेऊन पळून गेलास ते हे सर्व ही नोटीस पावल्या दिवसा पासून पंधरा दिवसाचे आंत जर नोटिशी प्रमाणें अमलबारी तुजकडून झाली नाहीं तर रीती प्रमाणें दुसरा घरठाव करीन. कळावें तारिख २ माहे अगष्ट सन १८९२ इ०

(सही)

सहीची निशाणी रायजी मर्द लख्या माहारीण इच्या हातची बागडी केली असें.

नोटिशीचें उत्तर

रा. रा. भोनाप्पा वल्लद शिवाप्पा रहाणार निमकरदे ता० बाळापूर यांस. खाली सही करणार याजकडून या नोटिसीनें कळविलें जाते कीं, तुह्मीं तारिख २५ माहे जुलई सन १८९२ इ० ची नोटीस वऱ्हाडसमचार छापखान्यांतून दिली ती पावली. नोटिशींतील सर्व मजकुर खोटा आहे. तुह्मी तारिख २३ माहे जुलाई रोजीं रुपये शंभर १०० घेऊन फारकती करून दिली आहे. व याजबद्दल साक्षीदार वगैरे सर्व पुरावा आहे. आह्मी तुह्मास कर्ज रुपये मुळींच दिलें नाहींत. तुह्मी जें कांहीं नोटिशींत कळविलें तें अगदीं खोटें आहे. याजबद्दल योग्य कोर्टांत काम चालेल त्यावेळीं कागदपत्रीं व तोंडी पुरावा साक्षी वरून वगैरे शाबीत करून देण्यास आह्मी तयार आहों. तुह्मी जे ता० २३-७-९२ इ० चें फारकत करून दिली त्या प्रमाणें आह्मी अमलबारी करीत आहों. जर करितां तुह्मी आह्मास अडथळा वगैरे कोणच्याही प्रकारचा केल्यास त्या बदल जबाबदार तुम्हास धरून योग्य तजवीज करूं. व जें जें नुकसान निकाल होई पर्यंत होईल तें व ह्या नोटिशीचा खर्च असें सर्व भरून घेऊं ह्मणून दिली नोटीस ता०

(सही.)

गणु वल्लद यलाप्पा रहाणार खेटरी ता. बाळापूर द. खु.

## अकोला बाजारभाव.

| | | | |
|---|---|---|---|
| हुंडी मुंबईची दर्शनी | | | १००॥ |
| " १५ दिवसाच्या मुदतीची | | | १००=॥ |
| सुवर्ण २५।– रुपें १०८॥ | | आळशी | १०३ |
| गहूं काठे | ७७॥ | बनशी | ९० |
| जवारी | ४७ | सर्की | ५। |
| तूप ९॥ | मीठ ३॥≡। | तेल | ६।= |

सऱ्यांचे भाव. (मोंगलाई)

| | | | |
|---|---|---|---|
| गहूं | वैशाख शुद्ध | १९४९ | ६७। |
| आळशी | चैत्र शुद्ध | १९४९ | ८८ |
| रुई | फाल्गुन | १९४९ | ५४॥। |
| सर्की | वैशाख नवे सालची | १९४९ | ४॥।= |
| जवारी | बसंत | १९४९ | ४६॥= |

गु० प०

☞ हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाची आगाऊ रु० ५ डांक हाशील ०।३
सहामाही ,, ३ ,, ०८
सालअखेर ,, ७ ,, १०८
किरकोळ अंकास ..........................०४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस ..........०१

SUBSCRIPTION
Rs.
Annum in advance 5 Postage 13 as
Annum in arrears 7 ,,1Rs 8 as
Six monthly............3 " 8 as
Single copy..................................4as

Advertisemen
Below 10 lines...2Rs
per line over10...4 as
Repetition per line3as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXVI AKOLA MONDAY 15 AUGUST 1892 NO 32

वर्ष २६ आकोला सोमवार तारीख १५ माहे आगष्ट सन १८९२ इ० अंक ३२

## जाहिरात

—— 0 ——

अहो स्वदेश बांधवहो, परदेशी औषधी नुरत्या रंगबाज व कमिशन जास्त पाडून कां फसतां? इकडे थोडे लक्ष द्या.

आमचे दवाखान्यांत सर्व रोगांवर औषधी विक्रीस व दरिद्री लोकांस फुकट तयार आहेत; परंतु त्यांत ज्या हटकून गुण खात्रीनें देतात त्यां पैकीं थोड्या प्रसिद्धीस देतों. त्यांतून जो दवा कोणास लागेल त्यांनीं खालीं लिहिलेले सहीचे पत्यावर पत्र पाठवावें. ह्मणजे आम्ही व्ह्याल्युपेबलनीं पोस्टमार्गे लवकर पाठवूं. व कोणी आजारी आमचे येथें येऊन औषध घेतील त्यांस प्रथम दुरुस्त करून ठरलेली किंमत मागाहून घेऊं.

हमेशा घेणारे ग्राहकांस कमिशन देऊं. व त्यांनीं विक्री करून दाम पाठवावें.

१ गजकर्णावर रामबाण, ६ दिवसांत गुण किंमत दर बाटलीस ०८ आणे.

२ मूळव्याध कितीही दिवसांची दुर्धर असेल त्यावर मोडावर लावण्याचे व पोटांत घेण्याचें दोन औषधी मिळून किं. १॥ रु.

३ चातुर्थिक ज्वर ह्मणजे चवथारें हिव ताप त्याच प्रमाणें तिजारे, व दररोज येणारे कितीही दिवसांचे असो, त्याजवर मिश्रित औषध एकच बाटली पुरे. किं. १॥ रु. दुसरें औषध गोळ्या खात्रीच्या २१ गोळ्यांच्या डबीस १०९ या औषधानें कडक तापही जातो.

४ परमा तिडिक व स्वप्नावस्था, व कोष्ठांतील उष्णता व क्षिणता या सर्वांवर मेहुणपुडा किं. १ पुड्यास ०१४ आणे.

५ बाळंत रोग बाळाचे डबे व सटवी बाधा व प्रदर सर्व तऱ्हेचा किं. १ डबीस १॥ रु.

६ वीस प्रकारचे मेहापैकीं १६ मेहावर १४ गोळ्यास किं. २॥=

७ नारुवर ९ दिवसांत गुण. लावणें व खाणे याच्या डबीस किं. ।

८ गुल्म पांच प्रकारचे व सर्व पोट शुळांवर व गोळ्यावर व पानथरीवर १ डबीस किं. ॥।

जुलाब उत्तम राजस तकलीफ अगदीं नसून कोठा साफ १ बाटली १० मनुष्यास पुरेल किं. १। रु.

१० मेदोरोग व फुरें व उन्माद यावर अगदीं जल्द गुण १ बाटलीस किं. २ रु.

११ स्त्रियांचे रक्तस्राव व ऋतुस्नात होण्यास व गर्भधारणास बंदेज ह्यांवर हें एकच औषध फार चांगलें आहे. १ डबीस किं. १॥

१२ पिनस व मस्तकशूळ व अर्धशिशी याजवर दर डबीस किं. १०=

१३ हागवण व अतिसार १ डबीस किं. १।=

१४ वृषण एकारल्यास व वृद्धीस १ डबीस किं. १ रु.

१५ कावरले कुत्रें व कोल्हे व तेल्या उंदीर डसल्यास १ डबीस किं. १। रु.

१६ मेहानें अगर उष्णतेनें पाय उलून रक्त जाणें व संधि दुखणें ह्यावर १ डबीस किं. १॥ रु.

१७ महामारीवर अगदीं जलद गुण एक मनुष्यास १२ गोळ्या ९० गोळ्यांच्या डबीस किं. १०–

१८ गर्मी उर्फ उपदंश संबंधी विकार क्षतें यांजवर १ डबीस किं. १॥ रु.

१९ फसली उर्फ मज्जागतवात व शूळ याजवर लवकर १९ मिनिटांत गुण १ डबीस किं. ।॥ हें १९ मनुष्यांस पुरेल.

२० कऊळ, नळगुद, पंडु, सूज व मुखरोग ६९ व सन्निपात १३ यांवर १ डबीस किं. १॥ रु. ही ३ मुलें व २ पुरुषांस पुरेल.

२१ सुवर्णमालिनीवसंत खात्रीचा १ तोळ्यास किं. ७ रु.

२२ योगराज गुगुळ १ तोळ्यास ४॥ रुपये.

२३ नामर्द ह्मणजे नपुंसक कितीही दिवसांचा असो तरी तो तीन दिवसांत दुरुस्त खात्रीनें होईल. १ बाटलीस किं. ३ रु. गुण न आल्यास पैसे परत मिळतील.

२४ डोळ्यांतील फूल वडस रातांधळें लाली खुपरी चुळ चीपडे गळतो याजवर १ डबीस किं. १०६

या शिवाय जास्त माहिती मागविल्यास देऊं. व कोणी योग्य औषधें हमेशा मागवून विक्री करील त्यांनीं विक्री करून पैसे मागाहून पाठवावे.

(पत्ता व सही) शिवचरनगीर रामगीर कुरणखेडकर अकोला गंगावरचे माडीवर चौकांत दवाखाना. वऱ्हाड.

## विवाह संबंध व स्त्रियांची उत्क्रान्ती.

( रा. रा. हरी रामचंद्र रोहिणखेडकर बी.ए यांचें व्याख्यान. )

स्त्रीपुरुष संयोग हा सृष्ट प्राणिमात्रास लागूं आहे. सृष्टींतील सर्व प्राणिकोटि कायम राहण्यास व तिची वृद्धि होण्यास सर्वज्ञ परमेश्वरानें प्रत्येक प्राण्याचे हृदयांत कामवासनेचें बीज ठेविलें आहे. लग्न ह्मणजे स्त्रीपुरुषांचा समागम कांहीं नियमित वेळपर्यंत किंवा सर्व आयुष्यभर अव्यभिचारानें राहणें हें होय. या योगानें अयोग्य रितीनें होणाऱ्या संबंधाचें नियमन होतें. जगाचा इतिहास पूर्वीपासून पाहिला असतां मनुष्य जातीच्या रानटी स्थिती मध्यें स्त्रीपुरुषांचा अनियमित व्यवहार दृष्टीस पडतो. जगांत मनुष्यें उत्पन्न झाल्यावर कांहीं वेळपर्यंत एकएकटी राहूं लागलीं परंतु ज्या वेळेस त्यांना या स्थितीपासून अडचणी विशेष पडूं लागल्या ह्मणजे स्वसंरक्षण किंवा जीवना संबंधी व्यवस्था यास अनेक हरकती येऊं लागल्या तेव्हां पासून मनुष्यें लहान लहान टोळ्या करून राहूं लागलीं. असे हे लहान लहान समाज बनत गेल्यावर त्यांनीं अरण्यांत फिरावें व मृगया करून आपलें उपजीवन करावें. पुढें या समाजाजवळ थोडी बहुत गुरें आल्यावर तीं गुरें चारण्यास त्यांना स्थलान्तर करावें लागत असे व जेथें गुरांच्या चरण्याची सोय ज्यास्त असे अशा प्रदेशीं कांहीं दिवस राहून ते आपलें उपजीवन करित असत. या पुढें कांहीं सुपीक प्रदेशांत उत्पन्न करून आपली उपजीविका करावी असा त्यांच्या मनांत विचार आला व त्यांनीं कांहीं जमीन आपले ताब्यांत घेऊन कृषिकर्मास आरंभ केला व पुढें आपल्या जवळच्या वस्तू त्या शिवाय इतर पदार्थांची आपल्यास गरज लागल्यास ते पदार्थ दुसऱ्या जवळून घेऊन त्यांचे मोबदला आपल्या जवळील पदार्थ त्यांस द्यावे या प्रमाणें पदार्थांचा परस्पर विनिमय अंमलांत आला. पुढें निरनिराळ्या प्रकारची नाणीं अंमलांत आलीं व निरनिराळ्या लहान समाजामध्यें दळणवळण सुरूं झालें. व निरनिराळ्या प्रकारच्या सुधारणाही अमलांत आल्या. येणें प्रमाणें समाजाचें स्थित्यंतर कसें होत गेलें हें कळविलें.

समाजाचे प्रथम स्थितीमध्यें ज्या प्रमाणें राज्यव्यवस्थेचा अभाव असतो त्याच प्रमाणें कुटुंबव्यवस्था ही नसते. लग्न संस्थाही निसर्गाची नसून पुढें मनुष्यानें आपल्या सोयीस्तव करून घेतली आहे असें. इतिहासावरून दिसतें. महाभारतांत आदिपर्वांत पंडु व कुंती यांचा संवाद आहे त्यावरून असें दिसतें कीं विवाहाची पद्धत सुरूं झाली नव्हती. व ती त्या काळाचे पुढें अंमलांत आली. श्वेतकेतु व दीर्घतमा ऋषींच्या गोष्टीवरून ही हा सिद्धान्त दृष्टीस पडतो. एके दिवशीं श्वेतकेतु व त्याचा बाप बसला असतां त्याची आई दुसऱ्या ब्राह्मणा बरोबर जाऊं लागली तेव्हां त्यानें तिला शाप दिला कीं ज्या स्त्रिया एक पति केल्यावर त्यास सोडून जातील त्यास भ्रूणहत्येचें पातक लागेल. दीर्घतमा ऋषि हा आंधळा होता व त्याची पत्नी त्यास सोडून जाऊं लागली असतां त्यानें ही अशाच प्रकारचा शाप दिला आहे. ग्रीस आणि रोम येथील जुन्या काळचे जे ग्रंथ प्रसिद्ध आहेत त्यावरून असें दिसून येतें कीं स्त्रीपुरुषामध्यें ही अनियमित व्यवहाराची चाल होती.

मनुष्य प्राणि हा संगतिप्रिय आहे. त्याच्या स्वभावांतच ईश्वरानें असे कांहीं गुण ठेविले आहेत कीं तेणेंकरून त्यास संगतीची नेहमी इच्छा असते. हा स्वभाव इतर कांहीं प्राण्यांत ही सांपडतो. कांहीं वन्य पशुही नेहमीं आपले कळप करून राहतात. व या स्वभावास अनुसरूनच मनुष्यानें आपआपले लहान लहान समाज केले असें वर सांगितलेंच आहे. या स्वभावा प्रमाणेंच मनुष्याच्या अंगीं असा एक दुसरा स्वभाव दिसून येतो कीं कांहीं इयत्ते पर्यंत समाज झाल्यावर त्यांच्याशी कलह करावा अशी कलहबुद्धि त्यांच्यांत सापडते. ही गोष्ट अतिशय अडाणी स्थितींतले जे देश आहेत त्या पासून तों सुधारणेच्या शिखराला जाऊन पोंचलेले जे देश आहेत त्या सर्वांना लागूं पडते. जगांतील जुन्या राष्ट्रांचे जे इतिहास उपलब्ध आहेत त्यावरून स्पष्ट दिसून येतें कीं नेहमीं निरनिराळ्या प्रदेशांत निरनिराळ्या राष्ट्रांत लढाया चालूं आहेतच. संगतिप्रियता व कलहबुद्धी यांचा स्त्रियांच्या स्थितींशीं अतिनिकट संबंध आहे तो पुढें येईल.

विवाह व स्त्रियांची स्थिती यांच्या संक्रमण संबंधानें येणें प्रमाणें भाग केले आहेत:-

( १ ) स्त्रीपुरुषांचा अनियमित विवाह.

( २ ) अनेक पतित्व.

( ३ ) अनेक पत्नीत्व.

( ४ ) एक पतित्व व स्त्रियांचें दास्य.

( ५ ) लढाया संपल्यावर लग्न संबंधी पवित्र विचार.

( ६ ) स्त्रियांविषयीं उदारबुद्धि, स्त्रियांची उन्नति, व स्वयंवर पद्धति.

( ७ ) धर्म प्राबल्य, नीतिवर्धन.

( ८ ) स्त्रियांची अवनति.

( ९ ) युरोप आणि अमेरिका या पाश्चात्य खंडांत लग्नास ऐच्छिक करारांचें रूप देण्याविषयीं विचार.

स्त्रिपुरुषांचा अनियमित विवाह कांहीं वेळ चालल्यावर समाजाचें अस्तित्व कायम राहण्यास व त्याची वृद्धि होण्यास कांहीं तरी निर्बंध असावा असे लोकांच्या मनांत विचार येऊं लागले. जेथें अनियमित विवाह व अनेक पतित्व या व्यवस्था चालूं आहेत तेथें समाज बळकट होऊं शकत नाहीं व समाजास निर्बंध राहत नाहीं असें दृष्टोत्पत्तीस आलें. मलबार प्रांतांत नायर लोक व तियार लोक, मदुरा प्रांतांत कंदुवत व कल्हण, अयोध्या प्रांतांत तिहूर लोक व नीलगिरी प्रांतांत तोडे लोक व तिबेट आणि लंका यांत कांहीं जाती आहेत त्यामध्यें स्त्रिपुरुषांचा अनियमित विवाह व अनेकपतित्व हीं चालूं आहेत. या संस्था वरून मुलांचा बाप कोण हें समजत नाहीं. तीं आईचे बाजूनें चालतें व या संबंधास गोसंबंधाची उपमा दिली असतां चालेल. एक स्त्री अनेक पती जवळ राहूं शकते. या वरूनच पुढें अशी चाल पडली कीं, एका स्त्रानें अनेक बंधु वरावे. उत्तर हिंदुस्थानांत तीतियर ह्मणून एक जात आहे त्याच्या धर्मानें त्यांना असा नियम करून दिला आहे कीं कुटुंबांतील भाऊ, चुलते पुतणे, यांच्या स्त्रिया समायिक असाव्या. ह्या स्थितीसंबंधानें आपल्या जुन्या धर्मग्रंथांत ही उदा-

हरणें सांपडतात. ऋग्वेदांत अश्विनी कुमारस्तोत्र आहे त्यांत त्यांनीं असें वर्णन केलें आहे कीं, एका स्त्रीनें अश्विनी कुमार या दोघां बंधूशीं लग्न केलें. पु० चा०

वऱ्हाडसमाचार

मिती श्रावण वद्य ८ शके १८१४

मरणाहून इहलोकीं मोठी हानि नाहीं आणि त्याच हानीच्या पायीं पुण्यांतील एक महान् मौल्यवान रत्न गेल्या मंगळवारीं हरपलें हें कळविण्यास फार दुःख वाटतें. फर्ग्युसन कालेजचे प्रिन्सिपाल वामन शिवराम आपटे एम. ए. हे २१ दिवसांचा विषमज्वर होऊन मरण पावले हें ऐकतांच सर्वजण हळहळल्या वाचून राहणार नाहींत. प्रोफेसर वामनरावजी हे एवढे लोकप्रिय, विद्वान, सद्गुणी होते कीं त्यांच्या देहावसानाची वार्ता सर्व पुणें शहरांत हांहां म्हणतां पसरतांच शाळा, हायस्कुलें, कालेजें वगैरे विद्यालयें त्यांच्या स्मरणार्थ बंद राहिलीं आणि थोर थोर शिष्टजन आदिकरून चार पांच हजार लोक दीनमुद्रेनें त्यांच्या स्मशानयात्रेस लोटला. मरण समयीं त्यांचे वय ३४ वर्षांचे होतें.

प्रोफेसर आपटे यांचें चरित्र कित्ता घेण्या सारखें आहे. स्वभावातः हे मोठे बुद्धिमान, दृढाभ्यासी, व अपूर्व अवधारणाशक्तीचे होते. घरची गरिबी होती तरी त्यांनीं स्वपराक्रमानें विद्यार्जन केलें आणि त्यांच्या विद्याभ्यासाच्या कालांत त्यांनीं बक्षीसें, स्कालरशिपा, फेलोशिप वगैरें मिळवून मुंबई युनिव्हरसिटींतील उपपदधारी विद्वानांमध्यें अग्रस्थाना पर्यंत आपली पदवी वाढवून घेतली. कैलासवासी विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं स्थापलेल्या न्यू इंग्लिश स्कुलांत ते प्रथम शिरले. शास्त्रीबोवांच्या मागें मोठ्या दक्षतेनें ती शाळा चालवून एवढ्या भरभराटीस त्यांनीं आणिली कीं त्या शाळेला पुढें फर्ग्युसन कालेज जोडण्यांत आलें आणि डेक्कन एज्युकेशन सोसायटी ही नवी स्थापण्यांत आली. प्रोफेसर अगरकर, टिळक, नामजोशी आदिकरून जी थोडी मंडळी वगैरे सर्वमान्य विद्यालयाच्या संस्था चालविण्यांत अग्रेसर होती त्या सर्वांमध्यें प्रो० आपटे हे मुख्य होते. यांची दक्षता, व्यवस्था व शिकविण्याची हातोटी इतकी उत्तम व अनुपमेय होती कीं, त्यांच्या गुणांविषयीं सर्व छात्रवर्ग वारंवार आख्यायिका सांगत असतो. प्रो० आपटे यांचा व्यासंग मोठा होता. त्यांची पारंगतता संस्कृत भाषेमध्यें अप्रतिम असून पुष्कळ संस्कृतांतील ग्रंथ व व्याकरण हीं त्यांना करतलामलका प्रमाणें पूर्णपणें अवगत होतीं. आमरण त्यांनीं आपला काल विद्याभ्यासांत घालविला. आणि त्यांच्या ज्ञानभाण्डारांतील अनुपम नवरत्नांचा उपभोग त्यांच्या शिष्यजनांस मिळाला इतकेंच नाहीं तर त्यांनीं सर्व संस्कृत विद्या आपल्या ग्रंथरचनेनें सुगम सुलभ, व वृद्धिंगत करून सोडली आहे. हे फार नेमस्तपणानें वागत असत. हे वचनाचे घट्ट, बाणीदार वर्तनाचे व मोठे अभिमानी होते. यांचा उद्देश त्यांच्या स्वतःच्याच उदाहरणानें विद्यार्थ्यांच्या मनांत चांगला ठसे. इंग्रजी–संस्कृत व संस्कृत–इंग्रजी कोश संस्कृत गाईड संस्कृत भाषांतरमाला वगैरे यांचे ग्रंथ संस्कृत शिकणारे विद्यार्थी रात्रंदिवस हातीं बाळगीत असतात तेव्हां त्यांची आठवण व सत्किर्ती लोकामध्यें सदैव राहील. नुकतीच तिशी उलटून चार वर्षें होत नाहींत तोंच हे मरण पावल्यानें त्यांच्या अमूल्य, व्यवस्थित, व अति विस्तृत विद्यावृक्षाच्या उत्कृष्ट, अमृतोपम, व मधूर फळांना सर्व संस्कृत भाषाभिज्ञ लोक अंतरले ही नुकसानी भरून न येणारी आहे! सर्व गोष्टीत स्मरण ठेवण्यासारखी ही कीं, यांच्या टापटीपीच्या, नेमस्त, व चोख वर्तनानें यांच्या हातून अनेक भगीरथ प्रयत्नाचीं कामें व ग्रंथ संपूर्णतेस गेले. सुधारक पक्षाकडे यांचे कल असत तरी सामाजिक प्रकरणांच्या भानगडी मध्यें आणि त्याच प्रमाणें राजकीय गोष्टीमध्यें हे फारसे गुंतलेले नसत. सारांश, प्रोफेसर वामन शिवराम आपटे मरण पावल्यानें महाराष्ट्राचेच काय सार्‍या राष्ट्राची फार मोठी हानि झाली! पण ईश्वरास जी गोष्ट रुचली ती मनुष्यानें आवडून घेतलीच पाहिजे ईश्वर राजश्री वामनराव आपटे यांच्या आत्म्यास उत्तम लोकप्राप्ति होवो अशी प्रार्थना करून आम्ही हा लेख पुरा करितों.

नामदार दादाभाई नवरोजी एम. पी. हे गेल्या निवडणुकींत तीन मताधिक्यानें निवडले गेले तरी त्यांच्या प्रतिस्पर्ध्यानें मतांची पुन्हा तपासणी व्हावी म्हणून अर्ज केला होता. हा अर्ज झाल्याचें ऐकून आमच्या अमृतमय आनंद सागरांत विष कालविण्या प्रमाणें झालें होतें. परंतु बहुत बहुत संतोषाची बातमी कळत कीं तपासणी मध्यें हिंदुस्थानच्या या वृद्ध पितामहास तीन मतें अधीक होतीं त्या ठिकाणीं आणखी दोन मतें जास्त मिळालीं. एकूण सिद्धान्त हाच ठरतो कीं

॥सत्यसंकल्पाचा दाता भगवान । तोचि करी पूर्ण मनोरथ॥

गेल्या मंगळवारीं हाऊस आफ कामन्स सभे मध्यें नव्या प्रधान मंडळाचा प्रोग्राम ग्लाडस्टन साहेबांनीं कळविल्या नंतर शेट दादाभाई यांनीं आपल्या भावी संभाषणमालेचा श्रीगणेशायनमः म्हणून दाखविलायेणे प्रमाणें के० ब्राडला साहेबांची जागा सेंट्रल फिन्सबरीच्या लोकांच्या उदार कृतीनें शेवटीं दादाभाईंनीं भरून काढली हा आमच्या भाग्याचा अरुणोदयच समजला पाहिजे

वऱ्हाडांतील वकिली संबंधानें नवा कायदा हिंदुस्थान सरकारनें प्रसिद्ध केला आहे त्या अन्वयें जे मुख्य फेरफार करण्यांत आले आहेत ते येणें प्रमाणें:—

( १ ) वऱ्हाडांतील सनदी वकीला खेरीज इतर हायकोर्टाचे आडव्होकेट, वकील व अटर्नी यांना तिकडे वकिली करीत असतांना इकडे वकिली करण्यास हरकत नाहीं; तरी त्यांना इकडेच नेहमीची वकिली करणें झाल्यास वऱ्हाडच्या पहिल्या नंबरची सनद मिळेल पण त्यांनीं दुसरीकडे तीन वर्षें वकिली केलीं असून आणि मराठी लिहितां वाचतां आलें पाहिजे.

( २ ) आडव्होकेटच्या सरटिफीकीटाला ३०० रुपये फी पडेल.

( ३ ) मुंबई युनिव्हरसिटीची म्याट्रीक्युलेशन अगर तिच्या बरोबरीची अन्य परीक्षा पास असलेल्या उमेदवारासच वऱ्हाडच्या वकिलीच्या परीक्षेला बसतां येईल.

(४) एखाद्या उमेदवाराचा अर्ज नामंजुर करण्याचा अगर परीक्षेच्या कसोटीस उतरलेल्या उमेदवारास पसार न करण्याचा अधिकार जुडिशिअल कमिशनरकडे आहे. हा अधिकार बजावला गेला तरी त्याचीं कारणें विचारण्याचा हक्क कोणासही नाहीं व त्यावर अपील नाहीं.

(५) सन १८८९ साला पुर्वीं पर्यंत जे दुसऱ्या वर्गाचे वकील असतील त्यांस पहिल्या वर्गांतल्या प्रमाणे वकिली करण्यास अधिकार दिला आहे तरी जुडिशअल कमिशनर कचेरींत राणी सरकारास अपिल करण्यास परवानगी मागण्याची, व प्रत्येक फौजदारी व आणखी कांहीं दिवाणी बाबतींत वकीली करण्याची मनाई आहे.

( ६ ) विरुद्ध पक्षाचो वकिली देण्याबद्दल हुकूम झाला असल्यास त्याची आकारणी शेंकडा तीन प्रमाणें केली जाऊन १००० एक हजार रुपयाहून अधीक रकम झाल्यास त्याला जुडिशिअल कमिशनरची परवानगी पाहिजे.

( ७ ) एखाद्या वकिलास बडतर्फ वगैरे करण्या संबंधानें सन १८७९ चा १८ वा आक्ट लिगल प्राक्टिशनर संबंधीं आहे. तो वऱ्हाडच्या कायद्यांत उतरून घेतला आहे.

( ८ ) वकिलीच्या परीक्षेस लागणाऱ्या पुस्तकांत जादा अभ्यास घातला आहे.

The Berar Samachar

MONDAY AUGUST 15 1892,

JUSTICE CHASING POPATLAL

Various rumours are afloat in connection with the wellknown case of Mr. Popatlal of Balapur. The report says that Mr. Inverarity instructed by some Bombay and Berar pleaders will defend the accused before the Appellate court of Mr. Nicholetts. Strangely enough it further points out to Mr. Jardine as the able barrister to represent the *official* side. It is natural enough if the wealthiest banker of Balapur risks his whole estate to secure a firm footing upon the stool of respectability from which he has been overthrown in the Magistrate's court. But the question crops up how the Government can help to bear up the abnormal expenses of a heavy prosecution. If the rumour prove true we shall have to note the first triumph of the sacred cause of justice provided the matter does not smell of a vindictive and ignoble policy of running down a man who hopes to win anew his lost good name with the best legal advice available. The case is of simple accounts and the judge has only to weigh the evidence of a plain, ordinary & common-place nature. To our simple mind there are no mazes to unravel nor are there intricate points of law If the Government meant to strengthen the hands of prosecution it might have done it creditably when the Magistrate was a *native* and was probably, in the words of the Judicial Commissioner, '*a weak and vacillating one.*' Morever the rumoured step of the Government is uncalled-for in the case of Mr. Nicholetts the presiding Judge. Firstly, he is an European and, therefore, above all deviating influences. Secondly his experience extends over nearly a generation and lastly he has worked, in a thriving manner, as a Small Causes Court Judge and a Deputy Commissioner and now works creditably as the Sessions Judge.

We are therefore secure on that side and fear no failure of justice.

The caprice and novelty of the intended procedure strikes us the more when we know that every thing is on paper and nothing is likely to be added to the *voluminous* documents of the case. There is a second objectionable trait in the new move. In the case of Wittenbakor the Government engaged a barrister because it had to maintain the integrity and unimpeachable honesty of its administration inspite of a defaulting public servant. But here the Government would be holding forth the terror of law to a private person. If it be for the sake of the everlasting defence of the sacredness of justice we welcome the attitude of the Government with holy and ennobling cheerfulness. But from this point of view we shall have to condemn before we congratulate the Government. Matters of fact tell a sorry tale. The Government has not yet instituted the office of a public prosecutor when the Judicial Commissioner painfully points out the abounding failures of justice. And if it come forth in this case it would look otherwise than generous, good-natured and honourably just. If the case is to mark the beginning of the much needed want of a public prosecutor we shall hail the maiden attempt of the Government and shall feel highly pleased to see the sword of justice so well brandished to leave the legal precincts of right and honest human affairs unalloyed and unassailed.

## वऱ्हाड

हवामान—पाऊस साडे तीन इंचावर होऊन गेला. मध्यें उघाडी होते तरी ती कायमपणें टिकत नाहीं. पाऊस वरचेवर पडतच असतो. त्यामुळें कदाचित पिकास धोका ही पोचेल. रोगराई म्हणण्या सारखी विशेष नाहीं.

क्याप्टन सी. जी. एफ. फागन रेसिडेंटचे पोलि० असिस्टंट वर्ग ३ यांस तीन महिन्यांची हक्काची रजा चालू महिन्यापासून मिळाली. आणि त्यांच्या रजेंत त्या कामावर लेफ० डब्ल्यू. हडसन यांस पंजाब फ्रानटीअर फोर्स मधून बोलवून घेतलें.

रा. रा. वामन नारायण बापट यांनीं दोन महिन्यांची हक्काची रजा घेतल्यावरून त्यांच्या जागीं रा. रा. बंधुजी जनार्दन यांस नेमलें. शेवटील गृहस्थांचें काम मि. अजुध्या प्रसाद हे पाहतील व त्यांचे स्थळीं मि. मुबारकअली हे मोर्शीहून येऊन मोर्शीस मि. सिम्पसन जातील असें प्रमोदसिंधुकर्ते कळवितात.

आभारपूर्वक पोंच—विविधज्ञानविस्तार—( नोव्हेंबर व डिसेम्बर १८९१ ); सद्धर्मदीप – ( श्रावण ); सर्वदमन—अंक १; नाव्यकथार्णव— अंक ७; अपकारी रिपोर्ट—( १८९१।९२); शेतकरी—( जून );

वऱ्हाडचे सानिटरी कमिशनर डाक्टर लिटल यांच्या रजेंत सर्जन—मेजर सी. एल्. स्वेन, हैदराबाद कांटिजंट, यांस नेमलें.

यंदाच्या वकिलीला खालील परीक्षक नेमण्यांत आले आहेत—जुडिशिअल कमिशनर, सेशन जज्ज, बारिस्टर रेनाल्ड व बारिस्टर मित्र.

The following Sutta tax rules framed by the Akola Municipal Committee under section 44 of the Berar Municipal Law 1886 and sanctioned by the Resident in Residency Orders Notification No. 116 Dated 25th April 1892 and which have come into force from 1st April 1892, are published for general information and guidance.

Dated 2-8-92

Vyankatesh Ramchandra Mudholkar

SECRETARY MUNICIPAL COMMITTEE AKOLA

RULES

1. The satta-tax shall be assessed on all satta transactions negotiated in Akola at the following rates:—

On cotton sattas, half anna per bojah

On grain and seed sattas, half anna per kandy.

2. This tax shall be levied for the period of twelve complete years, which shall commence from the 1st April 1892. After expiry of this period, the tax shall cease to operate.

3. The cess shall be rated on sales in satta transactions, but shall be collected from the negotiating shroff, who, in the case of contracts on account of constituents, shall be entitled to add the amount to his charges for commission and brokerage.

4. A register of shroffs who negotiate sattas shall be kept in the municipal office

5. The municipal committee shall keep each shroft supplied with a book in the form A annexed for the registration of satta transactions, and it will be the duty of shroffs, at the time of negotiating sattas, to enter the particulars thereof in this book.

6. At the end of each month the municipal committee shall collect the foils from the books maintained under the preceding rule, and, as soon thereafter as possible, shall enter the particulars of the transactions in a register in the From B.

7 The cess shall be payable yearly at the end of each satta season as follows:·

For cotton sattas—Phalgoon Suddha 15 th.

For seed and wheat sattas—Vaisakh Suddha 15 th.

For jowari sattas— Magh Suddha 15th.

As soon after these dates as possible bills will be prepared from Form B in the municipal office and issued to each shroff under the Vice-Chairman's signature. Failure to pay the cess within 30 days of the presentation ef the bill shall be deemed to constitute "arrears of rates" within the meaning of section 153 of the Berar Municipal Law of 1886.

8. Any shroff who wilfully omits to register a satta transaction in the From A. intentionally makes a false entry in this form, or in any other way attempts to evade payment of the cess, shall be liable to pay double the prescribed rate.

9. For the purposes of these rules the municipal committee shall appoint a panchayat composed of two members of the committee and three shroffs, whose duty it will be—

(1) To supervise the registration of satta transactions.

(2) To bring to the notice of the municipal committee cases in which transactions have not been duly registered.

(3) To report on any matters in connection with the cess that may be referred to them from time to time by the municipal committee.

*Explanation.*—The supervision of the panchayat will be general, but not too searching inquisitorial or troublesome to the shroffs.

10. Objections to any assessment and complaints regarding the action of the panchayat will be heard and disposed of by the municipal committee.

11 The municipal committee shall keep a memorandum of account to be called "The Water—Supply Project Account," in which all proceeds of the satta-tax, when they are credited to the the municipal funds under section 68 of the Berar Municipal Law, 1886, shll be shown, and the said memorandum shall be totalled at the close of each year end ing on the 31st March and shall be laid before the committee when the budget is being framed.

FORM A.

| Date | No. | Date | No. |
|---|---|---|---|
| Name of shroff ... | | Name of shroff ... | |
| No. of bojahs or kandies ... | | No. of bojahs or kandies ... | |
| Name of purchaser ... | | Name of purchaser. ... | |
| Name of seller ... | | Name of seller ... | |
| Amount of cess ... | | Amount of cess ... | |

Form B.

*Register of satta trnsactions by*

| seria No. | Nameof seller | Quantity sold. | | | Date. | Cess. | | No. of counter-foil Form A | Remarks. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Cotton. | Grain. | Seed. | | Rs. | A. | | |
| 1 | 2 | 3 | | | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| | | | | | | | | | |

अकोला म्युनिसिपाल कमिटीनें सन १८८६ सालचे वऱ्हाड म्युनीसिपल कायद्याचे कलम ४४ अन्वयें सट्टा कराचे आकारणी व वसुला संबंधानें पुढील नियम केले आहेत. त्यास अलिशान रसिडेन्ट साहेब बहादुर यांनीं रे आ. नोटिफिकेशन नंबर ११६ ता. २५ एप्रिल सन १८९२ यांत मंजुरी दिली असून तारीख १ एप्रिल १८९२ पासून ते अंमलांत आले आहेत. सदहू नियम सर्व लोकांच्या माहिती साठी व वहिवाटी प्रसिद्ध करण्यांत येत आहेत.

ता. २–८–१८९२इ. Vyankatesh R. Mudholkar. सेक्रेटरी म्यु. क. अकोला.

## नियम.

१ अकोला येथें जे सट्याचे सवदे होतील त्या सर्वांवर हा कर पुढील दराप्रमाणें आकारला जाईलः—

( अ ). कापसाच्या सट्यावर—दर बोज्यास अर्धा आणा.

( ब ).धान्य व आळशी, तीळी वगैरे (ज्यांस इंग्रजींत seeds. हें नांव आहे )त्यांवरः—दर खंडीस अर्धा आणा.

२. हा कर तारीख १एप्रिल सन १८९२ पासून पूर्ण बारा वर्षें पर्यंत वसूल केला जाईल, व ही मुदत संपल्यावर तो बंद करण्यांत येईल.

३. हा कर सट्याचे विक्रीवर घेतला जाऊन तो जो सराफ सट्याचा सवदा करील त्याज पासून वसूल केला जाईल. जो सराफ दुसऱ्या व्यापाऱ्या करितां सट्याचे सवदे करील त्यानें आपणास त्या व्यापाऱ्या पासून त्याबद्दल जें कमिशन व दलाली मिळावयाची त्यांत कराची रकम सामील करावी.

४. सट्यांचा देवघेव करणारे सराफ लोकांचे नांवांचें एक नोंदणी बुक म्युनिसिपल कमिटीचे आफिसांत ठेविलें जाईल.

५. म्युनिसिपल कमिटी, पुढें अ नमुना दिला आहे, त्या नमुन्याचें बूक प्रत्येक सराफास सट्यांची नोंद ठेवण्या करितां देईल व त्यांत सराफानें प्रत्येक सट्याचा तपशील नोंदिला पाहिजे.

६. प्रत्येक महिन्याचे शेवटीं म्युनिसिपल कमिटीनें वर सांगितलेल्या अ नमुन्याच्या बुकाच्या पानाचे उजवे कडील भाग जमा करावे व त्या भागांत नोंदलेल्या सट्यांचा तपशील म्युनिसिपल कमिटीनें ठेवलेले ब नमुन्याचे बुकांत होईल तितकें लवकर नोंदावा.

७ हा कर सालिना प्रत्येक सट्याचे हंगामाचे अखेरीस खाली लिहिलेले दिवशीं द्यावा लागेल.

कापसाचे सट्यां बद्दल — फाल्गुन शुद्ध पौर्णिमा

गहूं, वगैरे च्या सट्यां बद्दल — वैशाख शुद्ध पौर्णिमा

ज्वारीच्या सट्यां बद्दल — माघ शुद्ध पौर्णिमा.

या दिवसां नंतर होईल तितकें लवकर म्युनिसिपल कमिटीचे आफिसांतून व नोंदणी बुकावरून बिल तयार करण्यांत येऊन व्हाईस चेअरमनचे सहीनें तीं त्या त्या सराफास रकमेची आदाई करण्या करितां देण्यांत येतील. बिलें दिल्या तारखे पासून ३० दिवसांचे आंत रकमेची आदाई झाली नाहीं तर ती रकमे, १८८६ चे वऱ्हाड म्युनिसिपल कायद्याचें कलम १५३ यांत " कराची बाकी" म्हणून ज्यास म्हटलें आहे त्याप्रमाणें समजली जाईल.

८ एखादा सराफ अ नमुन्याचे बुकांत एकादा सट्टा जाणून बुजून नोंदणार नाहीं, अगर जाणून बुजून खोटी नोंदणी करील, अगर इतर दुसऱ्या मार्गानें हा कर देण्याचे टाळण्याचा प्रयत्न करील तर त्याज पासून ठरलेल्या दरा पेक्षां दुप्पट दरानें कर घेतला जाईल.

९ या नियमांची योग्य अंमलबारी व्हावी या साठीं म्युनिसिपल कमिटीनें एक पंचायत नेमावी. त्या पंचायतींत म्युनिसिपल कमिटीचे २ मेंबर असावेत; व सट्याचा व्यापार करणांर तीन सराफ असावेत. त्यांचें काम हें कीं:—

(१). सट्टे बरोबर रीतीनें नोंदले जातात किंवा नाहीं याची देखरेख ठेवावी.

(२).अमूक सट्टे बरोबर रीतीनें नोंदले गेले नाहींत असें आढळून आल्यास ते म्युनिसिपल कमिटीचे नजरेस आणावे.

(३).या करारा प्रकरणीं कांहीं अभिप्राय अथवा खुलासा म्युनिसिपल कमिटीनें विचारला तर तो द्यावा.

स्पष्टीकरण– पंचाची तपासणी साधारण रीतीची असावी. फारच शोधकपणाची, सक्तपणाची अथवा सराफास त्रासदायक अशी नसावी.

१० कराचे आकारणी विरुद्ध अथवा पंचायतीच्या एखाद्या करण्याविरुद्ध कांहीं तक्रारी असल्यास त्यांचा निकाल म्युनिसिपल कमिटी करील.

११ म्युनिसीपल कमिटी पाण्याच्या तलावाचा हिशेब म्हणून एक हिशेबाचें टिपण ठेवील. व त्यांत, म्युनिसीपल कमिटीचे फंडास, सन १८८६ च्या वऱ्हाड म्युनिसीपल कायद्याचे कलम ६८ या अन्वयें या कराची रकम जसजशी जमा होईल तसतशी ती दाखविली जाईल व प्रत्येक वर्षाचे अखेर ता. ३१ मार्च रोजीं या रकमांची बेरीज घेऊन तें सर्व टिपण बजेट तयार करते वेळीं म्युनिसिपल कमिटी पुढें ठेवण्यांत येईल.

नमुना अ.

| | |
|---|---|
| नंबर. | नंबर |
| तारीख | तारीख |
| सराफाचें नांव | सराफाचें नांव |
| बोजे अथवा खंडी यांची संख्या | बोजे अथवा खंडी यांची संख्या |
| खरीदी करणाराचें नांव | खरीदी करणाराचें नांव |
| विकणाराचें नांव. | विकणाराचें नांव |
| कराची रकम | कराची रकम |

नमुना ब०

मि.— चे सट्याच्या सवद्याचें नोंदणी बुक

| अनुक्रम नंबर | विकणाराचें नांव | माल विकला किती | | | तारीख | कर- | | अ. बुकाच्या पानाचा नंबर | शेरा. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कापूस | धान्य | आळशी वैगेरे | | रु | आ. | | |
| | | | | | | | | | |

नोटीस

वि० रा. रा. नारायणराव अमृत देशपांडे राहणार आकोला यांस

कृष्णराव जयकृष्ण देशपांडे, मलकापूर यांज कडून नोटीस देण्यांत येते कीं मलकापूर येथील वडिलोपार्जित घराची वांटणी करून मागतां त्यास आमचे रुपये तुमचे कडून येणे आहेत ते आह्मास द्यावे व दोन संभावीत गृहस्थ बोलावून त्यांचे समक्ष वाटणी करून द्यावी आमची कोणते ही प्रकारें तक्रार नाहीं. येणे प्रमाणें न केल्यास विनाकारण दावा करालं तर खर्चाच्या संबंधानें आह्मी जबाबदार होणार नाहीं व आमचा खर्च तुह्मास देणें पडेल कळावें. तारीख ११ माहे आगष्ट सन १८९२ इसवी.

( सही )

कृष्णराव जयकृष्ण दस्तुर खुद्द

## वर्तमानसार

महाराज सयाजीराव गायकवाड यांणीं इटाली देशांत जवाहीर, तसबिरा आणि पुतळे अशा चिजा खरेदी केल्या आहेत. तसबिरा आणि पुतळे नव्या लक्ष्मी विलास नामक राजमहालांत बसविण्यासाठीं घेतल्या आहेत असें समजतें पैसा प्रजेचा मग त्यावर चैन मारावयास संस्थानिकांचें काय खर्च होतें!

पत्रावर छाप मारण्या करितां चिकागो पोस्टआफिसांत विजेची ४ यंत्रें आहेत.

नेमणूक— मुंबई सरकारचे कौंसिलर व अबकारी खात्याचे पूर्ण कैवारी सर चार्लस प्रिचर्ड यांची नेमणूक हिंदुस्थान सरकारचे पब्लिक वर्क्स खात्याचे प्रधानगिरीवर झाली. नशीब लोकांचे!

पोस्ट खात्या मार्फत सरकारी वखारींतील क्रायनाइन गोर गरीबांस विकत द्यावे अशी कांहीं व्यवस्था करण्याच्या विचारांत बंगाल सरकार आहे.

गोंड एरंडेल — वैद्याच्या कामांत अती औषधवान पदार्थ आहे. पण त्यास एक प्रकारचा वाईट वास येतो व त्याची रुची वाईट लागतें ह्मणून तें घेण्यास वाईट लागतें आतां अमेरिकेंतल्या कुशल वैद्यानीं एरंडेलांत कांहीं पदार्थांचें मिश्रण करून त्याचा वाईट वास घालवून गोड केलें आहे. रसायन क्रिया काय न करील!

सोन्याची वीट — ५०० पौंड वजनाची, आणि १,५०,००० डालर किंमतीची एक सोन्याची भरीव वीट हेलीना येथील सोन्याच्या खाणीच्या मालकांनें जगदर्शनांत दाखविण्या साठीं तयार केली आहे.

मु० सू०

सिमल्याहून आलेल्या अगदीं बातमीवरून समजतें कीं, खोब खिंडींतून पोस्ट नेत असलेल्या चौघा स्वारांवर हल्ला करून त्यांतील दोघां स्वारांस ठार मारलें असें सरकारास समजलें आहे. हा गुन्हा करणारे तिथे वजिरी आहेत. मेमना येथील अफगाण फौजेनें बंडखोर उजबेग लोकांवर जय मिळविला आणि काबूल व हीरात यांच्या दरम्यानचा रस्ता खुला झाला. पराजित झालेले उजबेग लोक हजाराकडे जात आहेत. त्यांचें अधिपत्य मेमना येथील वलीच्या मुलाकडे होतें, पण पराभव झाल्यावर तो पेंजदेकडे पळून गेला. वीस इंग्रज आफीसरांस गिलजित येथें कामगिरीवर जाण्याचा हुकूम झाला अशीही सिमल्याचीच बातमी आहे, पण कसली कामगिरी हें बाहेर आलें नाहीं.

इंजनेर खात्यांतही सरकारानें प्राव्हिन्शीयल सर्विस केली, व त्यांत चीफ इंजनेरांचे पगार हल्लींच्या इतकेच ठेवून सुप. इंजनेरचे १०००;९०० व ७५० केले असून एक्झिक्युटीव इंजनेरांचे ६५०; ५५०; ४७५ व ४०० असे केले आणि असि. इंजनेरांचे ३५० व २५० असे केले आहेत. हिंदुस्थानांतल्या कालेजांतील नेटिवांस व खालच्या प्रतीच्या सबार्डिनेटांतून या जागा भरावयाच्या व त्या एक वर्षी १२ व एक वर्षी १३ अशा भरावयाच्या; व कालेजांत व सबार्डिनेट यांतून आठ व ४ व ८ व ५ अशा भरावयाच्या. कालेजांतून जे नेमावयाचे ते प्र- [illegible] शिकणाऊ म्हणून १०० रुपयांवर नेमावयाचे व तीन वर्षांत त्यांची चांगली शिफारस न झाल्यास त्यांस काढून टाकावयाचे; आणि सबार्डिनेटांतून जे घ्यावयाचे ते सब इंजनेरांतून घ्यावयाचे, पण त्यांचे पगारासंबंधानें नुकसान होणार नाहीं अशी ही व्यवस्था आहे. यावरून सुप. इंजनेरच्या जागा या लोकांस मिळण्याची आशा कमीच दिसते. कारण सब इंजनेरास तेथपर्यंत वाढण्यास हयातच पुरणार नाहीं आणि शिकणाऊंस त्या जागा मिळण्यास किती तप लागतील याचा नेम नाहीं.

ठा. अ.

वेगवान आकाश यानः—पेन येन (न्यूजेरस प्रांत) येथील एका कल्पकानें चिरूटाच्या आकृतीचे ३०० फूट लांबीचे एक आकाशयान तयार केलें आहे. त्यांतील यंत्रास कांहीं रासायनिक क्रियेनें दर मिनिटास ३००० फेरे होण्याची विलक्षण गति उत्पन्न होते. हें रसायन काय आहे, तें त्यानें गुप्तठेविलें हें आकाशयान १० उतारू; त्यांची पोटगी व यंत्र सामान इतकें वाहून नेण्यासारिखें होऊन दर तासास त्याला १०० पासून २०० मैलांचा वेग येईल असें त्या कल्पकाचें ह्मणणें आहे.

दी० ब०

ना. ग्लाडस्टन साहेबांनीं राज्यसूत्रें हातीं आल्यावर जी प्रधान मंडळीची योजना करण्याचें ठरविलें आहे, त्यांत आपले माजी लोक प्रिय व्हाईसराय ना. लार्ड रिपन यांस हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी नेमावयाचे निश्चित झालें आहे, असें वर्तमानपत्रकर्ते ह्मणतात.

आल्प्स पर्वताच्या मोटब्ल्यांक शिखरावरून गेल्या १२वे तारखेस बर्फाचा एक मोठा थोरला कडा तुटला आणि खालीं एका ओढ्यांत पडला. त्यासरशीं ओढ्याला एवढा पूर आला कीं त्या योगानें त्याचे काठचीं एक दोन गांवें वाहून गेलीं आणि सुमारें २०० लोक प्राणास मुकले.

कोल्हापूरचे महाराज — यांस दुसऱ्यास संस्थानास परत आणण्यांत येईल व त्यांना हळू हळू राज्यव्यवस्थेची माहिती करून देण्यांत येईल असें समजतें

क. त.

---

## नोटीस

बेशमी भागी मर्द रावजी काहळकर जात माळी रहाणार दारापूर हल्लीं वस्ती वलगांव ता० उमरावती यांसः—

खालीं सही करणार यानकडून नोटीस देण्यांत येतें कीं, तू माझी लग्नाची बायको असून लग्न होण्यास सोळा वर्षे झालीं तेव्हां पासून तू माझे येथें येत जात होती व शांतिक झाल्यावर आज पर्यंत तू माझे घरींच होती. सुमार एकवर्षा पूर्वी तूझा मेव्हणा तुकारामकडे हा येऊन तुजला दारापूर येथें नेलें. नंतर तुजला आणण्या करितां एक दोन वेळ स्वतः आलो असून तू मजबरोबर आली नाहींस ह्मणून पुन्हा बाभळी येथील पंच घेऊन आलो. व तेथील पंच जमा करून पंचाईत केली. पंचांनी तुजला जाण्याविषयीं सांगितलें असून ही तूं आली नाहींस व तू तुकाराम याचे घरीं वलगांव येथें जाऊन राहिलीस. याज करितां नोटीशीनें कळविण्यांत येतें कीं, ही नोटीस पावल्या पासून पंधरा दिवसाचे आंत माझे घरीं निघून यावें. तसें न केल्यास तुजवर दिवाणींत फिर्याद करणें भाग पडेल व या नोटीशीचा ही खर्च द्यावा लागेल. कळावें. तारीख ८–८–९२ इ०

( सही. )

रावजी वल्लद राघोजी माळी राहणार बाभळी याची निशाणी

---

## नोटीस

सोनाजी वल्लद चाहादाजी वाघ वस्ती लांजूड ता० मलकापूर जि० बुलढाणें यांस

नोटीस देणार बजी मर्द सोनाजी वाघ लांजुड हल्लीं वस्ती जैपूर ता० खामगांव जिल्हे अकोलें. सुमार सन १३०२ फसली कारणें नोटीस देते ऐसीजे मी तुमची लग्नाची बायको असून लग्न झाल्या नंतर दोन तीन वर्षे पर्यंत तुह्मी आपलें घरीं नेलें. नंतर मजला ओटी आली. त्यास सुमोर १० वर्षे झालीं असतील तेव्हां पासून तुह्मी मजला आपले घरीं नेलें नाहीं. मध्यंतरीं चार लोक मिळून तुमचे घरीं आणून मजला घातलें असतां तुह्मी मजला वागविलें नाहीं. विनाकारण मारठोक करून हाकून लावतां मी सुमारें १० वर्षां पासून आपले बहिणीचे घरीं खर्च खात बसले आहे. तुह्मी दुसरी बायको करून घर प्रपंच करीत आहा. मजला वागवीत नाहीं. करितां नोटीसीनें कळवितें कीं, नोटीस पावल्या दिवसां पासून आठ दिवसाचे आंत मजला आपलें घरीं घेऊन जावें. आणि चांगल्या रीतीनें वागविण्या बद्दल पंचाची जामीनकी द्यावी मी आपले बहिणीचे घरीं कर्ज काढून खाल्लें. तो पैसा रुपये पांचशें ५०० दरसाल ५० रुपये प्रमाणें चुकून द्यावे. या प्रमाणें न केल्यास मी दुसरा घरठाव करीन. हीच नोटीस दिली ही फारकत समजून दुसरा घरठाव करीन ही नोटीस दिली सही तारीख ९ माहे आगष्ट सन १८९२ इ०

( सही. )

सहीची निशाणी बांगडी बजी मर्द सोनाजी इच्या हातची असे वस्ती जैपूर ता० खामगाव.

---

## नोटीस.

रा० रा० ज्यानजी वल्लद चिंतामण पाटिल राहाणार टाकळी खोदबुड तालुके बाळापूर यांस नोटीस देणार राघु वल्लद केवजी तर्फे मुखत्यार शिव्या वल्लद राघु माहार टाकळी खोदबुड तालुके बाळापूर नोटिसीने असें कळवितो आम्हीं तुम्हां पासून खातेचे शेत नजर गाहाण देऊन रुपये ३०० कर्ज काढणेचे टराविलें व त्या प्रमाणें नजर गाहाण कागद रजिष्टर ता १८ माहे येप्रील सन १८९१ इसवी संमत १९४७ खरनाम संवछरे रोजी करून दिला. तुम्ही रुपये ३०० पैकीं रजिष्ट्रार समोर रुपये १०० दिले व ते लागलेच कचेरी बाहेर आल्यावर आम्हा पासून काढून घतले व अगोदर दोन २०० रुपये दिले म्हणून रजीष्टर समोर कबुल करा म्हणून तुम्ही सांगीतलें. त्या प्रमाणें आम्ही केलें परंतु तुमचे मनात आम्हा गरिबास सफई बुडविणेंच आहे कारण अगोदर दोनशे २०० रुपये दिले ते कबुल आम्हा कडून करविले व कचेरींत १०० शंमर दिले ते लागलीच कचेरी बाहेर निघताच कढुन घेतले. त्या नंतर आज पावेतो आम्ही रुपयें मागतो परंतु तुम्ही थापा थापा देता व रुपये देत नाहीं. या दोन्ही गोष्टीस आमचपाशी बरोबर पुरावा आहे कारण ज्या वेळीं पडेल त्या वेळीं हजर करीत आहो. आता तुम्हांस नजर गाहाणाचा जो कागद रजष्टिर करून दिला आहे. तो पोकळ आहे. त्याज बद्दल आम्हांस तुमचे कडून एक पै सुद्धां मिळाली नाहीं तर तुम्हांस असें कळविलें जातें कीं पोकळ नजर गाहाण रजिष्टर केलेल्या कागदावरून तुम्ही फिरयाद वगैरे केल्यास आम्हीं कोणच्याच प्रकारचे नफा नुकसानास जबाबदार नाहीं. विनाकारण तुम्ही आम्हास कागद देण्यास रजिष्टर वगैरे करण्यास व ही नोटीस देण्यास वगैरे भाग पाडलें तर तुम्हांस असें कळविलें जातें कीं सदर्हु पोकळ नजर गाहाण रजिष्टर कागद नोटीस पावल्या पासून आठ दिवसांत आणून द्यावा. असें केलें नाहींतर तुम्हावर योग्य कोर्टांत काम चालऊन अखेर निकाल होई पर्यंत जें नुकसान होईल तें व या नोटीसीचा व कागदाचा वगैरे सर्व खर्च भरून घेतला जाईल म्हणून दिली नोटीस ता० ९ माहे अगष्ठ सन १८९२ इसवी.

( सही )

शिव्या वल्लद राघु माहार दस्तुर खुद्द.

राघु वल्लद केवजी माहार दस्तुर शिव्या वल्लद राघु माहार.

---

## नोटीस.

रा० रा० मारुती वल्लद रावजी माळी राहाणार चांदुर तालुके अकोले यांस नोटीस देणार बुनाई मर्द रावजी हल्लीं राहणार भंडारजी तालुका बाळापूर नोटीसीनें असें कळविते कीं. तूं माझा लग्नाचा नवरा असोन आज सुमोर दाहा वर्षे मी आपले बापाच्या घरीं आहे. या दाहा वर्षांत मी शहाणी जाहाली व तुमचे जवळ माझे बापानें पोचती केली परंतु तुम्ही माझे पोटापाण्याची कांहीं येक वास पुस त्या वेळीं केली नाहीं व आजपावेतों ही कांहीं येक विचारले नाहीं. तुह्मांस माहारोग होऊन आज सुमोर. तेरावर्षे जाहालीं व तो अजून बरा न होता आज चार वर्षांत तर रोग अतीशय होऊन तुमचा रोग तुमच्यासी कोणी ही व्यवहार करणें सारखा नाहीं. अती ज्यास्त जाहाला आहे. तुम्ही रोगी व माझे पोटपाण्याची कांहीं तजवीज करीत नाहीं. माझा जन्म वाया जात आहे, तर तुम्हांस नोटिसीने असे कळविते कीं नोटीस पावल्या पासून आठ दिवसात तुम्ही मी आजवर कर्ज काढून खाल्लें ते रुपये १५० आणून द्यावे. व मजला सोडचिठ्ठी तुम्ही रोगानें फार ग्रासला याज मुळें द्यावी. असे जाहाले नाहीं तर हीच सोडचिठ्ठी म्हणून मी दुसरा घरठाव करीन मग कोणच्या ही प्रकारचा हक्क माझेवर नाहीं व नोटीसींत लिहिलें प्रमाणें फारकती न दिल्यास खावटी १५० रुपये बद्दल. फिर्याद करून रुपये वसूल केले जातील. कळावे म्हणून दिल्ही नोटीस सही तारीख १० माहे अगष्ट सन १८९२ इसवी

( सही )

सहीची निशाणी बांगडी बुनाई मर्द मारुती इच्या हातची असे.

---

☞ हें पत्र आकोलें येथें कै० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाची आगाऊ रु० ५ डांक हाशील ०।३
सहामाही ,, ३ ,, ०८
साल अखेर ,, ७ ,, १०८
किरकोळ अंकास ........................०४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस ..........०१

SUBSCRIPTION
Rs.
Annum in advance 5 Postage 13 ass
Annum in arrears 7 ,,1Rs 8 as
Six monthly............3 ,, 8 as
Single copy..............................4as

Advertisemen
Below 10 lines...2R
per line over10...4 as
Repetition per line3ag


# वऱ्हाडसमाचार.


THE BERAR SAMACHAR

VOL XXVI AKOLA MONDAY 22 AUGUST 1892 NO 33

वर्ष २६ आकोला सोमवार तारीख २२ माहे आगष्ट सन १८९२ इ० अंक ३३



डा० वामन गोपाळ यांचा

हा सार्सपरिला अनेक रोगावर गुणावह असून खालीं लिहिलेल्या रोगावर विशेष गुणकारी आहे. उपदंशजन्य विकार (गरमी) व तिजपासून होणारा पक्षवातादी भयंकर रोग संधिवात, गंडमाळा, रक्त दुषित झाल्यापासून हातपायांच्या तळव्यांवर व सर्व शरीरावर काळे डाग पडणें संधी दुखणें, कळा लागणे, सूज येणें सर्व संधिगत वायू वर तसेंच कोणत्याही प्रकारचें त्वचेचे रोग जसें सर्व शरीरास कंड सुटणें, खरूज गळवें व फोड येणें, इत्यादि; डोळ्यांची, मस्तकाची व हातपायांची आग, होणें, तसेंच रसायनें व कच्चा पारा सेवन करून होणारे वाईट परिणाम वगैरे सारांश उपदंशजन्या पासून अगर दुसरे कोणत्याही कारणानें रक्त दुषित झालें असल्यास तें शुद्ध होऊन त्याची वृद्धि होण्यास ह्या सारखें दुसरें औषधच नाहीं दर बाटलीस किंमत १। रुपया. पोस्टेज ४ आणे, उत्तम गुणास चार बाटल्या पाहिजेत. एकदम बारा बाटल्या घेतल्यास १२ रुपये. पोस्टेज शिवाय. परंतु चार बाटल्या एकदम घेतल्यास पोस्टेज ६ च आणे पडतील.

पौष्टिक व अत्यंत कामोत्तेजक, धातु व रक्तवर्धक मिश्र फास्फरसाच्या,

गोळ्या

या पासून अतिशय विषयोपभोग नित्य धातुश्राव यानें झालेली क्षीणता नाऊन कडकी, अशक्तता, अग्निमांद्य, जीर्णज्वर, नपुसकत्व इत्यादि विकार तात्काळ नाहींसे होतात. ह्यानें सर्व शरीरांतील चैतन्याचा व बुद्धि व स्मरणशक्तीचा राजा जो मज्जा (मेंदु) व मज्जातंतु याच्या मंद झालेल्या सर्व क्रियांचें पुनरुज्जीवन होतें. शिवाय ह्या गोळ्या कामोद्दीपक व स्नायुंचो शक्ति वाढविणाऱ्या असल्यामुळें कोणत्याही कारणास जननेंद्रियाची शक्ति क्षीण झाली असल्यानें पूर्ववत होते. उत्तम गुणास ४ बाटल्या पाहिजेत किंमत २४ गोळ्याचे एका बाटलीस १४ आणे बंगी व पोष्ट मिळून एका पासून किती ही बाटल्या घेतल्या तरी ६ पडतील.

पांढरे केस काळे भोर होण्याचा कल्प.

हा कल्प प्रत्येक पंधरा दिवसांनीं एक एक वेळ लाविला ह्मणजे पुरें आहे. यानें, सफेद करड्या व पिंगट रंगाचे केस काळेभोर होऊन त्यास तेज येतें. किंमत १ रु० पोष्टेज ४ आणे.

वरील सर्व औषधांच्या विशेष माहितीचा कागद प्रत्येक औषधा सोबत मिळेल पुण्याच्या लोकांकरितां डा. एन. व्ही. छत्रे यांचे दवाखान्यांत वरील सर्व औषधें मिळतील.

आमचा पत्ता—नव्याठाकूर द्वारासमोर.


## पत्रव्यवहार

ह्या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

मुक्काम आडगांव तारीख २०-८-९२

कृ० स्ना० न० वि० वि० या पंधरवाड्यांत पाऊस बराच होत आहे. सध्यां पिकें बरीं आहेत. असाच जर पाऊस राहील तर मात्र पिकांची नासाडी होण्याचा संभव दिसतो. रोगराई चुपकार चापकार आहे.

मा. रा. अमृतराव गोपाळराव उर्फ दादासाहेब हे रजा घेऊन गेल्या नंतर त्यांचे जागेवर त्यांचे धाकटे बंधू मा. रा. रामराव उर्फ बाबा साहेब यांची नेमणूक झाली. बाबा साहेब यांनीं ही मुद्दां आपले वडील बंधू प्रमाणें अध्यक्षतेचें नातें न गाजवितां कमेटींतील मेंबर लोकांशीं व गांवांतील लोकांशी मिळून राहून काम फार हुशारिनें, काळजीनें, दक्षतेनें, व निष्पक्षपातानें करूं लागले परंतु लवकरच कमेट्या मोडल्या गेल्यामुळें लोकांचें कल्याण करण्याचें बाबासाहेबांचे मनोदय अस्तास पावले हें लोकांचें दुर्दैवच समजलें पाहिजे.

बाबासाहेब यांनीं लोकांची मनें वळविण्या करितां भगिरथ प्रयत्न करून तारीख ७-८-९२ रविवार रोजीं लायब्ररी स्थापन केली. या कामीं बाबासाहेबाना रा. बळवंतराव देशपांडे यांनीं बरीच मदत केली. लायब्ररी करितां जागा मारुती परशराम नापकवाडी यानें बांधविलेल्या नवीन मकानावरील माडी, बाबासाहेब यांनीं वरील इसमाचें मन मोठ्या शिताफीनें वळवून नवीन देवळाची जागा तयार होई पर्यंत घेतली. लायब्ररीचें काम चालविण्या करितां सभेंत खालील इसमाच्या नेमणुका सर्वानुमतें करण्यांत आल्या.

रामराव गोपाळराव उर्फ बाबासाहेब याना अध्यक्ष नेमून बळवंतराव यांना उपाध्यक्ष केलें व हेडमास्तर यांना सेक्रेटरी केले. अशा कामांत रामराव बाबासाहेबाना आडगांव सारख्या गांवांत यश मिळालें ही मोठी आनंद मानण्यासारखी गोष्ट समजली पाहिजे. जशी स्थापन झाली तशी चिरकाळ चालावी ह्या हेतूनें सर्वांनी बाबासाहेबांनीं मदत करावी एवढी माझी सर्वांना विनंती आहे.

येथील हेड मास्तर रघुनाथराव हे रजेवर गेल्या नंतर त्यांचें काम पहाण्या करितां त्याचे पुतणे श्रीराम भीमराव हे आले. हे मुंबईची परिक्षा पास असून हुषार, मन मिळाऊ असे आहे. हे ज्या वेळीं आले त्या वेळीं पटावर संख्या ५२-५३ होती. परंतु हेड मास्तर यांनीं रामराव बाबा साहेब यांचें मन पूर्ण वळवून व त्यांचें पूर्ण साह्य घेऊन मुलांची संख्या ७५-८० पर्यंत केली, या कामांत बाबा साहेबांनीं फार खटपट केली व अझून करून आहेत.

बाबा साहेब अशीच मदत नेहमीं शाळेला करोत व अशा योगानें मास्तर लोकांना व शाळा खात्याचे अधिकारी यांना दादा साहेब देशपांडे यांचें स्मरण न येऊं देवोत एवढी जगन्नियंत्या परमेश्वरापाशीं सविनय प्रार्थना आहे.

येथें मराठी इयत्ता पांच असून मास्तर दोन आहेत. वरील मुलांच्या संख्येच्या मानानें पहातां दोन मास्तरच्यानीं शिकविण्याचें काम बिलकुल व्यवस्थेशीर चालत नसेल. हें स्पष्ट आहे. इकडे शाळेचे अधिकारी लक्ष देतील काय?

येथें काळे मारुतीवर सरासरी चार पांच वर्षांपासून एक बैरागी आला आहे. तो श्रीमंत दादा साहेब देशपांडे यांचे मदतीनें मारुतीवर दोन वर्षांपासून नामसप्ताह करित असतो. अखेरचे दिवशीं बरेंच अन्नदान होत असतें. पालखी फिरत असते, व आसपासच्या गांवच्या दिंड्याही येत असतात. दादा साहेब गांवीं नसले मुळें यावर्षीं सप्ताह होण्याची बैरागी यांना बिलकुल आशा नव्हती परंतु रामराव बाबा साहेब यांनीं पूर्ण मदत देऊन सप्ताह सुरू कराविला. व बैरागी बुवास संतुष्ट केलें. पत्रविस्तार फार झाल्या सबब रजा घेतो. कळावें.

आपला
"क्ष"

## विवाह संबंध व स्त्रियांची उत्क्रान्ती.

(रा. रा. हरी रामचंद्र रोहिणखेडकर बी. ए. यांचें व्याख्यान)

(मा० अं० पुढें चालूं.)

दुसरें उदाहरण, गौतम गोत्रांतील ययातीला ह्मणून स्त्री होती तिनें सात ऋषींशी लग्न केलें आहे. तिसरें उदाहरण, वार्षिकी स्त्रिनें प्रचेतस कुळांतील दहा ऋषींशीं लग्न केलें आहे. कुंतीनें पंडु जिवंत असतां इतर पती पासून पुत्रोत्पत्ति करून घेतली आहे. द्रौपदी हिनें पांच बंधूंशीं लग्न केलें आहे. जेव्हां आर्य लोक हिंदुस्थानांत आले व त्यांनीं एतद्देशीय मूळच्या लोकांनीं पराजित करून एकीकडे हाकलून दिलें, व त्या नंतर ते समाज करून हिंदुस्थानांत राहिले तेव्हां त्यांनीं हिंदुस्थानांतील मूळचे रहिवाशी राक्षस, नाग, पिशाच, असूर, आणि गोंड या लोकांपासून संसर्गानें कांहीं चाली घेतल्या व त्या पैकींच अनेकपतित्वाची चाल असावी असें दिसतें. अनियमित विवाह व अनेकपतित्व या पासून संतति अशक्त उत्पन्न होते. बहुत करून संतति होतच नाहीं. झाल्यास बहुतेक फार अशक्त असते. विश्वयोपितांस बहुत करून संतती होतच नाहीं हें वरील गोष्टीस प्रमाण आहे. तेव्हां अनियमित व्यवहार व अनेकपतित्व या संस्था समाजास बळकटी आणण्यास व त्याच्या वृद्धीस फार हानिकारक आहेत असें दिसून आलें. तेव्हां स्त्रि पुरुषांचे व्यवहारास कांहीं तरी निर्बंध असावा अशी जरूरी वाटून नियमित लग्नसंबंध अंमलांत आला.

नियमित लग्नसंबंधा पासून समाजास फायदे येणें प्रमाणें:—या संस्थे पासून प्रजावृद्धि चांगली होते व प्रजा निरोगी होते. येणें करून समाजाची एकी वाढते. व समाजांतील कुटुंबांचें स्वत्व जास्त होतें ह्मणजे आपले नातलग कोणते याविषयीं प्रेमभाव उत्पन्न होऊन त्याच्या विषयीं आपणास विशेष कळकळ लागते. त्याच प्रमाणें या संस्थेपासून जातीचा अभिमान ज्यास्त वाटतो. ह्मणजे ज्या प्रमाणें आप्तांची प्रीती त्याच प्रमाणें आपल्या जातीचे लोक कोण हें समजल्यावर त्यांच्या आपल्यांत कांहीं विशेष संबंध आहे असें मनुष्यास वाटूं लागतें. लग्नसंस्थेपासून अमुकाचे पूर्वज अमुक ही मालिका स्पष्ट झाल्यावर आपल्या पूर्वजांचे गूण आपल्यांत असावें अशी आदर बुद्धि व एक प्रकारचा अभिमान उत्पन्न होतो. या सर्व नफ्याचा विचार केल्यावर अर्थात् लग्न संबंधा पासून समाजास बळकटी येते हें सांगावयास नकोच. या प्रमाणें समाजाची शक्ति व संख्या वाढल्यावर तो समाज इतर समाजाशी आपल्या कलहबुद्धीनें तंटे करितो. व स्वपरस्परांत लढाया होऊन इतर समाजास पादाक्रांत करितो. असे समाज बलिष्ट होऊन इतरानें जिंकूं लागले तेव्हां शत्रूंनां मारून त्यांच्या देशांतील द्रव्य व स्त्रिया हीं काबीज करूं लागले. व हें कृत्य पराक्रमदर्शक व स्तुत्य आहे असें ते समजत असत. शत्रु पराजित झाल्यावर त्याची मालमत्ता, त्याचा देश व त्याच्या स्त्रिया यांवर जेतृणपणाची मालकी पूर्ण येते असा त्यावेळीं समज होता. हे लोक काबीज करून नेल्यावर कांहीं पुरुषास मारून टाकावें. बाकीच्यांस गुलाम करावें, व स्त्रियांस ही दास्य द्यावें अशी वहिवाट चालली. या पासून पुढें अशी एक वहिवाट अंमलांत आली कीं पराजित शत्रूंच्या कांहीं स्त्रियांशीं विजेत्यानें विवाह करावा व कांहीं स्त्रिया आपल्या हाताखालच्या सरदारांस द्याव्या असा क्रम सुरू झाला. ज्या प्रमाणें वाघसिंहाची मृगया केल्यावर त्यांचें चर्म व नखीं वगैरे जयाचीं चिन्हें समजून त्यांचा उपयोग होतो त्याच प्रमाणें पराजित शत्रूंच्या स्त्रियांशीं लग्न करावें व हें मोठें भूषणास्पद आहे हा समज दृढ होत चालला. लढाईच्या प्रवृत्ती पासूनच राज्यव्यवस्था व कुटुंबव्यवस्था या

दोन्ही अंमलांत येऊं लागल्या. दुसऱ्या राष्ट्राशी लढाई कर्तव्य आहे तेव्हां कोणी तरी मुख्य पुरुष पाहिजे असें जेव्हां जरूर पडतें त्याच प्रमाणें कुटुंबांतील कर्ता पुरुष असेल त्यास मुख्य समजून त्याच्या ताब्यांत घरांतील सर्व मनुष्यें वागतात. त्या कर्त्या पुरुषाकडे कुटुंबाचें पोषण करणें व त्यावर दाब राखणें हे हक्क आले, व कुटुंबांतील सर्व मंडळीच्या जीवावर देखील त्यास हक्क आला. या प्रमाणें समाजांत परस्पर लढाया सुरू झाल्यामुळें स्त्रियांस पूर्ण दास्य आलें. युरोपमध्यें ज्या वेळीं 'फ्यूडल सीस्टम' (एक प्रकारची जहागीर व्यवस्था) ऐन भरांत होती त्या वेळेस गुलामांची स्थिती इतकी वाईट होती कीं त्यांचे दोन वर्ग समजले जात होते. एक जमिनीशी संबंध असलेला गुलामवर्ग व दुसरे साधे गुलाम. पहिल्या वर्गांतील गुलाम त्यांच्या जमिनीची विक्री झाली ह्मणजे त्या बरोबर त्यांची विक्री होत असे. व दुसऱ्या वर्गांतील गुलाम साधारणपणें बाजारांत विकले जात असत. ती स्थिती युद्धप्रधानकालांत स्त्रियांस प्राप्त झाली. आफ्रिका व अमेरिकाखंडांत कांहीं लोक स्त्रियांस नांगरास जूंपतात. चीन देशांत स्त्रियांचा क्रयविक्रय होत असे. अरेबिया व पराशिया येथें आपल्या मुली व सुना यांना लोक गहाण ठेवीत व विकत असत. बाबीलान शहरांतील लोक मुली उपवर झाल्या ह्मणजे त्यांचा क्रयविक्रय करीत असत. हिंदुस्थानांत ही पराजित शत्रूंच्या स्त्रिया विकत घेणें, त्यांच्यांशीं लग्न करणें वगैरे व्यवस्था आढळून येतात. जुन्या संस्कृत ग्रंथकारांचा असा अभिप्राय आढळतो कीं स्त्रियांना स्वातंत्र्य मुळींच योग्य नाहीं. ह्मणजे स्त्रिया बालपणीं बापाच्या ताब्यांत असाव्या. तारुण्यावस्थेंत नवऱ्याच्या ताब्यांत असाव्या. व वृद्धपणीं मुलाच्या ताब्यांत असाव्या असा त्यांचा आशय आहे. याच प्रमाणें ग्रीक आणि रोमन लोकांमध्येंही स्त्रिया व मुली यांच्यावर पुरुषांचें पूर्ण प्राबल्य असे. हिंदुस्थानांतही ही स्थिती अद्याप चालूं आहे व मुलींना लग्नसंबंधी मुळींच स्वातंत्र्य नाहीं.

मिल या ग्रंथकाराच्या 'स्त्रियांचें पारतंत्र्य' या ग्रंथामध्यें तो असें ह्मणतो कीं विवाहित स्त्रीपुरुषाबद्दल एक कल्पना आहे ती फार चमत्कारिक आहे. ती अशी कीं विवाहित स्त्रीपुरुषांचा एक जीव आहे व बायकोच्या मिळकतीवर नवऱ्याचा पूर्ण हक्क आहे परंतु आश्चर्य हें कीं नवऱ्याच्या मिळकतीवर बायकोचा मुळींच हक्क नाहीं.

**वऱ्हाडसमाचार**

मिती श्रावण वद्य ३० शके १८१४

'अनंत राष्ट्रीय धर्मार्थ संस्थे' विषयीं आह्मी मागें लिहिलेंच आहे. या धर्मार्थ संस्थेस राष्ट्रीय स्वरूप येईल तितकें आह्मांस पाहिजे. हिंदुस्थान देशांत गरीब व अनाथ लोकांकरितां सरकारनें कांहीं एक व्यवस्था केली नाहीं व ती करणें त्यास कितपत आवडेल हें ही सांगवत नाहीं. शिवाय हा देश इतका सधन आहे कीं, त्यांत वास्तव्य करणाऱ्या लोकांस अन्नाची पंचाईत पडूं नये. परंतु देशाचा जमा खर्च पाहतां देशाला कोट्यावधि रुपये कर्ज आहे आणि सांप्रतच्या राज्य कारभारानें कुबेराला देखील भिकारदशा प्राप्त होईल.

या धर्मार्थ संस्थेला आश्रय द्यावा ह्मणून युरोपियन श्रीमान व अधिकार संपन्न गृहस्थांस पाचारण झालें आहे तेव्हां ते लोक ज्या देशांतील पैशावर मौजा मारतात त्या देशांत राहणाऱ्या लोकांच्या मदतीकरितां कितपत पुढें येतात हें पहाण्याचीच ही वेळ आहे. युरोपियन बापा पासून या देशांतील वर्णसंकरानें बनलेल्या युरेशियन लोकांस दैन्यांतून सोडविण्यासाठीं प्रांतोप्रांतीं उद्योग चालले आहेत त्यापेक्षां ज्ञातिविषयक बाजूं सोडून सर्व देशाची बाजू उचलण्यांत आली तर धर्मादाय अधीक न्यायाचा, समदृष्टीचा, ईश्वरास आवडेल असा होईल हें कोणी ही कबूल करील.

हिंदुस्थानांतील धर्मादायाची मामूल वहिवाट बंद करण्याचा काल समीप येत चालला आहे. भिकारी जे दारावर जमतात अथवा अन्नछत्रें व सदावर्तें येथें गोळा होतात अगर भिक्षुकी बाण्यानें जे वर्णश्रेष्ठ ब्राह्मण आपल्या करितांच सर्व धर्मार्थ बाबी यजमाना करवीं वेचितात त्या भिक्षेकरी व भिक्षुक लोकांच्या प्रीत्यर्थ या देशांत सालोसाल कोट्यावधि पैसा खर्च होतो त्यांत पुष्कळ पैसा विद्वान व अनुभवी लोकांच्या मतें अनाठायीं कुपात्रीं, किंवा आलस्यवृद्धीसाठीं खर्चिला जातो तेव्हां अशा अयोग्य मार्गानें होणारा व्यय बंद झाला पाहिजे आणि वरील धमार्थ संस्थेला राष्ट्रीय स्वरूप देण्याचा लोकांनीं निश्चय केला तर सहजीं सांप्रतचा अनिष्ट धर्मादाय सार्थकीं पडेल असें आम्हांस वाटतें.

वरील अनंत राष्ट्रीय धमार्थ संस्थेच्या चालकांनीं आपले उद्देश प्रगट केले त्याज बरोबर कोणकोणत्या तत्वावर फंडाचा व्यय करणें आहे हें स्पष्टपणें कळविणें जरूर होतें कारण त्या माहितीच्या योगें लोकांस त्या गोष्टीची अभिरुचि लागेल. फंड खर्चला जाईल त्याचा मोबदला सर्व प्रकारें मिळणार नाहीं हें खरें तत्रापि विनियोगाचें तत्व धर्मार्थ फंडाला लावलें नाहीं तर जो तो त्याचा आश्रय करूं इच्छील आणि तेणें करून भिकारीपणाची, भिक्षुकीची अगर आलस्यचरिताची एक निराळी वृत्तीच बनले इतकेंच नाहीं तर पूर्वी पासून बनत चाललेल्या वृत्तीला उदार आश्रय मिळेल. तो आश्रय मात्र न मिळेल अशी व्यवस्था अगोदर घडली पाहिजे. या संस्थे संबंधानें इतकें पाल्हाळानें लिहिण्यांत आमचा इरादा असें कळविण्याचा आहे कीं सांप्रत सर्व देश घोर दारिद्र्यांत बुडत चालला आहे अशा वेळीं फाजील धर्मादायाचे मार्ग बंद व्हावेत आणि शरिरानें व बुद्धीनें उद्योगधंदा करून पोट भरण्यास जे जे लोक लायक आहेत त्यांच्या साठीं उद्योगशाला निघाव्यात आणि उद्योगवृद्धीनें, व्यापार उदीमानें व यांत्रिक कारागिरीनें सर्व देशाच्या धनसमुद्रास जी मोठी ओहटी लागली आहे तिच्या ऐवजीं पूर्ववत् चिरस्थाई व मोठ्या जोराची भरती यावी.

हिंदुस्थानांतून कापूस, गहूं, जवस, आणि नीळ द्वीपान्तरास रवाना होण्या साठीं कलकत्ता मुंबई व कराची या बंदरीं निरनिराळ्या मुलखांतून हे जिन्नस धाडले जातात त्यांचें टिप्पण सरकार मार्फत होत असतें. त्या टिप्पणा वरून कळतें कीं सन १८९२ च्या जानेवारी पासून मे अखेर पावेतो मद्रास मुंबई, सिंध, बंगाला, वायव्यप्रांत, पंजाब, मध्यप्रांत वऱ्हाड, आसाम, रजपुताना व मध्यहिंदुस्थान, निजामचें राज्य आणि म्हैसूर या इलाख्यातून रवाना झालेल्या कापसाची तिन्ही बंदरची एकुणात ९६,०९१४२ मण कापूस निर्गत आणि हा आंकडा सन १८९० च्या आंकड्या पेक्षां $\frac{1}{5}$ नें कमी आहे. या कापसा पैकीं वऱ्हाडांतून १३८९३९९ मण रवाना झाला आहे ह्मणजे सर्व हिंदुस्थानच्या पिकाच्या मानानें सरासरीनें एक चतुर्थांश कापूस वऱ्हाडांत पिकतो असें ह्मणण्यास हरकत नाहीं. गहूं १५०६९३८६ मण देशातून बाहेर प्रदेशीं गेला आणि ही संख्या सन १८९० च्या आंकड्याच्या दुपटी जवळ जवळ आहे. तशांत स्मरणांत ठेवण्या सारखी गोष्ट ही कीं यंदा मद्रासेकडे दुष्काळ होता तरी देखील बाहेर जाणाऱ्या मालाचें प्रमाण एवढें मोठें आहे. वऱ्हाडांतून ३,२७,००४ मण गहूं मुंबईकडे गेला आहे. या सालीं गव्हाचें व कापसाचें पीक कमी झाल्यामुळें हे जिन्नस गुदस्त साला पेक्षा थोडे थोडे कमी रवाना झाले असावेत. जवस ७३,९३,३६१ मण बाहेर पाठविण्यांत आला त्यांत एक अष्टमांशाहून थोडे अधीक ह्मणजे ९,३३,९७१ मण वऱ्हाड प्रांतांतून रवाना झाले आहेत. एकंदर नीळ १७०२९ मण पाठविण्यांत आली.

आफगाणिस्थानचा अमीर इंग्लिशाचा पक्का दोस्त आहे तरी तो मोठ्या पेचांत सांपडल्या सारखा झाला आहे. बलुचिस्थानांतील हझारा, वजिरी वगैरे लोक बंडावा करितात, दुसरी कडे रशिया आपली फौजफाटा वाढवून हळू हळू आपलें पाऊल पुढें टाकीत आहे आणि इकडे इंग्लिश लोक वहिमानें त्याच्या कृतीचा भलताच अर्थ करून त्याच्या राज्यपद्धतीचें स्पष्टीकरण त्याजपाशीं मागत आहेत. अमीर निरोप धाडतात कीं प्रकृतीच्या अस्वास्थ्या मुळें व राज्यांतील अशांतते मुळें हिंदुस्थान सरकारची समक्ष मुलाखत घेण्यासाठीं स्वतांस येण्यास सवड नाहीं. तेव्हां आमच्या सरकारनें मुख्य सेनापतीच्या अध्यक्षते खालीं कांहीं मंडळी हत्यारबंद व फौजफाट्या निशीं अमिराशी सल्ला मसलत करण्या साठीं येत्या आक्टोबरांत जलालाबाद मुकामास धाडण्याचें ठरविलें आहे. आमच्या सरकारचा पाताळयंत्रीपणा अतर्क्य असतो तेव्हां तसा काहीं प्रकार न घडो म्हणजे झालें!

आफगाणिस्थानच्या अमिराकडून उलट जबाब आला आहे त्यावरून इंग्रज सरकारवरची त्यांची निष्ठा व स्नेहभाव हीं व्यक्त होतात. हिंदुस्थानचे कम्यांडर-इन-चीफ हे खुद्द स्वतःच्या मुलाखती साठीं येणार आहेत ह्मणून अमिरानें आनंद प्रदर्शित करून राजकीय प्रकरणांत सल्लामसलत घेण्यास व इंग्रज सरकारचे गैरसमज, खोटा द्विधाभाव, व कुतर्क हे दूर करण्यास एका पायावर तयार असल्या विषयीं कळविलें आहे.

मुंबई हायकोर्टाचे जज्ज नामदार काशिनाथ त्रिम्बक तेलंग सी. आय. इ. यांस मुंबई युनिव्हरसिटीचे व्हाइस - चान्सलरच्या जागीं नेमण्यांत आलें हो परम संतोषकारक बातमी होय. माजी व्हाइसचान्सेलर यांची गव्हनरच्या कौंसिलांत बढती झाल्यानें त्यांचें काम फार वाढलें ह्मणुन त्यांनीं व्हाइसचान्सेलरच्या जागेचा राजीनामा दिला तेव्हां त्यांच्या मागून कोण वजनदार, लौकीकवान, व विद्यासंपन्न गृहस्थाची नेमणूक करावी अशा विषयीं मोठा प्रश्न होता परंतु त्या प्रश्नाचा उलगडा समर्पकरीत्या वरील नेमणुकीनें झाला हें सर्वजण कबूल करितील. युनिव्हरसिटीच्या सर्व मर्तें आज कित्येक वर्षे नामदार तेलंग यांनीं मोठ्या बहादरीनें, चातुर्यानें, व उदार वर्तनानें काम करून युनिव्हरसिटीच्या उन्नतीला यथाशक्ति हातभार लाविला आहे. कलकत्ता युनिव्हरसिटीचे व्हाइसचान्सेलर नेटीव आहेत त्या प्रमाणें मुंबई युनिव्हरसिटीचे ही नेटीव व्हाइस चान्सेलर झाले हें उत्कृष्ट झालें. नामदार तेलंगानीं युनिव्हरसिटीच्या अभ्यासांत फेरबदल करण्यासंबंधानें नाना उलाढाली केल्या आहेत. नवा चार वर्षांचा अभ्यासक्रम चालूं होण्यासाठीं त्यांनीं मोठी मेहनत घेतली होती. ते सिंडीकेटचे एक सभासद ही आहेत. नामदार तेलंगाचे विचार व कृति सर्वजणास आवडण्या सारख्या असतातच असें नाहीं तरी नेटीवामध्यें सर्व महाराष्ट्रांत ते एक तेजःपुंज विद्वन्मणि आहेत तेव्हां त्यांची युनिव्हरसिटीच्या मुख्यस्थानीं नेमणूक झाली ही गोष्ट यथायोग्य व आल्हादकारक होय.

ग्लाडस्टन साहेबांच्या प्रधान मंडळाची स्थापना झाली त्यांत इंडियाचे स्टेट सेक्रेटरी लार्ड किम्बरले यांस नेमलें. लार्ड रिपन हे कालनी सेक्रेटरी आहेत. आणि मि० रसेल यांस इंडियाचे अंडर सेक्रेटरी नेमलें.

## The Berar Samachra

MONDAY AUGUST 22 1892

The India Gazette of 6th instant contains a code of rules for regulating the Legal Practitioners in the courts of Berar. It is a good measure of legislation and we welcome it with great delight. A good deal of the Legal practitioners' Act of 1879 is incorporated into the latter portion of these rules in connection with the suspension and remuneration of pleaders and the closing chapter on penalties. Some time before, it was apprehended in certain quarters that the provincial Govt: intended to restrict the pleader's Examination to *bona fide* Beraris and not to entertain outsiders as pleaders in their courts. But the unambigious wording and the liberal spirit of the rules have proved once for all that those fears were quite unfounded. There is also a clear and distinct aim to raise the standard of excellence of the Berar-bar. It is laid down that a candidate to the Pleader's Examination must produce

'A certificate that he has passed the entrance examination of the Bombay University, or any other examination which the Resident may declare to be

equivalent thereto, and that he can speak read and write the Marathi language fairly and has a good colloquial knowledge of the Urdu language;' This rule is in addition to the rules in vogue under Circular No XV of 1885 which is hereby rescinded by the new rules. Some new additions are made in the scope of legal study and the standard of qualification for a pleader is thus raised to a desirable goal. We do not properly understand the force of the arbitrary & unquestionable powers that are vested in the Judicial Commissioner as regards the rejection of a candidate for the examination as well as his non admittance to the Berar-bar after having been qualified for it in the ordeal of examination. We hope that there is some pregnant good intention in it. Though the Judicial Commissioner is not responsible to the rejected candidate and his orders are final and conclusive he ought to have been made to refer his orders to the sanction & approval of the Commissioner with a full and sufficient explanation and an assignment of the reasons that justified him to take such a course of conduct. There is also a strong rule of action against raw, unprepared, and quite uninstructed students who run madly to attain to the honours of a member of the bar. There is a also generous and indulgent rule that gives effect to an allowed practice of some old & well-established pleaders in the Judicial Commissioner's Court:--

"Holders of certificates in form I shall be entitled to practise in the Court and in all Courts subordinate thereto. Holders of certificates in Form II shall be entitled to practise only in the Courts subordinate to the Court of the Judicial Commissioner of the Hyderabad Assigned Districts.

Provided that any person who obtained previous to the year 1889, and at the time these rules come into force, holds a certificate in Form B granted under the rules published in Book Circular No. XV of 1885, and thereafter is deemed to hold, or by renewal actually holds, a certificate in Form II under these rules, may, notwithstanding anything contained in such certificates, practise in the Court of the Judicial Commissioner in all cases except the following:

(*a*) Applications for permission to appeal to Her Majesty in Council, Chapter XLV of the Code of Civil Procedure.

(*b*) Cases in which the High Court may exercise powers under Chapter XLVI of the Code of Civil Procedure, except in regard to applications to review decrees or orders passed by Courts of small Causes.

(*c*) Any application not hereinbefore specified which is made to the High Court as such under any of the provisions of the Code of Civil Procedure.

(*d*) Appeals to the High Court under section 589, proviso (*b*), of the Code of Civil Procedure.

(*e*) Any criminal case or proceeding "

The advocates, Vakils or attorneys on the roll of a High Court who *ordinarily* practise in a High Court or Courts subordinate to it shall be entitled to practise in Berar as a First-class pleader but if they want to settle themselves *permanently* in this province they may be permitted to do so on their submitting an application together with a certificate of good character and fair knowledge of the Marathi language in addition to the certificate that they have practised for the space of at least three years in the said High Court or courts subordinate there-to.

Before we conclude we shall notice some two short-comings in the body of the rules which will perhaps be remedied by the Resident when he will finally put them into force. The first defect is that there is no provision for those who have studied for the bar and have also appeared for the annual examination before they could matriculate themselves. The second point worth notice is that those of the students from Berar who have passed according to the University-standard for a bachelor of laws should not be exempted from the Berar examination. It is certainly hard & trying for them, whose homes are in Berar that they should practise for a period of three years outside the pale of of the province before they could be registered in the Berar roll.

If a bachelor of law is ardent about his gains at the Berar bar he will no doubt pass the provincial examination but such a restriction throws an indirect reflection on the merits of the University-test. The condition for three years' practice is probably introduced with a view of admitting those mofussil pleaders who can, by their wide knowledge, well-tested ability & sound experience of three years' practise, elevate the exellence of the local bar with a desirable ambition & rivalry amidst the limited number of the licensed pleaders. But this condition goes so far as to close the doors of the Berar bar to the Berari aspirants of the University honours. This is probably a case of oversight & we hope that the Resident will promptly arrange to set the matter right.

---

The Inspector-General of Stamps has tried to account for fluctuations in the revenue form the sale of stamps in the following manner:—

'Good crops and bad crops are made to account for variations in statistics in many departments. In the present instance I do not think the reason given holds good. So also with regard to the reason for a decerease given by the Buldana Collector. It is not easy to see the immediate connection between a decrease in civil litigation and a decrease in sales of document stamps under the General Stamp Act. The truth appears to me to be that none of the variations are so startling as to require other reasons than that given by the Collector of Akola, *viz.*, the normal development of business and of transactions in the, ordinary course of material progress.'

The Commissioner thereupon remarks:—

"I agree with Colonel Lane that the true explanation of the rise is that given by the officer at Akola, namely, that it is due to a development in business."

---

'Whisper'-- whispers that inspite of gross instances to the contrary, casual leave was granted a teacher even though he absented himself from the station of his duty without least intimation. We hush up what is done with silent intrigue. Duty they preach but think themselves honoured in her breach. This truth pervading the whole system our 'Whisher' forgets.

---

## वऱ्हाड

हवामान—सर्व लोक आनंद मानतात कीं गेल्या चार दिवसा पासून चांगली उघाडी झाली आहे. हवा स्वच्छ व निरोगी आहे परंतु मेहेकर, भातकुली कडे हवेचा उपद्रव असल्याचें कळतें. काल पुन्हा पाऊस व अभ्रे यांनीं दुर्दिनच होता.

कर्नल मेकंझी कमिशनर हे रेसिडेन्टाच्या भेटीस जाण्या साठीं गेल्या बुधवारीं हैदराबादेकडे रवाना झाले.

वैदर्भ कल्यांस अशी बातमी समजते कीं अलिशान रेसिडेंट येत्या आक्टोबर पासून दोन महिन्यांच्या रजेवर गेल्या नंतर त्यांच्या रजेंत कर्नल मेकंझी हें रेसिडेंट होणार आहेत.

रा० रा० बळवंत राजाराम कावळे यांस १७५ रुपये पगारावर अकोटच्या तहशील-दारीवर नेमण्याचें घाटत असल्या विषयीं आनंदाची बातमी कळते.

बाळापूरचे शेट पोपटलाल यांच्या खटल्याच्या अपिलाचा दिवस पुढील सप्टंबरच्या ९ व्या तारखेस नेमला आहे असें कळतें.

बाळापूर तालुक्यातील अंदुरें येथील कुंभार मल्लु यानें अव्वल कोर्टासमोर आपल्या बायकोला लाथबुक्या मारून तिचा खून केला असा कबुली जबाब दिला होता आणि तेथील पाटील उभयतां बापलेक गणपतराव व खुशालराव देशमुख यांनीं सातशें रुपयांचा कर्जरोखा लांच ह्मणून लिहून घेऊन मल्लुस व त्याच्या बाप चुलत्यास त्या प्रेताची व्यवस्था गूपचूपपणें करण्याचा सल्ला व मदत दिली असाही दुसरा पोट खटला सेशनकडे धाडण्यांत आला होता. या आठवड्यांत येथें सेशन भरून मल्लुवर जबर दुखापत केल्याची शाबिती होऊन त्यास तीन वर्षांची सजा झाली आणि गेल्या शुक्रवारीं राजश्री गणपतराव व खुशालराव यांच्या वरील अपराधांची चौकशी होऊन ते निकालाच्या शेवट निर्दोषी व निरपराधी ठरले. यांच्या तर्फे रा. रा. खापर्डे, महादेव चिमणाजी आपटे, देवराव विनायक, व भागवत इतक्या गृहस्थांचें वकीलमंडळ होतें.

या खटल्या संबंधानें व इतर प्रकरणा संबंधानेंही पोलीस व कमिटिंग माजिस्ट्रेट यांच्या अहेतुक, गैरवाजवी व दोषमूलक चुक्यांचा किती भयंकर परिणाम होतो हें पुढील अंकीं कळविण्याच्या विचारांत आम्हीं आहों.

मल्लू कुंभाराचा बाप व चुलता हरी व माधव यांस सुनेचें प्रेत गुप्त प्रकारें पुरून टाकल्या बद्दल प्रत्येकी सहा सहा महिन्यांची शिक्षा देण्यांत आली.

उमरावतीच्या एका कैद्यानें तेथील जेलरास दगड मारल्या वरून त्याजवर खटला केला आहे. असलीं उदाहरणें न होतील तितकें बरें!

आम्हांस लिहिण्यास दुःख वाटतें कीं यवतमाळचे पोलीस सुपरिनटेंडेंट मि. भाफेट साहेब यांस यवतमाळ येथें गेल्या १४ वे तारखेस देवाज्ञा झाली अंमलदार मोठा चांगला व नेटिवांचा कनवाळू असा होऊन गेला!

निजाम सरकारच्या रेलवे मार्फत येणाऱ्या व जाणाऱ्या अफू संबंधानें नवीन कडक नियम करण्यांत आले असून इंदुराहून धाडलेली अफू अपकारी कडील परवान्या खेरीज निजाम संस्थानांत घेतली जाणार नाहीं.

रा. रा. कृष्णाजी अनंत तहशिलदार मूर्तिजापूर यांस एक महिन्याची हक्काची रजा दिल्या कारणानें त्यांच्या जागीं चांदूरचे नायब तहशीलदार रा. रा. नारायण गोविंद यांस नेमलें.

रा. रा. गणेश गोविंद तहशिलदार पुसद यांस राजश्री त्र्यंकोबा विठोबा विडलूकर यांच्या जागीं तालुका बोर्डाचे सभासद नेमलें.

बुलढाणें जिल्ह्यांतील तालुका बोर्डाचे सभासदा पैकीं ज्या सभासदांची मुदत संपली त्या ऐवजीं नवीन निवडण्यांत आले त्यांची नामावळी येणें प्रमाणें:—

चिखली तालुक बोर्ड—चार सभासद निवडले त्यांत दोन जुने कायम झाले आणि अमृतराव विनायक व गोपाळसा कृष्णसा हे दोघे जाऊन त्यांच्या जागीं रंगराव माधव सावरी आणि सकुबिया देशमुख, रोहोडा हे निवडले गेले.

मेहेकर—चार जागा रिकाम्या झाल्या त्यांत दोघेजण पुन्हा निवडले जाऊन एक जागा रिकामीच राहिली आणि दौलतराव पंढरादीस यांच्या ऐवजीं नारायणसा बकनसा यांस निवडलें.

मलकापूर—बाळकृष्ण परशराम, त्र्यंबक मैराळ, उमरखान अलीखान व राऊतमल दौलतराम या चौघा सभासदांच्या स्थळीं त्र्यंबक मैराळ, खावजो इक्रामुदीन काजो, गणेश मोरेश्वर देशपांडे पिंपळगांवराजा, व श्रीकृष्ण देवराव देशपांडे चांदूर यांची निवड झाली.

पुढील महिन्याचे ४ थ्या तारखेस येथें मोहरीर लोकांची रजिस्ट्रेशन व स्टांपाचा कायदा या मध्यें नव्यानें परीक्षा होणार आहे आणि ही परीक्षा दरसाल होत जाऊन तींत पसार झालेले लोकांसच सब रजिस्ट्रार नेमण्यांत येईल.

रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी एम. ए. व एजुकेशनल इनस्पेक्टर वऱ्हाड यांस यंदाच्या म्याट्रिक्युलेशन परीक्षेस मराठीचे परीक्षक नेमलें आहे.

येथील हास्पिटल डा० शिवरतन वैजनाथ यांनीं बाबूजी देशमुख जनरल लायब्ररी मध्ये 'पाणी' या संबंधानें काल सायंकाळीं व्याख्यान दिलें. वर्षोत्सव व्याख्यानं मालेतलें हें ६ वें व्याख्यान होय.

---

### Notice

Mr. Shamlal Onkardas Banker of Khamgao is requested by the undersigned to prove, in the regular Court, his title as well as the genuineness of the documents under which he has disposed of the property of Edward Fenwick the father of the undersigned. He is further informed that he shall have to run the risk of a criminal prosecution for breach of trust in default of his not doing so. Dated 21st August 1892

( Signed ) Mary Ann Easdon.
C/o The Post-master, Akola.

---

### नोटीस.

रा. रा. जैराम फत्तेलाल मारवाडी दुकान असलगांव ता० जळगांव यासी नोटीस देणार खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येत आहे कीं, तुमचे रुपये १२६ अक्षरीं सवाशें देणें असून त्यामध्यें आमचे दागिने तुमचे जवळ किमत रुपये दोनशेचे आहेत तर तुह्मी ज्या वेळीं आमचे गांवीं आले त्यावेळीं रकम तुमचे जवळ दिली ती तुह्मी घेतली नाहीं. व पुढें रकम तुमचे येथें दोन चार वेळां पाठविली. आजपर्यंत तुह्मी रकम घेतली नाहीं व चार महिने झाले तुमची रकम आमचे येथें मुद्दल अनामत आहे पुढें ही नोटीस पावल्या पासून ८ दिवसांचे आंत आमचा माल आह्मास द्यावा. आमचे जवळून रकम घेऊन पावती तुह्मी द्यावी. त्या प्रमाणें न केल्यास कायद्या प्रमाणें तजवीज केली जाईल. कळावें. तारीख १८—९—९२ इ०

( सही. )

ईश्वरदास उत्तमचंद मारवाडी
दस्तुर खुद्द रहाणार सावरगांव ता. जळगांव

---

## वर्तमानसार.

लिबरल पक्षाच्या लोकांनीं पार्लमेन्टची मंजुरी घेतल्यावाचून इजिप्त सोडूं नये असें लार्डसभेचें ह्मणणें आहे.

एकुणिसावें शतकः—इ० स० १८०१ जान्युआरी ता० १ रोज गुरुवार या दिवशीं ह्या शतकास आरंभ झाला; व ता. ३१ डिसेंबर रोज सोमवार सन १९०० इसवीस हें समाप्त होईल. ह्यांत एकंदर गुरुवार, शुक्रवार शनिवार रविवार आणि सोमवार प्रत्येकीं ५२१८ वेळां येतील. मंगळवार व बुधवार प्रत्येकीं ५२१७ वेळां येतील व एकंदर दिनसंख्या ३६,५२४ होईल.

साधारण नियमः—जें वर्ष ज्या वारीं सुरूं होईल त्याच वारीं तें समाप्त होईल. जान्युआरी व आक्टोबर ह्या महिन्यास एकाच वारीं प्रारंभ होतो व त्याच प्रमाणें फेब्रुआरी मार्च व नोव्हेंबर एकाचवारीं सुरूं होतात; तसेंच जुलई व आप्रिल आणि डिसेंबर व सप्तेंबर मे, जून व आगष्ट हे एकावारीं अगर वरील महिने ज्या वारीं प्रारंभ झाले त्या वारीं कधीं येत नाहींत. हे नियम लीप वर्षास लागू पडत नाहींत. कोणतेही शतकास बुधवारीं, शुक्रवारीं अगर रविवारीं आरंभ होत नाहीं.

तुह्मी आपल्या भेटीस लंडन येथें या असें विलायतच्या राणीनें काबूलच्या अमिरास साधारण केलें होतें, पण त्याप्रमाणें जाण्याचें अमिरानें नाकारलें. त्यावरून त्या उभयतांत वैमनस्य झालें व त्यावरून इंग्रजांची दाहा हजार फौज अमिरावर रवाना झाली आणि अमिरानेंही काबुलास फौजफाट्याची तयारी केली असें मशीदच्या बातमीवरून एका रशियनपत्रांत प्रसिद्ध झालें आहे! हिंदुस्थानांत खरी स्थिती याच्या उलट आहे, तेव्हां खटपटी लोकांच्या लटपटी कशा चालतात हें यावरून दिसतें.

रशियन व अफगाण फौजेची पामीर येथें लढाई झाली खरी.

त्रिचीच्या छावणींतील लष्करी लोकांस पाण्याचा पुरवठा करण्याकरितां दीड लाख रुपये मंजूर झाले आहेत.

हिंदुस्थानच्या लष्करी खात्याकरतां येत्या हिवाळ्यांत २१८ अमेरिकन खेचरें खरेदी करण्याचा हुकूम झाला असून, त्याच प्रमाणें तोफखान्याकरतांही नागनागी कित्येक खेचरें खरेदी करावीं असें ही ठरलें आहे.

निझामाच्या तरुण मुलास सातवें वर्ष लागलें असल्यामुळें त्याच्या विद्याभ्यासाकरतां वेगळाले शिक्षक नेमले व त्या शिक्षकांस मेंव्ह्या यायनें राजपुत्राच्या स्वाधीन केलें.

दोघां जज्जांपुढें चाललेल्या एकाद्या कामांत दोघां जज्जांचें एकमत न झाल्यास तें काम तिसऱ्या जज्जाकडे नेऊन तो ज्या मतास मिळेल त्याप्रमाणें ठराव करावयाचा अशी निझामाच्या हायकोर्टांत आजपर्यंत वहिवाट होती. पण यापुढें तसें न करतां तशा प्रसंगीं त्या दोघां जज्जांतून ज्याचें मत खालच्या कोर्टाच्या मताप्रमाणें असेल त्या प्रमाणें ठराव व्हावयाचा असें सुरूं केलें आहे. ठा. अ.

जर्मनीची लष्करी खजीना— १० आणि २० मार्कांचें एकेक नाणें अशीं ६० लक्ष नाणीं जर्मनीनें आपल्या गंगाजळींत भरून ठेविलीं आहेत. अकस्मात लढाई उद्भवली तर प्रसंगीं पैशाचा तोटा पडून कर्ज काढण्याची वेळ येऊ नये ह्मणूनही तयारी करून ठेविली आहे राज्य शकट वाहणारांच्या अंगीं अशीच दूरदृष्टि असावी लागते.

इंपीरियल सर्व्हिस फौज — संस्थानिकांनीं बादशाही सरकारास सरहद्द रक्षणासाठीं जी फौज देण्याचें कबूल केलें ती २०००० आहे. संस्थानिकांच्या खर्चानें इतकी उत्तम फौज आमच्या सरकारास फुकट मिळाली.

कापसाचें पीक— युनायटेड स्टेट्स् संस्थानांत एका एकर जमिनींत १८६ पौंड कापूस होतो, पण मिसर, आणि ब्राझील देशांत तर याही पेक्षां जास्त उत्पन्न एका एकरांत होतें असें सरकारी माहितीवरून समजतें. आमच्या हिंदुस्थानचा कापूस आवीक व्हाईट आणि त्यांत एका एकरांत त्याचें उत्पन्न ६० पौंड पेक्षां थोडें जास्त इतकेंच होतें असें समजतें हें उत्पन्नाचें प्रमाण अगदींच भिकार होय यावरून हिंदुस्थानची जमीन निःसत्व झाली नाहीं असें कोण ह्मणेल. यु. सु.

## नोटीस

रा. रा. नयमल सामानी मारवाडी दुकान अकोला—यांस

खालीं सही करणार यांजकडून नोटीशीनें कळविण्यांत येतें कीं, तुमच्या तारीख १५ आगष्ट १८९२ च्या मितीच्या लेखी नोटीशींतला मजकूर खोटा आहे तो. असाः—

(१) तुम्हांस आह्मी ६०० रुपयांची हुंडी वेची दर ९९ ॥।= प्रमाणें करून दिली त्याची तारीख १०।८।९२ इ० ह्मणजे रोज बुधवारचा असून गव्हाचा सवदा असून तारीख ११।८।९२ ह्मणजे रोज गुरुवारचा झाला आहे. पण तुम्ही हुंडीचे चारशें रुपये देऊन १९९॥= रकम बाकी राहिलेले अडकविण्याच्या हेतूनें गव्हाच्या सवद्याची तारीख १०।८।९२ ह्मणजे रोज बुधवारची घातली आहे ती खोटी आहे.

(२) हुंडीची वेची व गव्हाचा सवदा हे दोन्ही स्वतंत्र, वेगवेगळाले, व भिन्न भिन्न मितीचे व्यवहार असून त्यांचा परस्पर काडीमात्र संबंध नाहीं. परंतु १९९॥= रकम न देण्याच्या इरादानें व गव्हाचा सवदा आमच्या पदरांत वेकायदा घालण्यासाठीं तुह्मी पूर्वीच्या हुंडी पैकीं रुपये दुसऱ्या दिवशींच्या सवद्याचा बयाना ह्मणून ठेविले आहेत हें काम सचोटीचें नव्हे.

(३) रोख नगदी विक्रीच्या सवद्यांत बयाना देण्याचा शिरस्ता बाजारांत नसून तो तुह्मी आपमतलबीनें पुढें आणला आहे.

(४) ज्या नमुन्याचे गहूं विकत देण्याचा व घेण्याचा अनुक्रमें तुह्मी व आह्मी करार केला होता त्या नमुन्याहून हलक्या प्रतीच्या गहूं तुह्मी देऊं लागला ह्मणून आह्मी सवदा तहकूब केला. करार मोडल्याची जबाबदारी तुह्मावर आहे.

येणें प्रमाणें तुमच्या नोटीशींतला खोटेपणा दाखविला. तर तुम्ही ही नोटीस पावतांच १९९॥= रकम वारा आणि मिती प्रमाणें व्याजा सुद्धां दाखल करावी आणि गव्हाच्या सवद्या संबंधाची नुकसानी नोटीशीच्या खर्चासुद्धां भरून द्यावी. या बरहुकूम तुह्मी न केलें तर अखेर निकाल होईपर्यंतचा खर्च तुह्मास भरून देणें भाग पडेल. कळावें. तारीख १६ माहे आगष्ट सन १८९२ इ०

सही. (गुजराथींत)

नागजी गेला दस्तुर कानजी गेला.


## जाहिरात

———०———

अहो स्वदेश बांधवहो, परदेशी औषधी नुसत्या रंगढंग व कमिशन जास्त पाहून कां फसतां? इकडे थोडें लक्ष द्या.

आमचे दवाखान्यांत सर्व रोगांवर औषधी विक्रीस व दरिद्री लोकांस फुकट तयार आहेत; परंतु त्यांत ज्या हटकून गुण खात्रीनें देतात त्यां पैकीं थोड्या प्रसिद्धीस देतों. त्यांतून जो दवा कोणास लागेल त्यांनीं खालीं लिहिलेले सहीचे पत्त्यावर पत्र पाठवावें. ह्मणजे आम्ही व्हाल्युपेबलनीं पोस्टमार्गें लवकर पाठवूं. व कोणी आजारी आमचे येथें येऊन औषध घेतील त्यांस प्रथम दुरुस्त करून ठरलेली किंमत मागाहून घेऊं.

हमेशा घेणारे ग्राहकांस कमिशन देऊं. व त्यांनीं विक्री करून दाम पाठवावे.

१ गजकर्णावर रामबाण, ६ दिवसांत गुण किंमत दर बाटलीस ८८ आणे.

२ मुळव्याध कितीही दिवसांची दुर्धर असेल त्यावर मोडावर लावण्याचें व पोटांत घेण्याचें दोन औषधी मिळून किं. १॥ रु.

३ धातुर्विक ज्वर ह्मणजे चववारी हिव ताप त्याच प्रमाणें तिजारे, व दररोज येणारे कितीही दिवसांचे असो, त्यावर मिश्रित औषध एकच बाटली पुरे. किं. १॥ रु. दुसरें औषध गोळ्या खात्रीच्या २१ गोळ्यांच्या डबीस ८५ या औषधानें कडक तापही जातो.

४ परमा तिडिक व स्वप्नावस्था, व कोठ्यांतील उष्णता व क्षिणता या सर्वांवर मेहुणपुडा किं. १ पुड्यास ८१४ आणे.

५ बाळंत रोग बाळाचे डबे व सटवी बाधा व प्रदर सर्व तऱ्हेचा किं. १ डबीस १॥ रु.

६ वीस प्रकारचे मेहापैकीं १६ मेहावर १४ गोळ्यास किं. २॥=

७ नारुवर ९ दिवसांत गुण. लावणें व खाणें याच्या डबीस किं. ।

८ गुल्म पांच प्रकारचे व सर्व पोट गुळांवर व गोळ्यावर व पानथरीवर १ डबीस किं. ।॥

जुलाब उत्तम राजस तकलीफ अगदीं नसून कोठा साफ १ बाटली १० मनुष्यास पुरेल किं. १। रु.

१० मेदोरोग व भूरें व उन्माद यावर अगदीं लवकर गुण १ बाटलीस किं. २ रु.

११ स्त्रियांचे रक्तस्राव व ऋतुस्नात होण्यास व गर्भधारणास बंदेज ह्यावर हें एकच औषध फार चांगलें आहे. १ डबीस किं. १॥

१२ पित्त व मस्तकशूळ व अर्धशिशी यावर दर डबीस किं. १८=

१३ हागवण व अतिसार १ डबीस किं. १।=

१४ वृषण एकारल्यास व वृद्धीस १ डबीस किं. १ रु.

१५ कावळे कुत्रे व कोल्हे व तेल्या उंदीर डसल्यास १ डबीस किं. १। रु.

१६ मेहानें अगर उष्णतेनें पाय उलून रक्त जाणें व सांधे दुखणें ह्यावर १ डबीस किं. १॥ रु.

१७ महामारीवर अगदीं लवकर गुण एक मनुष्यास १२ गोळ्या ५० गोळ्यांच्या डबीस किं. १८—

१८ गर्मी उर्फ उपदंश संबंधी विकार क्षतें यांजवर १ डबीस किं. १॥ रु.

१९ फसकी उर्फ मजागतवात व शूळ यावर लवकर १५ मिनिटांत गुण १ डबीस किं. ॥ हें १५ मनुष्यांस पुरेल.

२० कऊळ, नळगुद, पंडु, सूज व मुखरोग ६५ व सन्निपात १३ यांवर १ डबीस किं. १॥ रु. हो ३ मुलें व २ पुरुषांस पुरेल.

२१ सुवर्णमालिनीवसंत खात्रीचा १ तोळ्यास किं. ७ रु.

२२ योगराज गुग्गुळ १ तोळ्यास ४॥ रुपये.

२३ नामर्द ह्मणजे नपुंसक कितीही दिवसांचा असो तरी तो तीन दिवसांत दुरुस्त खात्रीनें होईल. १ बाटलीस किं. ३ रु. गुण न आल्यास पैसे परत मिळतील.

२४ डोळ्यांतील फुल वडस रातांधळे लाली खुपरी चूळ चीपडे गळतो यावर १ डबीस किं. १८६

या शिवाय जास्त माहिती मागविल्यास देऊं. व कोणी योग्य औषधें हमेशा मागवून विक्री करील त्यांनीं विक्री करून पैसे मागाहून पाठवावे.

(पत्ता व सही) शिवचरनगीर रामगीर कुरणखेडकर अकोला गंगावरचे माडीवर चौकांत दवाखाना.

वऱ्हाड.


## नोटीस

रा. रा. अप्पाजी दाजी देशपांडे गुमास्ते कुळकर्णी मौजे काळवाडी तालुके अकोट रहाणार अकोट जिल्हे अकोलें यास. खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुह्मी आह्मां त्रिवर्गां पासून ९९ रुपये नव्याणव वैशाख वद्य १ गुरुवार शके १८१४ ता० १२ मे सन १८९२ रोजीं उसनवार पंधरा दिवसांचे करारानें घेतले त्यास तीन महिने होऊन गेले. तुह्मास बरेच वेळां मागितलें असतां तुह्मी बरोबर मुदत सांगित गेलात. परंतु हल्लीं आपण शेतीचे कामास हरकत आहे तर सदरहु रुपये ही नोटीस पावल्या दिवसा पासून आठ दिवसांत आमचे प्रत्येकाचे ३३ रुपये प्रमाणें तिघांचे ९९ रुपये व ह्या नोटीशीचा खर्च असें आह्मास देऊन पावती घ्यावी नाहींवर रीती प्रमाणें योग्य कोर्टांत दावा करणें भाग पडेल. कळावें तारीख १६ माहे आगष्ट १८९२ मु० अकोलें.

(सही.)

१ निशाणी तुकाराम वलद गंभीरजी हिंगणकर रहाणार काळवाडी ता० अकोट जिल्हे अकोलें.

१ हरी वलद मारोजी हिंगणकर राहणार मजकूर.

१ जयराम वलद लक्ष्मण मोहोडे राहणार मजकूर.

☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाबाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.